सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १७ नोव्हेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक २२१ | पाने : ८ | किंमत रु. ६/-

## थोडक्यात...

### मेक्सिकोमध्ये भ्रष्टाचाराविरुद्ध हजारो जेन-झी रस्त्यावर; १२० जण जखमी



मेक्सिको सिटी , १६ नोव्हेंबर – मेक्सिकोमध्ये वाढत्या गुन्हेगारी, भ्रष्टाचार आणि हिंसाचाराविरोधात 'जेन झेड' च्या आवाहनावर शनिवारी हजारो युवक रस्त्यावर उतरले आणि मोठे प्रदर्शन केले. या दरम्यान प्रदर्शनकर्त्यांची पोलिसांसोबत झटापट झाली. निदर्शकांनी दगड, हातोडा, फटाके, काठ्या आणि साखळ्यांनी पोलिसांवर हल्ला केला. त्यांना पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराचा वापर केला. या झटापटीत एकूण १२० जण जखमी झाले आहेत तर २० आंदोलनकर्त्यांना अटक करण्यात आली आहे. हे आंदोलन मुख्यत्वे राष्ट्राध्यक्षा क्लाउडिया शेनबाउम यांच्या सुरक्षा धोरणांवर आणि ड्रग कार्टेलविरोधातील शिथिल भूमिकेविरुद्ध आहे. विशेषत: मिचोआकान राज्यात ड्रग तस्करांविरुद्ध कार्यवाही करणारे महापौर कार्लोस मंजो यांच्या हत्येनंतर या आंदोलनाला आणखी वेग आला आहे.जेन झेडच्या या आंदोलनाला विरोधी पक्षांतील विविध वयोगटातील नेते आणि समर्थकांनी खुलेपणाने पाठिंबा दिला असून त्यामुळे हे आंदोलन आता व्यापक स्वरूप धारण करत आहे. बहुतांश प्रदर्शन शांततापूर्ण होते, परंतु शेवटी काही तरुण आणि पोलिसांमध्ये संघर्ष उफाळला. आंदोलनकर्त्यांनी पोलिसांवर दगड, फटाके, लाठ्या आणि साखळ्या फेकल्या तसेच पोलिसांच्या ढाली आणि इतर साधने हिसकावून घेतली. राष्ट्रपतींचे अधिकृत निवासस्थान असलेल्या राष्ट्रीय राजवाड्याच्या सुरक्षा भिंती जेन-जी ने तोडल्या. प्रत्युत्तरादाखल पोलिसांनी अश्रुधुराचा वापर केला आणि लाठीचार्जही केला.

### म्यानमारमध्ये ३.५ रिश्टर स्केलचा भूकंप

नेपीडॉ, १६ नोव्हेंबर : म्यानमारमध्ये रविवारी पहाटे भूकंपाचे धक्के जाणवले. नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजी (एनसीएस) च्या माहितीनुसार, या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ३.५ नोंदली गेली आहे. एनसीएसच्या माहितीनुसार, या भूकंपाचे केंद्र जमिनीखालच्या १० किलोमीटर खोलीवर होते. त्यामुळे हा प्रदेश आफ्टरशॉकसाठी अतिसंवेदनशील ठरतो.एनसीएसने 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे की १६ नोव्हेंबर २०२५ रोजी म्यानमारमध्ये पहाटे २ वाजून ४० मिनिटांनी ३.५ तीव्रतेचा भूकंप झाला. भूकंपाचे केंद्र जमिनीपासून १० किमी खोलीवर होते. याआधी १४ नोव्हेंबर रोजी या भागात ३५ किलोमीटर खोलीवर ३.९ तीव्रतेचा भूकंप झाला होता. तर २८ मार्च रोजी मध्य म्यानमारमध्ये आलेल्या ७.७ आणि ६.४ तीव्रतेच्या भूकंपांनंतर जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) भूकंपग्रस्त भागांत विस्थापित झालेल्या हजारो लोकांना वाढत्या आरोग्यधोक्यांबाबत इशारा दिला होता. म्यानमार मध्यम आणि मोठ्या तीव्रतेच्या भूकंपांच्या धोक्यासाठी संवेदनशील मानला जातो.

### जोधपूर महामार्गावर झालेल्या अपघातात सहा यात्रेकरूंचा मृत्यू

जयपूर, १६ नोव्हेंबर – राजस्थानमधील जोधपूर-बालेसर राष्ट्रीय महामार्गावर रविवारी सकाळी एक भीषण रस्ता अपघात झाला. गुजरातमधील बनासकांठा आणि धनसुरा जिल्ह्यातील सहा जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले. मृतांमध्ये तीन महिलांचा समावेश आहे. राजस्थान पोलिसांच्या माहितीनुसार, गुजरातमधील बनासकांठा आणि धनसुरा जिल्ह्यातील २० यात्रेकरू रामदेवरा येथे जात असताना सकाळी ५ वाजण्याच्या सुमारास खारी बेरी गावाजवळ एका धान्याने भरलेल्या ट्रेलरला टेम्पोने धडक दिली. धडक इतकी भीषण होती की तीन महिलांचा जागीच मृत्यू झाला. बालेसर पोलिस स्टेशनचे अधिकारी मूलसिंग भाटी यांनी सांगितले की, टेम्पो जोधपूरकडे जात असताना समोरून येणाऱ्या धान्याने भरलेल्या ट्रेलरशी समोरासमोर धडकली. टेम्पोचा पुढच्या भागाचे नुकसान झाले आणि अनेक प्रवासी आत अडकले. स्थानिक आणि पोलिसांच्या मदतीने बचावकार्य सुरू करण्यात आले आणि जखमींना तातडीने बालेसर रुग्णालयात हलवण्यात आले. तथापि, तीन महिलांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. प्रथम उपचारानंतर, गंभीर जखमींना जोधपूरच्या मथुरादास माथूर (एमडीएम) रुग्णालयात हलवण्यात आले, जिथे आणखी तीन जणांचा मृत्यू झाला. आतापर्यंत एकूण सहा जणांच्या मृत्यूची पुष्टी झाली आहे. रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. विकास राजपुरोहित यांनी सांगितले की, १४ जखमींवर उपचार सुरू आहेत, त्यापैकी काहींची प्रकृती गंभीर आहे. मृतांची नावे- १. केशाभाई कोह्याभाई वलंद (६५, बसस्थानकाजवळ, पुंसरी, तळोद, साबरकांठा) २. प्रितेश भरतभाई प्रजापती (टेम्पो चालक) (२३, प्रजापतीवास, पुंसरी, तळोद, साबरकांठा) ३. लोगलभाई कालुसिंग परमार (३९, रुघनाथपुरा, धनसुरा, अरवली) ४. नव्या कालुसिंग परमार (३, रुघनाथपुरा, धनसुरा, अरवली) ५. जिनल प्रविणभाई परमार (१२, रुघनाथपुरा, धनसुरा, अरवली) ६. कृष्णा परमार (९, रुघनाथपुरा, धनसुरा, अरवली)

# स्वामी रामानंद तीर्थ यांचे मराठवाडा मुक्ति संग्रामात अमुल्य योगदान : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे व कमल तलावाचे मुख्यमंत्र्याच्या हस्ते लोकार्पण



छत्रपती संभाजीनगर, दि.१६, :- मराठवाडा मुक्ति संग्रामाच्या लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ यांनी तरुणाईमध्ये देशभक्ती जागृत करून महिला व अनेक स्वातंत्र्यसैनिकांना सोबत घेऊन निजामाच्या जुलमी राजवटीतून मराठवाड्याला मुक्त केले. हे योगदान अमुल्य आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

क्रांती चौक येथील स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे अनावरण करून लोकार्पण केले. तसेच याच ठिकाणी ऑनलाईन पद्धतीने ऐतिहासिक कमल तलावाचेही लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे, राज्यसभेचे खासदार डॉ.भागवत कराड, आमदार संजय केणेकर, आमदार अनुराधा चव्हाण, महापालिका आयुक्त जी. श्रीकांत यांच्यासह मराठवाडा मुक्ति संग्रामात योगदान दिलेल्या स्वातंत्र्यसैनिकांचे कुटुंबिय उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, खऱ्या अर्थानं मराठवाडा मुक्ती संग्रामामध्ये ज्यांनी मोलाची भूमिका पार पाडली ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या स्मारकाच्या उद्घाटन कार्यक्रमांमध्ये या ठिकाणी आल्यानंतर मला मनापासून समाधान होत आहे. त्यांचे संपूर्ण जीवन ते व्रतस्त होते. स्वामी रामनंद तीर्थ हे खेडगीकर कुटुंबामध्ये जन्माला आले. यात त्यांचे एक शिक्षक म्हणून जीवन पाहायला मिळते, दीक्षा घेतल्यानंतर ते स्वामी रामानंद तीर्थ झाले. स्वामी विवेकानंदाप्रमाणेच तरूणाईमध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांनी देशभक्ती जागृत केली. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला असला तरी मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळण्याकरीता १७ सप्टेंबर १९४८ म्हणजे जवळपास १३ महिन्याचा कालावधी लागला. १३ महिने मराठवाडा निजामाशी झुंजत होता.या कालावधीत मराठवाडा निजामाच्या इस्टेटचा भाग होता. ज्या १३ महिन्याच्या आधीच सुरू असलेल्या रजाकारांच्या संपूर्ण अन्यायाची पराकाष्टा झाली होती आणि त्याच्याविरुद्ध एक मोठा रणसंग्राम उभा झाला होता. यामध्ये इतर स्वातंत्र्यसैनिकांचे स्वामी रामानंद तीर्थ यांनी या लढ्यात नेतृत्व केले. या लढयाला एक प्रकारे संघर्षाच्या लढयामध्ये त्यांनी परिवर्तित केले. हैदराबाद असो की मराठवाडा असो या सगळीकडे त्यांनी जी काही स्वतंत्र अस्मितेची ज्योत पेटवली, त्यातून अनेक तरुण अनेक महिला या स्वातंत्र्यसंग्रामामध्ये उतरल्या आणि त्यातून हैदराबादच्या निजामाच्या जोखडातून आपण मराठवाड्याला मुक्त करू शकलो. सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासारख्या मातब्बर गृहमंत्र्यांनी त्यांच्या या स्वतंत्र संग्राम सेनानींच्या हाकेला प्रतिसाद देत सैनिकी कारवाई केली आणि त्यातून मराठवाडा मुक्त झाला. तो दिवस म्हणजे १७ सप्टेंबर १९४८ हा होता. तो आता दरवर्षी मराठवाडा मुक्ती दिन म्हणून आपण साजरा करतो आणि त्यावेळी प्रामुख्याने आपण स्वामी रामानंद तीर्थ यांचा पुण्यस्मरण करत आज त्यांच्या पुतळ्याचे लोकार्पण करत आहोत, असे मुख्यमंत्री म्हणाले.

### महाराष्ट्र व पंजाब राज्यपालांच्या हस्ते आचार्य जवाहर लाल स्मृती मुद्रा व टपाल तिकिटाचे प्रकाशन



मुंबई, १६ नोव्हेंबर : जैन संत व स्वातंत्र्य सेनानी आचार्य जवाहर लाल महाराज यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात लोकांमध्ये धर्म पुनर्जागृतीचे कार्य करीत असताना स्वातंत्र्य लढ्यात मोठे योगदान दिले. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मुद्रा तसेच टपाल तिकीट काढून त्यांच्या कार्याची माहिती भावी पिढ्यांना देण्याचे कार्य स्तुत्य आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज येथे केले.

राज्यपाल देवव्रत तसेच पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया यांच्या प्रमुख उपस्थितीत आचार्य जवाहर लाल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त त्यांच्यावरील पोस्टेज स्टॅम्प व मुद्रेचे (नाण्याचे) प्रकाशन रविवारी (दि. १६) राजभवन मुंबई येथे करण्यात आले, त्यावेळी राज्यपाल आचार्य देवव्रत बोलत होते. कार्यक्रमाचे आयोजन जसकरण बोथरा फाऊंडेशनतर्फे करण्यात आले. भगवान महावीर तसेच विविध जैन संतांनी त्याग, तपस्या व परोपकाराच्या माध्यमातून समाजासाठी प्रेरणादायक काम केले. त्यांनी सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह हे सिद्धांत मानवतेला दिले. जो काळाच्या कसोटीवर टिकतो तो सच्चा धर्म व जो टिकत नाही तो अधर्म असतो असे राज्यपालांनी सांगितले. आचार्य जवाहर लाल यांनी देश पारतंत्र्यात असताना दहा हजाराहून अधिक सत्संगाच्या माध्यमातून जनजागरणाचे कार्य केले. त्यांनी लोकांना स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लोकांना प्रेरित केले. विशेषतः त्यांनी महात्मा गांधी, सरदार पटेल, लोकमान्य टिळक यांना स्वातंत्र्य लढ्यासाठी प्रेरित केले.

## दिग्गज अभिनेते प्रेम चोप्रा यांना ७ दिवसांनी रुग्णालयातून मिळाला डिस्चार्ज



मुंबई, १६ नोव्हेंबर – बॉलीवूडचे दिग्गज अभिनेते प्रेम चोपड़ा यांना शनिवार रात्री रुग्णालयामधून डिस्चार्ज मिळला आहे. ९० वर्षीय प्रेम चोपडांना ८ नोव्हेंबर रोजी छातीमध्ये दुखणे आणि इतर वयापासून संबंधित आजारांमुळे मुंबईतील लीलावती रुग्णालयात दाखल केले गेले होते.

प्रेम चोपडांचे जावई विकास यांनी मीडियाला सांगितले की ते सुरक्षितपणे घरी परतले आहेत. विकास यांनी आधीच स्पष्ट केले होते की प्रेम चोपडांना सावधगिरीच्या दृष्टिकोनातून रुग्णालयात दाखल केले गेले होते आणि त्यांची तब्येत कधीही गंभीर नव्हती. छातीमध्ये संसर्ग आणि हृदयाच्या स्थितीमुळे डॉक्टरांनी त्यांना रुग्णालयात राहण्याचा सल्ला दिला होता.

९० वर्षीय प्रेम चोपडा हे हिंदी चित्रपटसृष्टीतील एक प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व आहेत, ज्यांचा करियर सहा दशकांहूनही जास्त काळाचा आहे आणि त्यात ३८० पेक्षा जास्त चित्रपटांचा समावेश आहे. ते हिंदी सिनेमाच्या इतिहासातील सर्वात लोकप्रिय खलनायकोंपैकी एक आहेत. त्यांच्या करिअरच्या सुरुवातीला काही सकारात्मक भूमिका देखील होत्या, परंतु मनोज कुमारच्या 'उपकार' (१९६७) आणि राजेश खन्ना यांच्या 'दो रास्ते' (१९६९) या चित्रपटांमधील नकारात्मक भूमिकांमुळे त्यांना मोठी ओळख मिळाली. चोपडांनी 'क्रांति' (१९८१), 'दोस्ताना' (१९८०) आणि 'दो अनजाने' (१९७६) यांसारख्या चित्रपटांमध्येही अभिनय केला आहे, तसेच ते राजेश खन्ना सोबत पंधरा पेक्षा जास्त चित्रपटांमध्ये दिसले आहेत.

## प्रशासकीय अधिकाऱ्यांनी नैसर्गिक शेतीला चालना द्यावी : राज्यपाल



मुंबई, १६ नोव्हेंबर : एक एक एकर शेतजमिनीवर १३ - १३ बॅग युरिया टाकला जात आहे. जमीन पंढरीफट्ट होत आहे. त्यामुळे फळे, भाज्या, अन्नधान्य विषयुक्त होत आहेत. देशातील लाखो एकर शेत जमीन ओसाड झाली असून कॅन्सर, मधुमेह, उच्च रक्तचाप अनेक पटींनी वाढत आहे. आज देशाला नैसर्गिक शेतीशिवाय तरणोपाय नाही. राष्ट्रनिर्माण कार्यात प्रशासकांची भूमिका महत्वाची असते. त्यामुळे प्रशासकीय अधिकारी व प्रबुद्ध समाजाने आपल्या स्तरावर नैसर्गिक शेतीचे महत्व शेतकऱ्यांना पटवून द्यावे असे कळकळीचे आवाहन महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज येथे केले.

'संकल्प फाउंडेशन' या प्रशासकीय अधिकारी घडवणाऱ्या सेवाभावी संस्थेतर्फे प्रशासकीय अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित लोकांसाठी 'नैसर्गिक कृषी : अनुपम भारतीय वारसा' या विषयावर राजभवन मुंबई येथे आयोजित चर्चासत्रामध्ये संवाद साधताना राज्यपाल बोलत होते.

देशात अडीच लाख कोटी रुपये खर्च करून युरिया व रासायनिक खाते आयात केली जात आहेत. एकाअर्थी आपणच आपल्या पैशाने आपली शेतजमीन नापीक करीत आहोत. एका कृषी विद्यापीठामधील संशोधनानुसार आज मातेच्या दुधात देखील डिटर्जंट, कीटकनाशक, युरिया आदी रसायने आढळून आली आहेत. गहू व तांदूळ यातील पोषणमूल्य कमी झाले आहे. भावी पिढ्यांची अन्नधान्य व जलसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी नैसर्गिक शेती आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले.

नैसर्गिक व जैविक शेतीमध्ये मोठा फरक आहे असे सांगून रासायनिक तसेच जैविक शेती पेक्षा नैसर्गिक शेती मानव तसेच सूक्ष्म जीव कल्याणाची आहे असे राज्यपालांनी सांगितले.

धर्म, अर्थ व काम यांच्या माध्यमातून मोक्षप्राप्तीसाठी निरामय आरोग्य आवश्यक आहे व आरोग्यासाठी दिनचर्या, भोजन यांसह पर्यावरण महत्वाचे आहे असे राज्यपालांनी सांगितले. आज जागतिक तापमानवाढ जगापुढे मोठे संकट आहे. त्याचा थेट परिणाम शेतीवर पडत आहे. त्यामुळे सर्वांनी नैसर्गिक शेतीला चालना द्यावी व नैसर्गिक उत्पादने खरेदी करावी असे आवाहन राज्यपालांनी केले.

संकल्प फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष कुमार तनेजा यांनी आपल्या प्रास्ताविकात संकल्प फाउंडेशनने आजवर हजारो प्रशासकीय अधिकारी घडवले असून ते भारतीय सांस्कृतिक विचार पुढे नेत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाला रा. स्व. संघाचे मुंबई येथील संघचालक सुरेश भगेरिया, संकल्पचे महासचिव संतोष पाठक, सचिव राजू चौहान तसेच इतर निमंत्रित उपस्थित होते.

## पाकिस्तानच्या सिंध प्रांतात मोठा स्फोट; ७ ठार, अनेक जखमी



इस्लामाबाद , १६ नोव्हेंबर (हिं.स.)। पाकिस्तानच्या सिंध प्रांतात एक मोठा स्फोट झाला आहे. हा स्फोट एका बेकायदेशीर तात्पुरत्या फटाके उत्पादन कारखान्यात झाला. या स्फोटात किमान ७ लोकांचा मृत्यू झाला आणि अनेक जखमी झाले आहेत, असे बचाव अधिकाऱ्यांनी रविवारी सांगितले. हा स्फोट शनिवारी रात्री हैदराबाद शहरातील लतीफाबाद भागात एका बिना परवाना फटाके उत्पादन युनिटमध्ये झाला होता.

रेस्क्यू ११२२ च्या प्रवक्त्याच्या माहितीनुसार, लतीफाबाद पोलीस स्टेशनजवळील लगारी गोठ नदीकाठी एका फटाके कारखान्यात जोरदार स्फोट झाला. आतापर्यंत मलब्यातून सात मृतदेह बाहेर काढले गेले आहेत. स्फोटानंतर शनिवारी रात्री एका घराचा एक भागही ढासळला, आणि काही लोक अद्याप मलब्यात अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

बचाव टीमच्या प्रवक्त्याने सांगितले की, बचाव मोहीम पूर्ण झाल्यानंतरच स्फोटाचे खरे कारण समजेल. त्यांनी सांगितले की, एका खोलीचा मलबा भिंतीसह पडला आहे, त्यामुळे तिथे काम करत असलेल्या काही लोकांसह मुलं सुद्धा अडकल्याची तक्रार आहे; त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू आहे.

लतीफाबादचे सहाय्यक आयुक्त सौद लुंड घटनास्थळी पोहोचून पत्रकारांना पुष्टी केली की, फटाके बेकायदेशीरपणे तयार केले जात होते. त्यांनी सांगितले की, कारखान्याचे मालक आसद जई याला दुसऱ्या ठिकाणी परवाना दिला गेला होता. सध्या मालक पळून गेला आहे आणि कारखान्याच्या परवान्याची माहिती तपासली जात आहे. सहाय्यक आयुक्तानुसार, स्फोटात जखमी झालेल्या सहा लोकांपैकी तीन जखमीं ९८ टक्के जळाले असून त्यांची स्थिती गंभीर आहे.

याच वर्षी ऑगस्टमध्ये कराचीतील एका बेकायदेशीर फटाके कारखान्यात अशाच प्रकारचा स्फोट झाला होता, ज्यात दोन लोकांचा मृत्यू झाला आणि ३३ जखमी झाले होते. सिंधचे मुख्यमंत्री मुराद अली शाह यांनी स्फोटानंतर आवासीय भागातील बेकायदेशीर कारखान्याविषयी तपास सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

## ईडन गार्डन्सची खेळपट्टी आम्ही मागितली तशीच होती - प्रशिक्षक गौतम गंभीर




कोलकाता, १६ नोव्हेंबर (हिं.स.)दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत झालेल्या पराभवानंतर भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी ईडन गार्डन्सच्या खेळपट्टीचे समर्थन केले आहे. गंभीर म्हणाले की, संघाने अशा विकेटची मागणी केली होती. कोलकाता कसोटी भारताने ३० धावांनी गमावली. ज्यामुळे दोन सामन्यांच्या मालिकेत टीम इंडिया ०-१ ने पिछाडीवर आहे. ईडन गार्डन्सच्या खेळपट्टीबद्दल अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. पण गंभीर यांनी ही टीका फेटाळून लावली.

भारतीय संघाने पहिल्या डावात ३० धावांची आघाडी घेतली होती. पण दक्षिण आफ्रिकेने त्यांच्या गोलंदाजांच्या जोरावर भारताला पराभूत करून दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. दक्षिण आफ्रिकेचा संघ दुसऱ्या डावात १५३ धावांवर सर्वबाद झाला आणि १२३ धावांची आघाडी घेऊन त्यांनी भारतासमोर १२४ धावांचे लक्ष्य ठेवले. दुसऱ्या डावात भारताची फलंदाजी अत्यंत खराब होती आणि दुसऱ्या सत्रात संघ ९३ धावांवर सर्वबाद झाला.

सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत गंभीर म्हणाले की, ही खेळपट्टी आम्ही मागितली होती आणि आम्हाला ती मिळाली. क्युरेटर (सुजन मुखर्जी) खूप आधार देणारे होते. मला वाटते की, ही एक अशी खेळपट्टी आहे जी तुमच्या मानसिक कणखरतेचे मूल्यांकन करू शकते, कारण जे चांगले बचाव करून खेळतात त्यांनी धावा काढल्या आहेत.

# भाजप विभागीय कार्यालयाचे लोकार्पण उत्साहात

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून जनसेवेचे केंद्र म्हणून कार्य करणार असल्याचा विश्वास

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर येथे उभारण्यात आलेल्या भारतीय जनता पक्षाच्या नवीन विभागीय कार्यालयाचे लोकार्पण महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले. आधुनिक सुविधा, सुयोग्य नियोजन आणि सार्वजनिक कामकाजाचा वेग वाढविणारी रचना अशा वैशिष्ट्यांनी सजलेल्या या कार्यालयाचे लोकार्पण सोहळ्यास भाजपचे वरिष्ठ पदाधिकारी, मान्यवर आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना फडणवीस म्हणाले की, जनसंघापासून जनता पार्टी आणि नंतर भारतीय जनता पक्ष असा झालेला प्रवास म्हणजे संघटनाच्या सातत्यपूर्ण बांधणीचा इतिहास आहे. नवीन कार्यालय हे केवळ इमारत नसून जनतेशी संवाद, समस्या निवारण आणि विकासाभिमुख उपक्रमांचा केंद्रबिंदू ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

फडणवीस यांनी राज्याचे मंत्री अतुल सावे यांच्या कामाचे विशेष कौतुक करत, नियोजित वेळेत आणि उत्तम गुणवत्तेसह कार्यालय उभारल्याबद्दल अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, हे कार्यालय छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण विभागातील कार्यकर्त्यांसाठी ऊर्जा देणारे ठरेल आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना अधिक वेगाने न्याय मिळवून देईल.

नवीन कार्यालयामुळे गरीब कल्याण योजनांची अंमलबजावणी, जनतेशी थेट संपर्क आणि संघटनात्मक कार्याला नवी दिशा मिळेल, असेही फडणवीस म्हणाले. विकसित महाराष्ट्राच्या वाटचालीत या कार्यालयाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी लोकार्पण कार्यक्रमाला महिला आयोग अध्यक्षा सौ.विजयाताई रहाटकर, पर्यावरण व हवामान बदल मंत्री ना.सौ.पंकजाताई मुंडे, ऊर्जा राज्यमंत्री ना.सौ.मेघनाताई बोर्डीकर, खासदार डॉ.भागवत कराड, खासदार डॉ.अजित गोपछडे, माजी केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब दानवे पाटील, आमदार श्री.बबनराव लोणीकर, आमदार श्री.नारायण कुचे, आमदार श्री.मिहिर कोटेचा, आमदार श्री.प्रशांत बंब, आमदार श्री.संजय केनेकर, आमदार श्री.अनुराधाताई चव्हाण, आमदार श्री.सुरेश धस, जिल्हाध्यक्ष श्री.किशोर शितोळे, जिल्हाध्यक्ष श्री.सुहास शिरसाट, जिल्हाध्यक्ष श्री.संजय खंबायते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन भाजपच्या स्थानिक नेतृत्वाने केले असून उद्घाटन सोहळ्यानंतर मोठ्या उत्साहात जनसेवा आणि संघटनात्मक उपक्रमांना नवीन कार्यालयातून सुरुवात करण्यात आली.

## मुख्याध्यापकाने पेढ्यातून गुंगीचे औषध देत महिलेवर केला अत्याचार

धुळे, १६ नोव्हेंबर : एका मुख्याध्यापकाने पेढ्यातून गुंगीचे औषध देत महिलेवर अत्याचार केला. तसेच या घटनेचा व्हिडिओ तयार करुन तो व्हायरल करण्याची धमकी देत पीडितेकडून तब्बल ५९ लाख ९९ हजार ४०० रुपये उकळले. या प्रकरणी पीडितेने दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी आरोपी मुख्याध्यापकाला अटक केली आहे. सुकलाल रामभाऊ बोरसे (वय ५३, रा. विवेकानंदनगर, देवपूर) असे संशयित आरोपीचे नाव आहे. पीडितेच्या तक्रारीनुसार, बोरसे याने पीडित महिलेला सुरुवातीला आर्थिक मदत केली होती. यातून त्यांची ओळख वाढत गेली. याचा गैरफायदा घेत, १७ ऑगस्ट २०२३ रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास, बोरसे याने महिलेला पेढ्यातून गुंगीचे औषध दिले. महिला शुद्धीवर नसताना तिच्यावर अत्याचार केला आणि या संपूर्ण घटनेचा व्हिडीओ चित्रित केला. अत्याचार केल्यानंतर, मुख्याध्यापक बोरसे याने हा व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन पीडितेला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. या धमकीच्या आधारावर त्याने पीडित महिलेकडून वेळोवेळी सुमारे ५९ लाख ९९ हजार ४०० रुपये उकळले. आर्थिक लुबाडणुकीसोबतच, व्हिडीओच्या आधारावर ब्लॅकमेल करत बोरसे याने पीडितेवर वेळोवेळी अत्याचारही केला.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## वक्तृत्व स्पर्धेत 'शाहू'ची प्रतीक्षा मोरे प्रथम

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** शहीद टिपू सुलतान सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित वक्तृत्व स्पर्धेत खुल्या गटात राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या प्रतीक्षा मोरे हिने प्रथम, निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयाच्या गीता वाडकर हिने द्वितीय तर अलीबागच्या पीएनजी महाविद्यालयाच्या पंकज पांडुळे याने तृतीय क्रमांक पटकावला.

शालेय गटात जान्हवी कर्डिले, भाविका जाधव द्वितीय तर प्रवीण बिराजदार तृतीय आला आहे. टिपू सुलतान यांच्या जीवनकार्यावर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने खुल्या व शालेय गटात भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत मराठवाड्यातून ५८ स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्घाटन कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष इसरार सगरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून विकास बँकेचे व्हा. चेअरमन ॲड. समद पटेल, अफजल कुरेशी, बरकत काजी यांची उपस्थिती होती. ११ हजार रोख, सन्मानपत्र देऊन विजेत्यांचा गौरव स्पर्धेत खुल्या गटात प्रतीक्षा मोरे, गीता वाडकर, पंकज पांडुळे, उत्तेजनार्थ कार्तिक दरोडे, शालेय गटात जान्हवी कर्डिले, भाविका जाधव, प्रवीण बिराजदार, उत्तेजनार्थ उमेशा सय्यद हिने अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. त्यांना प्रथम पारितोषिक ११०००, द्वितीय ७००० व तृतीय ५००० रुपये रोख व सन्मानपत्र, ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.



# लातूर केंद्रावरील राज्य नाट्य स्पर्धेचे आज थाटात उद्घाटन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** जिल्ह्यातील हौशी रंगकर्मी आणि चोखंदळ नाट्य रसिकांना प्रचंड ओढ असलेल्या ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेचे लातूर केंद्रावर आज दि. १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता उद्घाटन होणार आहे. शहरातील एकुण नाट्य वर्तुळात प्रचंड उत्साह असल्याचे वातावरण सर्वत्र दिसून येत आहे. शहरातील मार्केट यार्डातील स्व.दगडोजीराव देशमुख स्मृती सभागृहात ही स्पर्धा होणार असून १२ नाटकांचा समावेश आहे. जिल्ह्यातील हजारो कलावंत आपल्या नाट्यविष्काराने हौशी रंगभुमी गाजवून सोडणार आहेत.




सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड़ आशीष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा मोठ्या जल्लोषात लातूरनगरीत पार पडणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी दिली.

१२ दिवस दररोज सायंकाळी ७ वाजता होणाऱ्या या नाटकांना ऐतिहासीक,

**नाट्य वर्तुळात प्रचंड उत्साह**

सामाजिक, कौटुंबिक, गुढ, जहस्यमय, अशा विविध प्रकारच्या विषयांची पार्श्र्वभूमी असून लातूरच्या कलावंतांनी ही नाटके उभी करण्यासाठी प्रचंड परिश्रम घेतले आहेत.या निमित्ताने अनेक कलावंत पहिल्यांदा रंगभूमीवर दमदार पदार्पण करणार आहेत हे विशेष.

कल्याण वाघमारे-रे शुन्य मना, गणपत वेणुगोपाळ कुलकर्णी- अंतरछिद्र-द ब्लॅक होल, अभय राठोड- बेईमानी, विशाल लामतूरे-रातमतरा, प्रदीप भोकरे- घाट, संजय प् अयाचित-टेडी बिअर, प्रा. ज्योतीबा बडे-इथे ओशाळला मृत्यू, पांडूरंग वाघमारे-विसावा, प्रमोद कांबळे- विठ्ठला, सुवर्णा बुरांडे-संकेत मीलनाचा, ॲड़. शैलेश गोजमगुंडे-उन्हातलं चांदणं, महेश सबनीस-दास्ताँ यांच्या दिगदर्शनाचे कसब लातूरकर नाट्य रसिकांना अनुभवयास मिळणार आहे.संयोजन समितीने या स्पर्धेची जय्यत तयारी केली असून अधिकाधिक नाट्य रसिकांनी या आपल्या रंगकर्मींना भरघोस प्रतिसाद देण्यासाठी आवर्जुन येण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मराठा परिवाराच्या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** सकल मराठा परिवार लातूर यांच्या वतीने आयोजित भव्य रक्तदान शिबिरास रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे घेण्यात आलेल्या शिबिरात ५३ रक्तदत्यांनी या महत्वपूर्ण सामाजिक उपक्रमात रक्तदान करीत आपली सामाजिक जबाबदारी पार पाडली.

**५३ रक्तदात्यांनी केले रक्तदान**

राज्य रक्त संक्रमण परिषद महाराष्ट्र राज्य यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत आयोजित केलेल्या या शिबिरात रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन प्रथम रक्तदाते आणि सकल मराठा परिवार लातूरचे सदस्य राहुल दत्तात्रय जाधव, गंगाधर पवार, किशोर धायगुडे, बळवंत जाधव, संतोष पवार यांनी केले. शिबिरात रक्तदात्यांना अल्पोपहार आणि मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे देण्यात आली. रक्तदान शिबिरासाठी श्रीमती सरस्वती कराड रक्तपेढीचे विकास कारंजे यांचे विशेष सहकार्य लाभले.

या शिबिरातून मिळालेल्या रक्ताचा उपयोग



थॅलेसेमिया, दुर्घटना पीडित, शस्त्रक्रिया, गर्भवती माता आणि कॅन्सर पीडितांना जीवनदान देण्यासाठी केला जाईल अशी माहिती सकल मराठा परिवाराने दिली. तसेच समाजातील सर्व क्षेत्रातील नागरिकांनी रक्तदान करावे असे आवाहन केले.

श्रीमती सरस्वती रक्तपेढीचे डॉक्टर डी.बी. दाताळ, डॉ. शुभम शिवणे, विकास कारंजे, अर्जुन वाघचौरे, शिवाजी जवादे, सुचिता भागवते, अच्युत पाटील, बालाजी कराड आदींनी या रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# आएमएच्या राज्य उपाध्यक्षपदी डॉ. कल्याण बरमदेंची निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** लातूर येथील ख्यातनाम स्त्री रोग, वंध्यत्व निवारण तज्ज्ञ डॉ. कल्याण बलभीमराव बरमदे यांची आयएमएच्या महाराष्ट्र राज्याच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. ही निवड वर्ष २०२५ -२६ या वर्षासाठी केली गेली आहे. वैद्यकीय क्षेत्रात डॉ. कल्याण बरमदे यांच्या या निवडीचे स्वागत होत आहे.

शनिवारी सोलापूर येथे आयएमएच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे उपस्थित होते. यावेळी सन्माननिय अतिथी म्हणून मुंबईच्या जे.जे. हॉस्पिटलचे माजी अधिष्ठाता डॉ. कपाडिया, राष्ट्रीय सहसचिव डॉ. वसंत लुंगे, आयएमए महाराष्ट्राचे



सुधीर नणंदकर, आयएमएचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. होजी मावळते अध्यक्ष डॉ. संतोष कदम यांची उपस्थिती होती.

आयएमएच्या अध्यक्षपदी डॉ. संतोष कुलकर्णी यांची तर उपाध्यक्षपदी डॉ. कल्याण बरमदे यांची निवड करण्यात आली आहे. MASTACON 2025 या राज्यस्तरीय अधिवेशनात ही घोषणा होताच उपस्थित मान्यवरांनी त्यांचे स्वागत केले. राज्यातील डॉक्टरांच्या हक्क, सुरक्षाभान आणि व्यावसायिक प्रगतिसाठी ते सक्रियपणे काम करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या निवडीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना डॉ. कल्याण बरमदे यांनी सर्व डॉक्टरांचे एकत्र येणे अत्यंत महत्त्वाचे आहे. एकजुटीने कार्य केल्यास डॉक्टरांशी संबंधित सर्व समस्या प्रभावीपणे हाताळता येतात. आयएमए ही सर्वांची मातृसंस्था असून, ही मानाची जबाबदारी बिनविरोध मिळाल्याचा आपल्याला अभिमान आहे. सर्व सहकारी डॉक्टरांच्या समस्या सोडविण्यास आपण प्राधान्य देणार आहोत. आयएमएच्या वतीने प्रतिवर्षी सर्वसामान्य गरजू रुग्णांसाठी दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या स्मृतिदिनी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करते. तसेच या वर्षात पौगंडावस्थेतील समस्या सोडविण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये मार्गदर्शक शिबीर, एचपीव्ही वॅक्सीन (गर्भमुख कॅंसर प्रतिबंधक लस) कॅम्पस व स्त्रियांसाठी पीएपी स्मेअर म्हणजे गर्भमुख कॅंसरचा शोध घेणारी चाचणी घेण्याचे प्रयोजन असल्याचेही त्यांनी सांगितले. या निवडीबद्दल डॉ. कल्याण बरमदे यांचे वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी स्वागत केले आहे.

# कुष्ठरोग शोध मोहीम १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर दरम्यान

**शहरातील ३० हजार घरांचे होणार सर्वेक्षण**

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** प्रशासनाने निर्धारित केल्याप्रमाणे वर्ष २०२७ पर्यंत देशभरातील कुष्ठरोगाचा प्रसार शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. या अनुषंगाने नवीन कुष्ठरोग बाधित यांचा शोध घेऊन त्यांना बहुविध औषधोपचार सुरू करणे आणि रोगप्रसाराची साखळी खंडित करणे हा एकमेव प्रभावी पर्याय आहे हाच उद्देश समोर ठेवून लातूर शहर महानगरपालिकेत अंतर्गत आयुक्त श्रीमती मानसी तसेच उपायुक्त श्रीमती वसुधा फड यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत कुष्ठरोग शोध अभियान राबविण्यात येणार आहे.

यामध्ये प्रामुख्याने शहरातील ३०००० घरांचे सर्वेक्षण होणार असून एक लाख पन्नास हजार लोकसंख्येचे प्रत्यक्ष तपासणी केली जाणार आहे. याकरिता लातूर शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांमधील १६० पथके तयार केली आहेत. त्यांचे सर्वेक्षण १७ पर्यवेक्षिकामार्फत केले जाणार आहे. अति जोखमीच्या क्षेत्रांमध्ये घराघरांमध्ये हे सर्वेक्षण केले जाणार आहे. प्रत्येक घरातील स्त्रियांची तपासणी ही अशा स्वयंसेविका यांच्यामार्फत तर पुरुषांची तपासणी पुरुष स्वयंसेवक करणार आहेत. तपासणी दरम्यान संशयित रुग्णांची नोंद नोंदवही मध्ये घेतली जाणार आहे.

तसेच संशयित रुग्णांना तज्ञ डॉक्टरांकडून निदान केले जाणार आहे व त्यांना लागलीच बहुविध औषधोपचार चालू केले जाणार आहेत.

शरीरावर असणारा बधिर चट्टा तसेच इतर लक्षणे आढळल्यास या मोहिमेमध्ये सर्वांनी आपली तपासणी करून घ्यावी व आजारास घाबरून न जाता वेळेत औषधोपचार सुरू करावेत. बहुविध औषधोपचाराने कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार असल्याचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांनी सांगितले आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे आपल्या घरी येणाऱ्या स्वयंसेवकांना योग्य ते सहकार्य करावे आणि वेळेत निदान उपचार करून घ्यावे असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

# लातूर जिल्ह्यात कृत्रिम वाळूचे प्रकल्प होणार दुप्पट

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** राज्यात कृत्रिम वाळूचा वापर वाढावा तसेच दर्जाहीन कृत्रिम वाळूवर थेट कारवाई व्हावी, यासाठी मूळ धोरणात सुधारणा करण्यात आली आहे. एम-सँड युनिटला मान्यता तसेच या पद्धतीच्या युनिटला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हास्तरीय मर्यादा ५० वरून १०० युनिटपर्यंत नेण्याचा अधिकार आता जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे.

यापूर्वीची ५० जणांना मान्यता देण्याची मर्यादा वाढविण्यात आल्याने नवीन उद्योजकांनाही संधी मिळणार आहे. दिवसेंदिवस वाळूची उपलब्धता कमी असल्याने परराज्यातून वाळू आणली जात आहे. शिवाय, स्थानिक नद्या, नाल्यांचा उपसा मोठ्या प्रमाणात झाल्याने वाळूघाट काढण्यासाठी जिल्हा प्रशासनाला ठिकाणे शोधावी लागत आहेत. लातूर जिल्ह्यात मागील जवळपास १० वर्षांपासून वाळू घाटांची संख्या बोटावर मोजण्याइतकी शिल्लक राहिली नाही. सध्या मिळत असलेली वाळू आणि एम सँड यांच्या दरातील तफावत मोठी आहे. सर्वसामान्यांना बांधकामासाठी वाळू वापरणे आवाक्याबाहेर गेले आहे. यातून बांधकामांचे बजेट कोलमडत चालले आहे. शासनाने व न्यायालयाने पर्यावरणपूरक मानके लागू केल्यामुळे नदीच्या पात्रात आढळणाऱ्या वाळूची उपलब्धता मर्यादित झाली आहे.

त्यामुळे नदीपात्रातून निघत असलेल्या वाळूची जागा घेऊ शकेल अशा दर्जेदार बांधकामायोग्य वाळूची गरज कृत्रिम वाळूद्वारे पूर्ण केली जाऊ शकते. नैसर्गिक वाळूसाठी कृत्रिम वाळू किंवा एम-सेंड ही सर्वात योग्य पर्यायी सामग्री आहे. म्हणून एम-सेंडला प्रोत्साहन देण्यासाठी धोरण तयार करण्यात आले आहे. शासकीय जमिनीचा एम-सॅड युनिटसाठी लिलाव करताना त्यात केवळ महाराष्ट्रात नोंदणीकृत संस्थांनाच भाग घेता येईल.

उद्योजकांना प्रति ब्रास ४०० रुपयांची सवलत औद्योगिक प्रोत्साहन अनुदान दिले जाणार आहे. त्यात व्याज अनुदान, वीज दर अनुदान, विद्युत शुल्क सवलत, मुद्रांक शुल्क माफी, रॉयल्टीमध्ये ४०० रुपये प्रति ब्रास सवलत मिळणार आहे. शासकीय व निमशासकीय बांधकामांमध्ये सध्या एम-सेंडचा २० टक्के वापर बंधनकारक असून, टप्प्याटप्याने १०० टक्के होईल. आतापर्यंत संकेतस्थळावर नवीन १४ जणांनी अर्ज केले आहेत. अर्ज करण्यासाठी संकेतस्थळावर जाऊन सध्या अर्ज स्वीकृती सुरू आहे. प्रायव्हेट लँड हा पर्याय निवडून अर्ज करावा.

## खंडोबा देवस्थान यात्रा महोत्सवाचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी जय मल्हार खंडोबा देवस्थान मोती नगर, लातूर येथे खंडोबा यात्रा महोत्स्वाचे आयोजन केले आहे. निलेशजी भैय्या ठक्कर (खंडोबा समितीचे अध्यक्ष) यांच्या शुभहस्ते पालखी मिरवणूकीची आरती होणार आहे. तरी मोतीनगर भावीक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन नामदेव मामा चाळक, गोरोबा गाडेकर, जयराम सुर्यवंशी, अनिल धुमाळ, प्रमोद काळे, भैरवनाथ कदम आदींनी केले आहे.



## अनधिकृत पार्किंगवर कार्यवाही

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** वाढती वाहतूककोंडी लातूरकरांसाठी डोकेदुखी बनली आहे. त्याचबरोबर रिंगरोड, सर्व्हिस रोडवर असलेले अतिक्रमण यामुळे वाहनधारकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. लातूर शहरातील प्रमुख चौकांसह रिंगरोडची वाहतूक कोंडी कशामुळे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

वाहतूक शाखेचे कर्मचारी कोंडी सोडविण्यात कमी पण चलन फाडण्यात अधिक मश्गुल असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. शहरात वाहतूक शिस्त प्रस्थापित करण्यासाठी उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय, लातूर शहर यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक नियंत्रण शाखेद्वारे १५ दिवसांची विशेष ई-चलान मोहीम सुरू करण्यात आली आहे. शहरात बेशिस्तपणे पार्किंग करणारी चार चाकी, दुचाकी वाहने तसेच रिंगरोडच्या सर्व्हिस रोडवर अनधिकृत पार्किंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा या मोहिमेचा उद्देश आहे. १४ नोव्हेंबर रोजी पहिल्याच दिवशी ॲटो रिक्षांच्या थकीत ई-चलान दंडाची वसुली करण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात आल्याचे पोलिस निरीक्षक विठ्ठल दराडे यांनी सांगितले.

# प्लास्टिकमुक्त लातूरसाठी 'माझं घर'च्या विद्यार्थ्यांचा जागर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ नोव्हेंबर :** वाढत चाललेली प्लास्टिक कचऱ्याची समस्या व त्यामुळे निर्माण होणारी पर्यावरणाची हानी याबद्दल समाजात जनजागृती करण्यासाठी व पर्यावरणाला घातक ठरणाऱ्या प्लास्टिक पासून लातूर मुक्त करण्यासाठी माणूस प्रतिष्ठान संचलित माझं घरच्या विद्यार्थ्यांनी अनोखा वसा उचलला आहे.

शिक्षणापासून वंचित विद्यार्थ्यांसाठी चालवल्या जाणाऱ्या माझे घरच्या विद्यार्थ्यांनी प्लास्टिक मुक्तीसाठी अनोखी अभियान हाती घेतले असून रविवारी सकाळी काशीलिंगेश्वर नगर परिसरात प्लास्टिकमुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, पर्यावरणाचा ऱ्हास, वाढते प्रदूषण नागरिकांना समजावून सांगत प्लास्टिकचा वापर न करण्याचे आवाहन करत ग्रामपंचायत समोरील ग्रीन बेल्ट व परिसरात स्वच्छता करण्यात आली.

या परिसरात घंटागाडी येत नसल्याने कचऱ्याची समस्या निर्माण झाली असून कचऱ्याचे ढीग जमा होत आहेत. स्वच्छता अभियाना दरम्यान मोठ्या



प्रमाणामध्ये प्लास्टिकचा कचरा गोळा करण्यात आला.

प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी सकाळी सहा वाजता औसा तालुक्यातील बुधोडा येथून काशीलिंगेश्र्वर नगर पर्यंत प्लास्टिक मुक्तीचा जागर करणारी पर्यावरण संवाद सायकल रॅली काढली. रॅली दरम्यान विद्यार्थ्यांनी हम सब एक है प्लास्टिक मुक्त लातूर झालेच पाहिजे, झाडे लावा झाडे जगवा, सायकल चालवा, पर्यावरण वाचवा, सायकल चालवा आरोग्य वाचवा, आपले आरोग्य आपल्या हाती अशा घोषणा दिल्या. अहिल्यादेवी होळकर चौकात कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे, साहित्यिक डॉ. जयद्रथ जाधव, सायक्लिस्ट मदन बरुरे, सेवानिवृत्त वनअधिकारी शिवाजी गिरी यांनी सायकल रॅलीचे स्वागत केले.

**काशीलिंगेश्वर नगरमध्ये स्वच्छता अभियान**

लातूर प्लास्टिक मुक्त करण्यासाठी माझं घर ने पुढाकार घेतला असून अनेक सुजाण नागरिक सहभागी होत आहेत. दर रविवारी शहरातून प्लास्टिक मुक्त रॅली काढण्यात येणार असून या मोहिमेत



समस्त लातूरकरांनी सहभागी होण्याचे आवाहन शरद झरे यांनी यावेळी केले.

दिवाळीमध्ये फटाकेमुक्त दिवाळीचा संदेश देत लातूर जिल्ह्यातून सायकल रॅली काढून वेगवेगळ्या गावात पर्यावरण संवर्धनाबाबत नागरिकांशी संवाद साधत जनजागृती केली. यांच्या आव्हानाला प्रतिसाद देत जिल्ह्यातील जवळपास चाळीस गावातील गावकऱ्यांनी पर्यावरण पूरक फटाके मुक्त दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घेतला. जुन्या कपड्यापासून माझं घर मध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हजारो कापडी पिशव्यांचे वाटप करून जनजागृती केली जाते.

रविवारी काशीलिंगेश्वर नगर मधील स्वच्छता अभियानादरम्यान मोठ्याप्रमाणावर कचरा गोळा करण्यात आला. या अभियानात माझे घरचे प्रमुख शरद झरे, प्रा. डॉ. विनोद चव्हाण, पोलीस चिंतामणी पाचपुते, सुधाकर पाटील, प्रशांत जाधव, भोसले, चंद्रकांत हेरकर, सुहास देशपांडे यांच्यासह परिसरातील विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# एमजीएमच्या सरबजोत याने पूर्ण केली आयर्नमॅन स्पर्धा




छत्रपती संभाजीनगर, दि.१६ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इंस्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी'च्या एआयएमएल अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षात वर्षात शिकणारा विद्यार्थी सरबजोत सिंह कोहली याने 'आयर्नमॅन ७०.३' ही स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली आहे. अशी स्पर्धा पूर्ण करणारा सरबजोत हा एमजीएम विद्यापीठाचा पहिला विद्यार्थी ठरला आहे.

'आयर्नमॅन ७०.३' ही स्पर्धा अत्यंत अवघड असून गोवा येथे झालेल्या स्पर्धेत सरबजोत याने ही स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली. या स्पर्धेत सायकल, स्विमिंग आणि रनिंग अशा तिन्ही स्पर्धेतील एकत्रित कामगिरीच्या आधारे 'आयर्नमॅन ७०.३' हा किताब प्रदान करण्यात येतो. विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई, संचालक नितीन घोरपडे व सर्व संबंधितांनी सरबजोत याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## प्रा.फरहद शाहीन मसुद खान यांना पीएचडी प्रदान



छत्रपती संभाजीनगर, दि.१६ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या बेसिक अँड अप्लाईड सायन्सच्या भौतिकशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापिका फरहद शाहीन मसुद खान यांना पीएचडी प्रदान करण्यात आली आहे. प्रा.फरहद शाहीन मसुद खान यांनी भौतिकशास्त्र विषयात 'इन्वेस्टिगेशन ऑफ डायलेकट्रिक प्रॉपर्टीज ऑफ सोडिक सॉईल ॲट सी - बँड मायक्रोवेव्ह फ्रिक्वेन्सी' या विषयावर आपले संशोधन केले आहे. त्यांनी महात्मा गांधी मिशन विद्यापीठातून डॉ.क्रांती झाकडे यांच्या मार्गदर्शनाखाली आपली पीएचडी पूर्ण केली आहे. प्रा.फरहद शाहीन मसुद खान यांनी पीएचडी प्राप्त केल्याबद्दल त्यांचे विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.एच.एच.शिंदे, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, अधिष्ठाता डॉ.प्राप्ती देशमुख, प्राचार्या डॉ. विजया मुसांडे, संचालिका डॉ. परमिंदर कौर व सर्व संबंधित प्राध्यापक व सहकाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## प्रॉडक्ट पोर्टफोलिओचा विस्तार केला

नाशिक : भारतात परवडणाऱ्या सुंदरतेला नवीन दिशा देण्यासाठी, इंडिका ईझीदेशातील नंबर १ शँपू हेअर कलर ब्रँड ने दोन नवीन शेड्स - नॅचरल ब्राऊन आणि बर्गंडी, फक्त १० मध्ये लॉन्च केले आहेत. या लॉन्चसह, केविनकेयर ग्राहकांना इनोव्हेटिव्ह पर्सनल केअर सोल्यूशन्स देण्याची पारंपरिक प्रथा सुरू ठेवत आहे. नवीन १० सॅशेजसह, इंडिका ईझी फक्त १० मिनिटांत सॅलून-क्वालिटी हेअर कलर उपलब्ध करून देते, जे आजच्या गतिमान जीवनशैलीसाठी योग्य आहे.या प्रसंगी श्री रजत नंदा, बिझनेस हेड - पर्सनल केअर, केविनकेयर यांनी सांगितले: केविनकेयरमध्ये, आम्ही नेहमी सुंदरता सर्वांसाठी सुलभ बनवण्यावर विश्वास ठेवला आहे. आमच्या नवीन १० इंडिका ईझी शेड्सचा लॉन्च या दृष्टीकोनाचा भाग आहे, जो ग्राहकांना सहज समृद्ध आणि दीर्घकालीन रंगाचा अनुभव देतो. इंडिका अनेक वर्षांपासून या श्रेणीतील अग्रगण्य ब्रँड आहे, आणि आम्ही सर्वोत्तम मूल्य आणि गुणवत्ता देत ही स्थिती मजबूत करत राहतो.

## बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपा सह मित्रपक्षांना संपुर्ण बहुत मिळाल्यामुळे सोयगावात जल्लोष साजरा



सोयगाव,दि.१६ नोव्हेंबर : बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपा सह मित्रपक्षांना संपुर्ण बहुत मिळाल्यामुळे सोयगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भारतीय जनता पक्षाच्यावतीने फटाके फोडून,मिठाई वाटून जल्लोष साजरा करण्यात आला,याप्रसंगी भाजपा जिल्हा चिटणीस सुनिल गावंडे, ज्येष्ठ नेते वसंत आप्पा बनकर,शहराध्यक्ष मंगेश सोहनी,तालुका खरदी वि.संघ संचालक मयुर मनगटे,प्रमोद पाटील,संजय चौधरी,बापू काळे,सुनील ठोंबरे,संजय आगे,जयेश पाटील,राहुल परदेशी,अस्लम पिंजारी,थोटे,सुदाम कल्याणकर,सचिन राठोड,मंगेश तेली आदी पदाधिकारी उपस्थितीत होते.

## 'ताठ कणा' मध्ये दिसणार उमेश आणि दिप्तीची जोडी

छत्रपती संभाजीनगर - सिनेसृष्टीतील प्रत्येक कलाकाराची आपली एक वेगळी इमेज आहे. प्रत्येकजण एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण भूमिकेसाठी ओळखला जातो. पण हेच कलाकार जेव्हा अनपेक्षितपणे एखाद्या वेगळ्या भूमिकेत दिसतात तेव्हा सर्वांच्याच अपेक्षा उंचावतात. नेहमीच वेगळ्या धाटणीचे तसंच आशयघन चित्रपटांच्या शोधात असणारे अभिनेता उमेश कामत आणि अभिनेत्री दिप्ती देवी हे दोन कलाकार 'ताठ कणा' या चित्रपटात एका वेगळ्या रूपात प्रेक्षकांना भेटणार आहेत. जगप्रसिद्ध शल्यचिकित्सक डॉ. प्रेमानंद रामाणी यांचा जीवनपट उलगडून दाखविणाऱ्या 'ताठ कणा' या आगामी मराठी चित्रपटातून हे दोघे पहिल्यांदाच जोडीच्या रूपाने प्रेक्षकांसमोर येत आहेत. हा चित्रपट २८ नोव्हेंबरला प्रदर्शित होणार आहे. 'प्रज्ञा क्रिएशन्स'चे विजय मुडशिंगीकर व 'स्प्रिंग समर फिल्मस'चे करण रावत यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे.

# माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांचे कार्य राज्याला दिशादर्शक - देवेंद्र फडणवीस

## हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

छत्रपती संभाजीनगर, दि.१६ :- महाराष्ट्राचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेले स्वर्गीय वसंतराव नाईक यांनी राज्याच्या दुष्काळमुक्तीसाठी केलेली जलसंधारणाची कामे तसेच अन्नधान्यांमध्ये स्वयंपूर्णतेसाठी राबविलेल्या उपक्रमांचा आजही राज्याला मोठा लाभ होत आहे. राज्याला दिशा देणारे आणि परिवर्तनाची प्रेरणा देणारे त्यांचे कार्य खऱ्या अर्थाने दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.




छत्रपती संभाजीनगर शहरातील सिडको येथे हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते आज झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, खासदार संदिपान भुमरे, खासदार डॉ. कल्याण काळे, खासदार डॉ. भागवत कराड, आमदार संजय केणेकर, आमदार अनुराधा चव्हाण, माजी आमदार हरिभाऊ राठोड, माजी महापौर नंदकुमार घोडेले, विकास जैन, माजी उपमहापौर प्रमोद राठोड, मनपा आयुक्त जी. श्रीकांत उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा राज्याच्या जडणघडणीमध्ये मोलाचा वाटा आहे. राजकारणात विविध पदावर काम करताना महाराष्ट्र स्वयंपूर्ण करण्याचे देखील काम केले. बंजारा समाजामध्ये मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण केली. समाजाला शिक्षणाकडे वळविण्यासाठी अनेक शिक्षण संस्थांची निर्मिती केली असून समाजातल्या विविध परंपरा जोपासल्या पाहिजेत यासाठीही त्यांनी प्रयत्न केला, राजकीय सामाजिक जीवनामध्ये नगराध्यक्ष पदापासून आमदार, खासदार, मुख्यमंत्री अशा विविध पदांवर नाईक साहेबांनी काम केले. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सर्वाधिक काळ राहिलेले मुख्यमंत्री म्हणून स्वर्गीय नाईक साहेबांच्या नावाची नोंद असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यातील १९७२ च्या भीषण दुष्काळात राज्याला जलसंधारणातून दुष्काळमुक्त करण्याचा निर्णय स्वर्गीय वसंतराव नाईक यांनी घेतला.महाराष्ट्र दुष्काळमुक्त करायचा असेल तर जलसंधारण हाच एकमेव मार्ग आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब साठवा, जमिनीतील पाणी वाढवा, वाहून जाणारी माती रोखा तरच शेतकरी बांधवांना दिलासा मिळेल, असा विचार त्यांनी रूजविला. स्वर्गीय वसंतराव नाईक साहेबांनी राज्यात




व्यापक स्वरूपात जलसंधारणाची कामे सुरू करून जलक्रांतीची पायाभरणी केली. महाराष्ट्र अन्नधान्यांच्या बाबतीत समृद्ध व स्वयंपूर्ण व्हावा, हा त्यांचा स्पष्ट हेतू होता. महाराष्ट्राला स्वयंपूर्ण करून मोठे परिवर्तन घडवून आणले आणि ते पुढील पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरले. दुष्काळाचा सामना करताना इतिहासाचा मागोवा घेतल्यावर हे प्रकर्षाने जाणवले की, दुष्काळाशी लढण्याचा खरा मार्ग म्हणजे नाईक साहेबांनी दाखविलेला जलसंधारणाचा मार्ग. त्याच प्रेरणेने पुढे जलयुक्त शिवार ही राज्यव्यापी योजना तयार करण्यात आली. या योजनेद्वारे महाराष्ट्रभर जलसंधारणाची मोठ्या प्रमाणावर कामे झाली. योजना तयार करत असताना अनेक व्यक्ती प्रेरणास्थान म्हणून आमच्यासमोर होत्या; परंतु या संपूर्ण उपक्रमामागील मूळ प्रेरणास्थान म्हणजे वसंतराव नाईक साहेबच, हे आपण त्या काळातही स्पष्टपणे नमूद केल्याचा उल्लेखही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केला.

स्वर्गीय वसंतराव नाईक साहेबांनी राज्यात कृषी व जलसंधारणाबरोबरच बंजारा समाजासाठीही मोठ्या प्रमाणात जागृती व विकासाची चळवळ उभी केली. तांड्यावर राहणारा, परंपरेने श्रमप्रधान पण विकासापासून दूर राहिलेला हा समाज एकेकाळी मार्गनिर्मिती, बावड्या बांधकामे आणि पायाभूत कामांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारा, समृद्ध इतिहास असलेला समाज आहे. पोहरादेवी येथे सेवालाल महाराजांनी बंजारा समाजासाठी निर्माण केलेली 'काशी' अधिक भव्य, आधुनिक आणि जागतिक स्तरावर ओळख निर्माण करणारी व्हावी, यासाठी सरकारने विकास आराखडा राबविला आहे. त्यामुळे पोहरादेवीचा संपूर्ण कायापालट झाला असून आज ते राज्यातील महत्त्वाचे सांस्कृतिक व आध्यात्मिक केंद्र बनले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी प्रथमच बंजारा काशी पोहरादेवीला भेट देत म्युझियमचे उद्घाटन केले. याशिवाय म्युझियममध्ये प्रवेश करताना पहिला पुतळा स्वर्गीय वसंतराव नाईक साहेबांचा स्थापित करण्यात आला आहे. समाजउन्नती, जागृती आणि परिवर्तनाची ज्योत प्रज्वलित करणाऱ्या नाईक साहेबांच्या कार्याचा हा सन्मान असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

पालकमंत्री संजय शिरसाट म्हणाले, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडून आज स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण होत आहे, हा दिवस खऱ्या अर्थाने बंजारा समाजासह आपल्या सर्वांसाठी दिवाळीप्रमाणेच आहे. महानगर वेगाने वाढत असून महानगर सुंदर झाले पाहीजे, कुंभमेळ्यासाठी येणारे भाविक छत्रपती संभाजीनगर येथे येतील, त्यादृष्टीने शहराच्या रस्ते तसेच सर्वांगिण विकासासाठी निधीची तरतूद गरजेची असल्याचे ते म्हणाले. स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा पुतळा आपल्या सर्वांना प्रेरणा देईल, असेही ते म्हणाले.

# शेतकरी बांधवांनी सेंट्रल बँकेच्या विविध कर्ज योजनांचा लाभ घ्यावा : राजू नयन

## कृषी कर्ज वितरण शिबिरात शेतकरी, उद्योजक व बचतगटांना ११ कोटी रुपयांचे कर्जवाटप

अहिल्यानगर : राष्ट्रीयकृत बँकांमध्ये अग्रगण्य व जिल्ह्याची लीड बँक असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या कृषी उन्नतीसाठी विविध कर्ज योजना उपलब्ध असून त्यांचा शेतकरी बांधवांनी तसेच कृषी आधारित उद्योग व बचत गटांनी लाभ घ्यावा असे आवाहन अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालयाचे प्रमुख राजू नयन यांनी केले.




जोर्वे (ता. संगमनेर) येथे आयोजित मेगा कृषी कर्ज वितरण शिबिर व शेतकरी मेळाव्यास उपस्थित शेतकरी, शेतीपूरक उद्योजक आणि बचत गटांना मार्गदर्शन करताना श्री नयन बोलत होते.

भारत हा कृषिप्रधान देश असून महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्हा सहकार व कृषी क्षेत्रात अग्रेसर आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी व उत्पन्न वाढीसाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया सातत्याने उपक्रम राबवत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आयोजित केलेल्या या मेळाव्यात ५७ लाभार्थ्यांना कृषी कर्ज योजनांच्या माध्यमातून ११ कोटींचे विविध कृषी कर्ज वाटप करण्यात आले असल्याचे श्री. नयन यांनी सांगितले.

यामध्ये कुक्कुटपालन, झचत्रऋ्वए, -खत्रऋ्, छक्क्ह, डेअरी, स्वयंसहायता गट, कृषी पायाभूत सुविधा आदींचा समावेश आहे.

मेळाव्यात तालुका कृषी अधिकारी श्रीम. बोडके, तंत्र अधिकारी किरण विरकर, अग्रणी बँकेचे व्यवस्थापक आशिष नवले, उमेदचे कुंदन कोरडे, आरसेटी संचालक आर. जी. देशमुख, बाप कंपनीचे संचालक भाऊसाहेब घुगे आदी उपस्थित होते. अग्रणी बँकेचे व्यवस्थापक आशिष नवले यांनी उपस्थितांना विविध कृषी कर्ज योजनांची माहिती दिली. यामध्ये कोल्ड स्टोरेज प्रकल्प, पोल्ट्री फार्मिंग योजना, फूड प्रोसेसिंग, किसान वाहन योजना, पीएम-कुसुम, कृषी पायाभूत सुविधा निधी, बचतगट कर्ज योजना इत्यादी मार्फत कृषी व कृषी परक व्यवसायासाठी वित्तपुरवठा उपलब्ध करून दिला जातो.

यावेळी भाऊसाहेब घुगे, किरण विरकर आणि कुंदन कोरडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश पर्बत यांनी केले तर आभार प्रदर्शन क्षेत्रीय विभागाचे मुख्य प्रबंधक हरिपाल अडसूळ यांनी मानले.

## अतिजोखमीच्या गर्भवती महिलांवर यशस्वी उपचार, आई व बाळांचे प्राण वाचवण्यात यश






छत्रपती संभाजीनगर - छत्रपती संभाजीनगर येथील मेडीकव्हर हॉस्पिटलमध्ये अतिजोखमीच्या गर्भवती महिलांवर यशस्वी उपचार करून आई व बाळांचे प्राण वाचवण्यात वैद्यकीय टीमला मोठे यश मिळाले. रुग्णालयात अत्याधुनिक सुविधा आणि बहुविभागीय तज्ज्ञ एकाच ठिकाणी उपलब्ध असल्याने गुंतागुंतीच्या प्रकरणांवर प्रभावीरीत्या उपचार शक्य झाले.

४० वर्षीय महिलेला तिळे गर्भ होते आणि २६व्या आठवड्यात रक्तदाब वाढल्याने प्रसूतीपूर्व गुंतागुंत निर्माण झाली होती. तीन गर्भांपैकी एक बाळ दगावण्याची शक्यता निर्माण झाली; मात्र १५ दिवस विशेष उपचारानंतर प्रसूती करून दोन बाळांना एनआयसीयूमध्ये यशस्वीरीत्या वाचवण्यात आले. ३४ वर्षीय दुसऱ्या रुग्णेला २२व्या आठवड्यात पाणी जाण्याची समस्या निर्माण झाली होती. साधारणपणे अशावेळी गर्भपात केला जातो; मात्र कुटुंबीयांच्या विनंतीनुसार हॉस्पिटल टीमने विशेष निगराणीखाली २९व्या आठवड्यापर्यंत गर्भ वाढवला. सर्दी-खोकल्यामुळे इन्फेक्शनचा धोका वाढल्याने सिझेरियन प्रसूती करण्यात आली. बाळाला दीड महिना एनआयसीयूमध्ये उपचारानंतर दोघेही सुरक्षित घरी परतले. तिसऱ्या गंभीर प्रकरणात ३० वर्षीय महिलेला गर्भाशय फाटल्यामुळे आणि गर्भाचे डोके पोटात गेल्याने जीवाला मोठा धोका निर्माण झाला होता. तातडीने मेडिको-लिगल प्रक्रिया पूर्ण करून गर्भाशय काढण्याची मोठी शस्त्रक्रिया करण्यात आली. चार रक्तपिशव्या व रक्तघटक देत महिलेचे प्राण वाचवण्यात डॉक्टरांना यश आले.

डॉ. जानकीदेवी बोराडे यांनी आणखी दोन दुर्मिळ प्रकरणांवर उपचार केले. एका गर्भवतीच्या अंडाशयात १८×३० सेमीची गाठ असूनही दुर्बिणीद्वारे यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. तर दुसऱ्या महिलेला गर्भावस्थेत झालेल्या गंभीर कावीळ व रक्तस्रावामुळे जीवाला मोठा धोका निर्माण झाला होता. तब्बल ४६ रक्तघटक देत, आयसीयू उपचार, डायलिसिस आणि बहुविभागीय टीमवर्कमुळे ती महिला सुरक्षितपणे बरी झाली. मेडीकव्हर हॉस्पिटलमधील स्त्रीरोग, नवजात शिशू, आयसीयू व इतर विभागांच्या समन्वयातून अतिजोखमीच्या आई-बाळांना यशस्वीरीत्या वाचवण्यात आले.

## जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात ट्राफीक जाम

फर्दापूर . छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात ट्राफीक जाम छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अवजड वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढल्या मुळे अजिंठा घाटात नेहमी अवजड वाहतूक मुळे घाट जाम होत आहे शनिवारी रात्री चार अवजड वाहनं यांच्या किरकोळ अपघात झाले तर दोन अवजड वाहने खराब झाली रविवार संध्याकाळी एक अवजड वाहने ट्राला अवजड वाहतूक करीत असताना तो खराब झाला असून याठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक खोळंबली होती यात रविवार असल्याने जगप्रसिद्ध अजिंठा येथे येणारे पर्यटक लेणी पाहून जात असताना या ट्राफीक मध्ये अडकले होते यात काही पर्यटक यांची छत्रपती संभाजीनगर हुन विमान सुटण्याची घाई तर काही रुग्णवाहिका हि अडकले होते.

# नियम सागर महाराज यांचा चातुर्मास समापन आणि पिछी परिवर्तनाचा कार्यक्रम भक्तिभावात संपन्न

छत्रपती संभाजीनगर - पार्श्वनाथ ब्रह्मचर्य आश्रम जैन गुरुकुल येथे परमपूज्य १०८ नियम सागर महाराज, ऋषभ सागर महाराज, अभिनंदन सागर महाराज आणि सुपार्श्व सागर महाराज यांच्या चातुर्मास समापनाचा आणि पिछी परिवर्तनाचा कार्यक्रम भक्तिभावात पार पडला. वर्षभर धारण केलेली मयूर पिछी ही प्राणी संयमाचे प्रतीक मानली जाते. महाराजांची जुनी पिछी मिळणे हा मोठा आध्यात्मिक सन्मान मानला जातो.




कार्यक्रमाला राजस्थानचे उद्योगपती अशोक पाटणी आणि सुशीला पाटणी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. आचार्य विद्यासागर महाराज यांच्या प्रतिमेचे अनावरण तसेच महाराजांच्या पाद प्रक्षालनाचा मान प्रमुख अतिथींना मिळाला. चातुर्मास काळात कार्य करणाऱ्या समिती सदस्यांचा सन्मानही करण्यात आला.

नवीन मयूर पिछीचे अनावरण श्रावकांमधून करण्यात आले. जुनी पिछी मिळण्याचा सन्मान वसंत आणि मीना मनोरकर, अनिल आणि वंदना चाकोते तसेच त्यांच्या परिवाराला मिळाला. ऋषभ सागर महाराजांची पिछी राजेंद्र आणि कल्पना अंबरकर यांना प्रदान करण्यात आली. नियम सागर महाराजांची जुनी पिछी सरोजनी कोथळे, दीपाली पंचवटकर आणि कांता आवटे यांना प्रदान झाली.

आचार्य विद्यासागर महाराजांच्या लेखनावर आधारित विद्यामृत ग्रंथाचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. चातुर्मास समितीचे अध्यक्ष दिनेश गंगवाल आणि डॉ. प्रेमचंद पाटणी यांनी मनोगत व्यक्त केले.

आपल्या मंगल प्रवचनात नियम सागर महाराजांनी प्राणी संयम आणि इंद्रिय संयमाचे महत्त्व प्रतिपादित केले. क्रोध, मान, माया, लोभ आणि अज्ञानाचा त्याग म्हणजे सम्यक दर्शनाचे स्वरूप असल्याचे सांगत त्यांनी अहिंसा आणि मानवतेचे पालन करण्याचे आवाहन केले.


सोलापूर तरुण भारत — CHANGE IN NAME

I HAVE CHANGING MY NAME FROM
OLD NAME
SADIYA JAMIRODDIN SHAIKH
TO
NEW NAME
SADIYA AKRAM SHAIKH
AS PER MY DOCUMENTS
ADDRESS :- MAKRANPUR TQ KANNAD DIST AURANGABAD (MAHARASHTRA) 431103



**जाहिर प्रगटन**

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२५/मशाका/जमाबंदी- १/जन्म-मृत्यु नोंद/मिआर-१०३
उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड
दिनांक ०३/११/२०२५

अर्जदार ०:- अनरम मुबारक बेग रा.गार का बंगला कन्नड ता. कन्नड जि.छ.संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०: नगर परिषद कार्यालय कन्नड ता. कन्नड ता. कन्नड जि. छ.संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ / ॲड. मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगाचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा मुलगा अब्दुलहक अकरम वेग चा जन्म दिनांक २४-०९-२०२३ रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगा चा जन्म दिनांक २४-०९-२०२३ रोजी कन्नड ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना श्रामकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस मुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा अब्दुलहक अकरम वेग यांचा जन्म दिनांक २४-०९-२०२३ रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजन/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १७-१२-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोदबाबा, मुदनीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक २४-०९-२०२३ रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ..../११/२०२५ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता


# टोयोटा किर्लोस्कर मोटरतर्फे ११ शाळांना शालेय साहित्य व पायाभूत सुविधा वाटप










छत्रपती संभाजीनगर, १४ नोव्हेंबर : बालदिनानिमित्त टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम)ने शहरातील ११ सरकारी शाळांना सुधारित पायाभूत सुविधा आणि शालेय साहित्य प्रदान करून शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. कंपनीच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) अंतर्गत राबविण्यात आलेल्या या प्रकल्पाचा उद्देश विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, प्रेरणादायी आणि सर्वसमावेशक शिक्षण वातावरण तयार करणे हा आहे.

टीकेएमच्या 'चाइल्ड-टू-कम्युनिटी' दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचा प्रयत्न असून या अंतर्गत वर्गखोल्यांचे सुधारित साहित्य, अध्ययनासाठी सहाय्यक सामग्री, मध्यान्ह भोजन सुविधा आणि अभ्यसनेत्तर क्रियाकलापांना प्रोत्साहन देणाऱ्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

चिंचोली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झालेल्या कार्यक्रमात जिल्हा परिषद शिक्षण अधिकारी (प्राथमिक) जयश्री चव्हाण, स्थानिक शालेय अधिकारी आणि टीकेएमच्या सीएसआर विभागाच्या उपस्थितीत सुविधांचे औपचारिक वितरण करण्यात आले.

टीकेएमच्या योगदानाचे कौतुक करत शिक्षण अधिकारी जयश्री चव्हाण म्हणाल्या, कंपनीने दिलेल्या मदतीमुळे शाळांमधील मूलभूत सुविधा सुधारतील आणि विद्यार्थ्यांच्या दैनंदिन शिक्षण प्रक्रियेत प्रत्यक्ष बदल दिसून येईल. अशा कॉर्पोरेट सहकार्यामुळे सार्वजनिक शिक्षण प्रणाली अधिक बळकट होण्यास मदत होते. या उपक्रमाबाबत टीकेएमचे वरिष्ठ उपाध्यक्ष व मुख्य संप्रेषण अधिकारी सुदीप दळवी म्हणाले, दर्जेदार शिक्षण हा सक्षम समाजाचा पाया आहे. तळागाळातील शाळांचे वातावरण उन्नत करून आणि शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या सुविधा उपलब्ध करून टीकेएम राष्ट्रीय विकास ध्येयांमध्ये योगदान देत आहे. आमचा उद्देश मुलांना भविष्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि आत्मविश्वास देऊन सक्षम करणे हा आहे.

## रोखठोक

दिनेश गुणे

# राजा आणि त्याचा लाडका पोपट!

मौखिक किंवा लिखित साहित्य हे सहसा कालसुसंगत असते असे म्हणतात. त्या त्या सांगितल्या, लिहिल्या जाणाऱ्या साहित्यात त्या त्या काळातील वर्तमानाचे प्रतिबिंब असते, असे बहुधा दिसते. पण ते संपूर्ण खरे नाही. गेल्या अनेक दशकांपासून सांगितल्या गेलेल्या लोककथा, पुराणकथांमधील भाष्य कालातीत असते, असेही अनेकदा दिसून येते. हे साहित्य भूतकाळात जन्माला आलेले असले, तरी वर्तमानकाळाचेही प्रतिबिंब त्यामध्ये उमटलेले आढळते. इतकेच नव्हे, तर भविष्यकाळातही हे साहित्य तितकेच कालसुसंगत ठरेल याची साक्षदेखील पटून जाते. त्यामुळेच, वर्तमानकाळात जेव्हा काही घटना घडतात, तेव्हा भूतकाळात जन्माला आलेल्या त्या कालातीत साहित्यातील साम्यस्थळे जिवंत होतात, त्यातील ताजेपणा जसाच्या तसा जाणवू लागतो आणि हे साहित्य अजरामर का असते याची उत्तरेही सापडतात. उदाहरणादाखल, 'राजा आणि त्याचा लाडका पोपट' नावाच्या एका अजरामर गोष्टीकडे पाहता येईल. ती गोष्ट आपल्या पुढच्या पिढीला सांगितली नाही अशी पिढी सापडणार नाही आणि वडिलधाऱ्यांकडून ती गोष्ट ऐकली नाही, अशी नवी पिढीदेखील अभावानेच आढळेल. जसे लाकूडतोड्या आणि त्याची कुऱ्हाड ही गोष्ट कालातीत आहे, तितकीच राजा आणि त्याचा लाडका पोपट ही गोष्टदेखील कालातीत आहे. वर्तमानात या गोष्टीच्या कालातीततेचे दर्शन घडविणारे काही प्रसंग आसपास घडतात, तेव्हा ती गोष्ट प्रकर्षाने आठवते.

या गोष्टीतील एका राजाच्या पदरी अनेक सेवक होते, नोकर होते, चाकर होते, सरदार, मनसबदार होते, खबरे आणि हुजरे तसेच काही सल्लागारदेखील होते. त्यांच्या बळावरच राजा कारभार हाकत असे. त्यामुळे त्याला कदाचित स्वतःच्या बुद्धीमधील कमतरतेची जाणीवदेखील झाली नव्हती. हा राजा एकदा आपल्या लवाजम्यासह जंगलात शिकारीसाठी गेला असताना, त्याला एका झाडावरील घरट्यात पोपटाचे एक पिल्लू दिसले. घरट्यात एकटेच बसलेले ते पिल्लू कुतूहलाने राजाकडेच पाहात होते. राजा त्या पिल्लाजवळ गेला आणि त्याने त्यास पंजात पकडले. ते पिल्लूदेखील जराही न घाबरता राजाच्या पंजावर बसून राजाकडे पाहू लागले. त्या पिल्लास सोबत घेऊन तो राजवाड्यात आला. तेव्हापासून राजाच्या त्या लाडक्या पोपटाच्या सरबराईचे नवे काम त्याच्या नोकरचाकरांपासून सरदार, मनसबदारांपर्यंत सर्वांनी अंगावर घेतले. राजाच्या लाडक्या पोपटास काहीही कमी पडू नये, यासाठी सारेजण डोळ्यात तेल घालून त्याची काळजी घेऊ लागले. अशा, चहुबाजूंनी होणाऱ्या कोडकौतुकात तो पोपट दिवसागणिक वाढत होता. मात्र, एके दिवशी अचानक काहीतरी बिघडले. राजाचा तो लाडका पोपट आजारी पडला आणि राजसेवकांमध्ये घबराट पसरली. राजाच्या पोपटास काही झाले तर आपली धडगत नाही, या भीतीने राजाचे सारे दरबारी पोपटाच्या सेवेत दाखल झाले. त्याच्या उपचारासाठी नामांकित जाणकार वैद्यांचा ताफाही दाखल झाला. पण पोपटास गुण येत नव्हता. तो खंगतच चालला आणि एके दिवशी, त्याने मान टाकली. पंख पसरलेला, पाठीवर पहुडलेला आणि डोळे मात्र सताड उघडे असलेला तो निष्प्राण देह पिंजऱ्यात पाहून राजाला काळजी वाटू लागली. त्याने सेवकांस फैलावर घेण्यास सुरुवात केली, पण पोपट मेला आहे हे सांगण्याचे धैर्य कोणातच नव्हते. प्रत्येक गोष्टीसाठी अन्यांवर अवलंबून असलेल्या राजासही पोपटाच्या या अवस्थेस काय म्हणावे माहीत नव्हते. त्यामुळे, सेवकांनी वेगवेगळी कारणे सांगण्यास सुरुवात केली, पण पोपट मेला आहे हे सांगणे मात्र प्रत्येक जण टाळतच होता. अखेर त्याच गावातील एका लहान मुलाने पिंजऱ्यातल्या त्या निष्प्राण देहाकडे पाहिले आणि तो ओरडला, ''राजा, तुझा पोपट मेला आहे!''

बिहारमधील विधानसभा निवडणुकांचे ताजे निकाल आणि त्यानंतरचे राजकारण पाहता, मेलेल्या पोपटाची ती गोष्ट आठवणे अपरिहार्य ठरते. वारसा हक्कामुळे कौटुंबिक युवराजपद प्राप्त झालेला आपला नेता आता वेळ घालविण्याचे साधन म्हणून काँग्रेस नावाच्या कौटुंबिक पाळीव पोपटासोबत मन मानेल तसे, मनाला येईल तेव्हा खेळतो, त्याला आपल्या मर्जीनुसार खेळवतो हे आता त्याच्या मनसबदारांस जाणवू लागले आहे. अशा प्रत्येक खेळात त्या पोपटाची मात्र नाहक दमछाक होत आहे, हेही अनेकांनी ओळखले आहे. तरीही, पंख कापलेल्या, उडण्याची ताकद नसलेल्या आणि भरारी घेण्याचे विसरून गेलेल्या त्या पोपटाची सरबराई करण्यासाठी युवराजांचे सरदार, मनसबदार, खबरे, हुजरे, नोकरचाकर सदैव धडपडत असतात. युवराजांची मर्जी सांभाळण्यासाठी सारे जण पोपटाची काळजी घेत असतात. पण सततच्या खेळामुळे या पोपटाची प्रकृती दिवसेंदिवस बिघडतच आहे. सरदार, मनसबदारांस हे कळूनही, ते युवराजास सांगण्याचा धीर मात्र कोणासही होतच नव्हता. बिहारच्या निवडणूक निकालानंतर मात्र, युवराजाने खेळणे म्हणून वापरलेला त्याचा लाडका पोपट आता अंथरूणाला खिळला आहे, हे अनेक जाणत्यांना जाणवले. तरीही ते युवराजास स्पष्टपणे सांगण्याची हिंमत मात्र अजूनही कोणास झालेली नाही. युवराजाचा हा पोपट मेला आहे की मरणपंथास लागला आहे याविषयीही अनेकांच्या मनात शंका आहे. काही जणांस तो मरणपंथास लागल्यासारखे वाटते, तर पोपटाची सध्याची अवस्था मरणावस्थेहून वेगळी नाही, असे काहींना वाटू लागले आहे. यापैकी कोणत्याही अवस्थेविषयी युवराजास मात्र फारसे काही माहीतच नसल्याने, पोपटास काही झाले आहे यावर त्याचा विश्वास नाही. गेल्या काही महिन्यांपासून युवराज वेगळ्याच मोहिमेत गर्क होते. त्यांनी लवाजम्यासह प्रचाराच्या निमित्ताने पर्यटनाच्या मोहिमा आखल्या. गावोगावी जाऊन लोकांसोबत मौजमजाही केली. झोपडीत राहणाऱ्या कुटुंबाचे जगणे कसे असते ते युवराजांस कळावे याकरिता सरदार, मनसबदार, हुजऱ्यांनी



युवराजांसमवेत या कुटुंबांचे भोजन आयोजित केले. पायात बूट घालून जमिनीवर जेवायला बसलेल्या युवाराजांची छबी माध्यमांमध्ये झळकली आणि युवराजांचे सामान्यांच्या जगण्याशी कसे नाते आहे, हे लोकांसमोर मांडण्याची हुजऱ्यांची स्पर्धा सुरू झाली. एका नदीच्या पात्रात, आजूबाजूला कमरेएवढ्या खोल पाण्यात युवराजांनी पोहण्याचा आनंदही लुटला, मखाण्याची शेतीही पाहिली. बटाटे झाडावर लागतात की मुळाशी लागतात हे युवराजांस माहीत नव्हते. ते त्यांना प्रत्यक्ष पाहता यावे यासाठी हुजऱ्यांनी शेती पर्यटनाचा कार्यक्रमही आखला, याच प्रचार पर्यटनात युवराजांनी एका हलवायाच्या मुदपाकखान्यात जाऊन चक्क जिलेबीदेखील तळली. अशा तऱ्हेने, निवडणुकीच्या निमित्ताने युवराजांनी प्रचार पर्यटनाचा आनंद मनसोक्त लुटला आणि हा पोपट निवडणुकीच्या रिंगणात पणास लावला.

युवराजांनी मनसोक्त खेळविलेला हा पोपट आता मरणपंथास लागला असून वेळीच योग्य उपचार केले नाहीत तर तो तगदेखील धरणार नाही, हे आता निवडणुकीच्या निमित्ताने स्पष्ट झाले आहे. बिहारच्या निवडणुकीत काँग्रेसची धूळधाण झाली आणि गेल्या दहा वर्षांत सातत्याने सुरू असलेल्या पराभवांच्या मालिकांमधील सर्वांत मोठ्या नामुष्कीची वेळ या पक्षावर आली. गांधी घराण्याचे युवराज म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते, त्या राहुल गांधी यांनी या पक्षाला पोपटाप्रमाणे खेळणे म्हणून वापरले, याची जाणीव आता त्यांच्यासोबतच्या अनेकांस होऊ लागली आहे. बिहारच्या ताज्या निवडणुकीआधी राहुल गांधी यांनी केंद्रातील मोदी सरकारच्या विरोधात मतचोरीच्या आरोपावरून उघडलेली प्रतिमाभंजनाची मोहीम राबविण्यासाठी याच पोपटास खेळविले गेले होते. गेल्या दहा वर्षांत देशात झालेल्या प्रत्येक निवडणुकीत राहुल गांधींनी काँग्रेसचा हा पोपट आपल्या मर्जीनुसार खेळविला आणि त्या प्रत्येक खेळात पराभव पदरी पडल्यावर पोपटाची अवस्था दिवसागणिक केविलवाणी होऊ लागली. आजही काँग्रेस नावाच्या या पोपटावर प्रजेचे प्रेम आहे, अशा समजुतीतून बिहारमध्ये भाजपविरोधी पक्षांनी काँग्रेससोबत महागठबंधन नावाचा प्रयोग पुन्हा एकदा केला आणि त्यांना सत्तेची स्वप्नेदेखील पडू लागली. प्रत्यक्षात मात्र, मतदारांनी झिडकारल्यामुळे बिहारमध्ये काँग्रेसची वाताहत तर झालीच, पण त्यासोबत महागठबंधन या नावाने एकत्र बांधल्या गेलेल्या पक्षांचे तारूदेखील पुरते बुडून गेले आहे. निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर, काँग्रेस हा राहुल गांधींचा लाडका पोपट मरणपंथास लागल्याची जाणीव महागठबंधनास होऊ लागली आहे आणि तसे सांगण्याची हीच वेळ आहे, हेही जाणवू लागले आहे. राहुल गांधींच्या वोट चोरीच्या खेळात सहभागी होऊन फसगत झाल्याची जाणीवही महागठबंधनातील अनेक भागीदारांस झाली असेल, पण आता त्यातून माघार घेण्याची वेळ निघून गेली आहे. परतीचे सारे दोर कापल्यामुळे तलवारबाजी करत राहणे भाग आहे, पण ही तलवारबाजी हवेतच आहे, हेही आता या भागीदारांनी ओळखले आहे. जे मतदारास अगोदरच कळले आहे, ते कळण्यासाठी महागठबंधनाच्या भागीदारांस निवडणूक निकालांपर्यंत थांबावे लागले, हा बिहार निवडणुकांचा स्पष्ट अर्थ आहे. म्हणूनच, आता जेव्हा निकालांचे विश्लेषण केले जाईल, तेव्हा महागठबंधनातील भागीदारांमध्ये पराजयाचे खापर फोडण्याची स्पर्धा सुरू होईल. काँग्रेससोबत गेल्याने पराभव पाहावा लागला हे स्पष्ट असूनही, तसे उघडपणे मान्य करणे या भागीदारांस राजकीयदृष्ट्या सोयीचे नसल्याने, महागठबंधनातून काढता पाय घेण्याच्या संधीचा शोध आता सुरू होणार आहे. ज्या पक्षांना काँग्रेसच्या आधाराखेरीज तग धरण्याची शाश्वती नव्हती, असे पक्षदेखील आता भविष्यातील निवडणुकांत काँग्रेसचा हात धरण्यासाठी फारसे उत्सुक राहतील अशी शक्यता आता धूसर होत चालली आहे.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता तोंडावर आल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपने राज्यात मजबूत संघटना बांधली आहे. एकनाथ शिंदे यांची शिवसेना व अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसह सत्तेवर असलेल्या महायुतीला आव्हान देण्यासाठी महाविकास आघाडीला पर्याय नाही याची जाणीव झालेल्या विरोधकांमध्ये बिहारच्या निकालांनंतर चलबिचल सुरू झाली आहे. उद्धव ठाकरे यांच्या गटासोबत युती करावी किंवा नाही याबाबत काँग्रेसची मनस्थिती द्विधा झाली आहे, तर राज ठाकरे यांच्या मनसेला सोबत घेतल्याखेरीज निवडणुकीच्या रिंगणात उतरणे अवघड असल्याची जाणीव उद्धव ठाकरे गटास झाली आहे. शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष निवडणुकांचे वारे पाहून कोणत्याही तडजोडीचे सारे मार्ग खुले ठेवण्याचे राजकारण करत असतो. तीच भूमिका या निवडणुकीत राहिली तर महाविकास आघाडीतील त्यांच्या भागीदारीचे भवितव्य अनिश्चितच राहील असे बोलले जाते. बिहारच्या निवडणुकीत काँग्रेसचे पानिपत झाल्यावर आता महाराष्ट्रात पुन्हा काँग्रेससोबत युतीची गाठ बांधण्यास आघाडीतील कोणतेच पक्ष फारसे उत्सुक नाहीत याचे संकेत आताच मिळू लागले आहेत. उद्धव ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी बिहार निवडणुकांच्या निकालानंतर लगेचच केलेल्या विश्लेषणातून काँग्रेसला थेट लक्ष्य केले आहे. बिहारच्या पराभवाचे सारे खापर काँग्रेसच्या माथ्यावर मारण्याचा पहिला मान त्यांनी मिळविला आहे. त्यामुळे, राहुल गांधींच्या व्होट चोरी मोहिमेचा कोणताच प्रभाव निवडणुकीच्या राजकारणावर राहणार नाही, हेही स्पष्ट झाले आहे. व्होट चोरी ही काल्पनिक बाब असून आजवर सादरीकरणातून ते सिद्ध करण्यात राहुल गांधीदेखील यशस्वी झालेले नाहीत, ही बाब जनतेने ओळखली आहे. त्यामुळेच, बिहार निवडणुकीतील रालोआच्या विजयावर प्रश्नचिन्ह उमटवून नवे फेक नॅरेटिव्ह निर्माण करण्याचा एक नवा प्रयत्न हताश विरोधकांकडून सुरू झाल्याचे दिसू लागले आहे. बिहारच्या निवडणुकीत तेजस्वी यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलास मिळालेल्या मतांची बेरीज एक कोटी १५ लाख ४६ हजार ५५ एवढी आहे. टक्केवारीच्या तुलनेत, या पक्षास राज्यात सर्वाधिक म्हणजे २३ टक्के मते मिळाली असतानाही केवळ २५ जागांवर विजय मिळाल्याने, याच मुद्याचे भांडवल करून जनतेमध्ये संभ्रम पसरविण्याचा प्रयत्न महागठबंधनच्या समर्थकांकडून सुरू असल्याचे दिसते. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे ८९ उमेदवार विजयी झाले, तर भाजपप्रणीत रालोआचा घटक पक्ष असलेल्या संयुक्त जनता दलाचे ८५ उमेदवार विजयी झाले आहेत. भाजपला मिळालेल्या मतांची एकत्रित संख्या एक कोटी ८१ हजार १४३ एवढी, म्हणजे २०.०८ टक्के एवढी, तर संयुक्त जनता दलास एकूण ९६.६७ लाख (१९.२५ टक्के) मते मिळूनही या पक्षाचे ८५ उमेदवार विजयी झाले आहेत.

नेमक्या याच आकडेवारीवर बोट ठेवून सर्वाधिक मते मिळविणाऱ्या राजदचा पराभव कसा झाला असा सवाल महागठबंधनच्या समर्थकांकडून उपस्थित केला जातो. प्रत्यक्षात, ही आकडेवारी आणि टक्केवारी संपूर्ण राज्यातील मतदानाची असून प्रत्येक मतदारसंघातील वास्तव वेगळे असते, हे लपवून मतदारांमध्ये संभ्रम पसरवण्याचा नवा प्रयत्न सुरू झाला आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील मतदानाची एकत्रित टक्केवारी पाहिल्यास नेमके हेच चित्र पाहावयास मिळते. त्या निवडणुकीत भाजपला सर्वाधिक म्हणजे २६.१८ टक्के एकत्रित मते मिळाली होती व केवळ ९ जागांवर विजय मिळाला होता. याउलट, काँग्रेसला १६.९२ टक्के एकत्रित मते मिळूनही १३ जागांवर काँग्रेसचा विजय झाला होता. ठाकरे गटाच्या मतांची एकत्रित टक्केवारी १६.७२ असताना, या पक्षाने विजय मिळविलेल्या जागांची संख्या भाजपएवढीच म्हणजे नऊ इतकी होती, तर आठ जागांवर विजयी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटास केवळ १०.२७ टक्के एकत्रित मते मिळाली होती. त्यामुळे मतांच्या टक्केवारीवरून संभ्रम माजवून सुरू झालेल्या नव्या अपप्रचाराच्या गदारोळात पोपटाचा जीवच धोक्यात आहे, याचाच विसर पडला तर तीच गोष्ट भविष्यातही तितकीच ताजी राहील यात शंका नाही.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा

मानवी चंचल मनाची मोठी गंमत आहे. मनाला अगाध शक्ती असल्याने क्षणाचाही विलंब न लागता ते कुठेही भरकटते. भ्रम तर हा मनाचा भाव आहे. भौतिक सुखाच्या कल्पनेने परिसीमा गाठली असल्याने मनावर नियंत्रण ठेवणे हे महत् कठीण कर्म होत आहे. सद्बुद्धीचा अभाव असला तर भ्रमाचा प्रभाव वरचढ होऊन फलित निष्पन्न होत नाही पर्यायाने परिणाम विपरीतच होतात.

**ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा**
**काय भुललासी वरलिया रंगा**

उपरोक्त ओळीतून संत तुकाराम महाराज हाच उपदेश करीत आहेत. ऊस हा डोंगा म्हणजे, वाकडा-तिकडा, गाठी-गाठीचा, करड्या रंगाचा असतो. उसाचे बाह्यरूप इतर फळांसारखे रंगीत, आकर्षक नसल्याने माधुर्य आणि पौष्टिक असलेल्या उसाकडे लक्ष जात नाही. इतर फळांसारखे कोणी सहज घेत नाही. त्यापासून निर्माण होणाऱ्या पदार्थांचा भरपूर वापर होतो. उसाच्या बाह्य रूपामुळे आकर्षित न झाल्याने त्यातील गुणांचा लाभ होत नसल्याने संतांनी या फळाची समर्पक उपमा दिली आहे. कारण मानवीय मनाची बैठक ही बाह्यरूप, रंग, आकार याकडे आकर्षित होणारी असते. भ्रम हा मनाच्या मदतीला येऊन त्यास अधिक गोंधळून टाकतो. परिणामी काळ, वेळ, श्रम आणि धननाश झाल्याने पश्चात्ताप होऊन मन भानावर येते.

प्रापंचिक जीवनात असे अनेक अनुभव येतात. मन चंचल असेल तर द्वंद्व स्थिती निर्माण होऊन पदरात निराशा पडते. साद्यंत स्थिती अशीच आहे. आधुनिक तंत्रज्ञानात होत असलेल्या संशोधनाने जगात भ्रम निर्माण होत आहे. माकडाच्या हाती कोलीतप्रमाणे समाज माध्यमातून नवनवीन दुष्परिणाम होत असून अनेक त्याचे बळी पडत आहेत. या मायाजालावर नियंत्रण प्राप्त करणे दुरापास्त आहे. वस्त्रे-प्रावरणे, आरोग्य, शिक्षण, मनोरंजन क्षेत्रात भुरळ पाडणारे पावलागणिक प्रसंग येत आहेत.

आपल्या सर्व संतानी या भ्रम, मायाजालची सत्यता पडताळून उपदेश करून आपणास भानावर आणण्यासाठी आयुष्य खर्ची घातले. एखाद्या व्यक्तीच्या बाह्यरूपावरून (रंग, रूप, वेशभूषा, भाषा) त्याचे विश्लेषण करणे म्हणजे त्या व्यक्तीचे आकलन होऊ नये. त्याचे अंतर्मनातील भाव, सद्गुण कळण्यासाठी वरलिया रंग रुपी मायेचा पडदा दूर करून, विवेकबुद्धीने विश्लेषण होणे महत्त्वाचे ठरते. या विरुद्ध आकर्षक व्यक्तीच्या रंग, रूप, शिक्षण, बोली यावरून फसगत होण्याची संभावना अधिक असू शकते. यातून नैराश्य, बुद्धिभेद, अविश्वास, गैरसमज, धननाश इत्यादीचा सामना करावा लागतो म्हणून संत तुकाराम महाराज यांनी समर्पक ओळीत बोध केला आहे.

**संजय पाठक**/नागपूर

●● ●●

### हस्तलिखित : ज्ञान माध्यम



हस्तलिखित म्हणजे हाताने लिहिलेल्या कोणत्याही मजकुराला ही संज्ञा दिली जाते. पूर्वीच्या काळी टंकलेखन अस्तित्वात नव्हते. त्याचा शोध लागावयाचा होता. मुद्रण कलेचा शोध लागण्यापूर्वी ज्ञान आणि माहिती यांच्या संप्रेषणचे सर्व व्यवहार हस्तलिखिताद्वारे होत असत. हाताने लेखन करणे ही अनिवार्यता होती. हस्तलेखनासाठी भरपूर वेळ लागत असे. साधे-सोपे काम नव्हते, सहज साध्य लेखन होत नसे. हस्तलिखितासाठी प्रयास पडायचे. कागद अस्तित्वात नसताना, हस्तलिखिताचे कार्य प्रारंभ झालेले आहे. कागदाची उपलब्धी व्हावयाच्या पूर्वी ग्रंथकारांनी, लेखकांनी, साहित्य निर्मितीसाठी पपायरस चर्मपत्र, भूजपत्र, ताडपत्र व तत्सम माध्यम असणाऱ्या साधनांवर लेखन केलेले आढळते.

हस्तलिखितांमधून त्या काळच्या तत्कालीन संस्कृतीची विशेषतः व्यापार चालीरीती, कौटुंबिक जीवन, साहित्य, शासन व्यवस्था या सर्वांची सखोल, सविस्तर आणि इत्थंभूत माहिती मिळायची. हस्तलिखितांचा प्रारंभ कधी झाला हे निश्चितपणे सांगता येत नसले तरी तमिळ संघम साहित्याची हस्तलिखिते इ. स. पूर्व ४००, इ. स. पूर्व २०० या काळात लिहिली गेली असावीत असा अंदाज वर्तविला जातो. एकूण हस्तलिखितांपैकी काही साहित्यकृती नष्ट झाल्या असून काही भाग सुदैवाने उपलब्ध आहेत. उपलब्ध असलेल्या हस्तलिखित ग्रंथात धर्मशास्त्र, न्यायशास्त्र, वास्तुशास्त्र, शिल्पकला, तंत्रज्ञान इत्यादी विषयांवर विद्वानांनी लिहिलेली हस्तलिखिते उपलब्ध आहेत. त्यात अक्षर रूपातील हस्तलिखिते तर आहेतच. काही हस्तलिखितांमध्ये मात्र सचित्र पोथ्या उपलब्ध आहेत. काही हस्तलिखितांवर ग्रंथकारांचे नाव लिहिलेले असते. परंतु काही ग्रंथांवर त्या ग्रंथकाराचे नाव, रचनाकार यांचा निर्देश नसल्याचे दिसून येते. त्यांच्या साहित्याखाली रचनाकार अज्ञात म्हणून लिहिले जाते.

हस्तलिखितांमुळे त्या काळातील संस्कृतीचा परिचय होतो. प्राचीन संस्कृतीचे संदर्भ मिळतात. पूर्वी ऋषी, मुनी, संत यांनी अनेक विषयांवर लेखन केलेले आहे. जसे - धार्मिक, आध्यात्मिक सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजनैतिक आदि समस्त प्रकारावर हस्तलिखितांद्वारे प्रकाश टाकला आहे. या हस्तलिखित साहित्याचा फार मोठा लाभ पुढील पिढीला प्राप्त होतो. हस्तलिखितांपासूनच साहित्य निर्मिती सुरुवात झालेली आढळते. गीता, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, दासबोध इत्यादी धर्मग्रंथ हस्तलिखित रूपात लिहिले गेले आहे.

मध्ययुगात तवारिखा, बखरी, सनदा, कैफियती तह इत्यादींची हस्तलिखित कागदपत्रे ही ऐतिहासिक साधने म्हणून उपयुक्त ठरली. छत्रपती शिवाजी महाराज आणि राजा जयसिंह यामधील पुरंदरच्या तहाचा ताडपत्रावरील हस्तलिखित तहनामा सात किलोमीटर लांबीचा असून तो बिकानेरच्या पुरातत्त्व संग्रहालयात आहे. मुद्रण कलेचा शोध लागल्यावरही शेकडो वर्षे हस्तलिखिते नकलून घेण्याची पद्धत अव्याहत सुरू आहे. हस्तलिखिताचे धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक व राजकीय मूल्ये वादातीत आहे.

विज्ञान युगात सर्वच क्षेत्रात बदल झाला. इंटरनेट, मोबाईल, संगणक या सर्व माध्यमांद्वारे व्यवहार व्हावयास लागले. विनासायास, कमी वेळात काम करणारी यंत्रसामुग्री आली मुद्रणकलेतही परिवर्तन झाले. या सर्व पृष्ठभूमीवर हस्तलिखितांचा विचार केल्यास, हस्तलिखितांचे प्रमाण कमी झाले मात्र ते संपुष्टात आले नाही. हस्तलिखिते ही निरंतर चालणारी कला आहे. हस्तलिखिते म्हणजे साहित्य क्षेत्रातील अमूल्य ठेवा होय.

**मंजूषा शिनखेडे**/९०९६४९९७९७

●● ●●

### क्रांती की विकृती..!

आज एआयने प्रत्येकाच्या घरात आणि मनात प्रचंड धुमाकूळ घातला आहे. तरुणाई काय, महिला काय याचा गैरवापर करत आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही एक क्रांती आहे की विकृती हा एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक आव्हान जगाच्या पातळीवर जाणवू लागल्यानंतर सत्य काय असत्य काय आणि ही विकृती कशी आहे यावर मानसशास्त्रीय संशोधन सुरू आहे. आज फेसबुकवर या एआयने धुमाकूळ घातला आहे. रील्सच्या माध्यमातून कधी दहशत वाढणारे तर कधी अत्यंत दुर्लक्षित करण्यायोग्य असणारे भाग घातले जातात जे अतिशय घातक आहे. सर्वसामान्य लोकांना या नव्या माध्यमातून चुकीच्या दिशेने मार्ग मिळतो हे वास्तव आहे. नुकताच वाघाने लहान मुलावर केलेला हल्ला या बनावट रीलने दहशत पसरवली आहे. बरेचदा यामुळे सत्य परिस्थिती डावलली जाते. माणसाची ही विकृती भयावह आहे. अशा प्रकारे रील्स तयार करणे हा एक खेळ झाला आहे. याला कुठेतरी आळा घालणं गरजेचं आहे. प्रगत विज्ञान हे प्रगतिपथावर घेऊन जाते, पण त्याचा गैरवापर मात्र अधोगतीला घेऊन जाते याचा विचार करण्याची वेळ आली आहे. दुष्ट मने एआयमुळे अकारण भीतीचे वातावरण समाजात निर्माण करत आहे. मानवी मेंदू अतिशय तल्लख आहे. त्याची निर्मिती हे एक आश्चर्य आहे हे मान्य करावेच लागेल पण याच मेंदूच्या आणि विज्ञानाच्या माध्यमातून अनुचित काही घडू नये इतकेच अपेक्षित आहे.

**संगीता वाईकर**/नागपूर

●● ●●

### छत्रपतीनगरवासीयांची सर्व बाजूंनी कोंडी

नागपूर शहरात गेल्या काही वर्षांपासून सर्वत्र विकासकामे होत आहे. विकासकामाला नागरिकांचा विरोध नाही पण ज्या प्रकारे ती होत आहे त्यामुळे लोक त्रस्त झाले आहेत ही वस्तुस्थिती आहे. सिमेंट रोड बनविले. त्याच्या बाजूला काँक्रिट ब्लॉक बसविले गेले पण हे करताना इतर विभागाचा समन्वय नसल्याने कधी इलेक्ट्रिक केबलकरिता रस्ते तोडले जातात तर कधी पाण्याची पाईप लाईन टाकण्यासाठी तर कधी पावसाचे पाणी वाहण्यासाठी पाईप टाकण्याकरिता रस्ते फोडले जातात. सर्वत्र धुळीचे साम्राज्य असते. या सर्व कामामुळे ट्रॅफिक ब्लॉकेज होते हे अजून तापदायक. छत्रपती नगरमधील विविध लेआऊटमध्ये वर्धा रोडकडून जाण्यासाठी ४ मार्ग आहेत. त्यापैकी मेट्रो स्टेशन बाजूचा रस्ता सदैव बस, कार, ऑटो, तिथे असल्यामुळे दिसतच नाही. जुन्या जनता हायस्कूलच्या बाजूचा रस्ता कित्येक दिवसापासून मोठे पाईप ठेवून बंद केला आहे. रेडिसनच्या अलिकडील रस्ता सुद्धा पाण्याच्या पाईपलाईनच्या कामामुळे खराब झाला आहे. त्या रस्त्याने रात्री जाणे धोकादायक झाले आहे. दक्षिण-पूर्व भागात जो श्रीनगरकडे रेल्वे ओव्हर ब्रिज आहे त्याच्या सर्व्हिस रोडने छत्रपती नगरकडे जो रस्ता आहे तो सुद्धा नवीन बनत असलेल्या पाण्याच्या टाकीकरिता टाकलेल्या पाईपलाईनने तुटला आहे. त्यामुळे तिथे सर्वत्र खड्डे पडले आहे. रिंग रोडवरून छत्रपती नगर मध्ये ३ रस्त्यांपैकी छत्रपती सभागृहाकडून एक रस्ता छत्रपतीनगरमध्ये येतो. तो सुद्धा आज पाईपलाईनचे काम असल्याने बंद केला आहे. एकूण सर्व बाजूंनी या नगरातील लोकांची गळचेपी करण्याचा विडाच प्रशासनाने उचलला आहे असे दिसत आहे.

**मोहन द. पांडे**/नागपूर

●● ●●

### चांदीला सोन्यासारखी चकाकी

गेल्या काही दशकांपासून दीर्घकाळ दुर्लक्षित असलेल्या चांदीने स्टॉक मार्केटमध्ये अद्वितीय कामगिरी केल्याने सोन्याहून अधिक परतावा गुंतवणूकदारांना दिला. आर्थिक वर्ष २०२५ मधील सर्वांत फायदेशीर गुंतवणूक म्हणून ती उदयास आली आहे. चांदीच्या ईटीएफने या कॅलेंडर वर्षात सरासरी १०२ टक्के परतावा देऊन गुंतवणूकदारांचे पैसे दुप्पट केले आहेत. मागणी आणि पुरवठ्याच्या कमतरतेच्या वादळात अडकलेल्या चांदीने



सर्व विक्रम मोडले आहेत आणि अलिकडेच स्टॉक मार्केटमध्ये १.८ लाख रुपयांच्या जवळपास व्यवहार केला आहे. विश्लेषकांनी दीर्घकालीन लक्ष्य प्रतिकिलो दोन लाख रुपये इतके उच्च असल्याचे भाकीत केले आहे. विविध विश्लेषकांच्या अंदाजानुसार, भारतातील चांदीच्या एक्स्चेंज -ट्रेडेड फंड प्रचंड मोठा परतावा देणारे ठरले आहेत. ज्यामुळे इकर्मी गुंतवणूक झाली आहे आणि ते लक्षवेधी परतावा देतही आहेत. परंतु तज्ज्ञांचा असा इशारा आहे की ही वाढ स्वतःहून पुढे जात आहे.

जागतिक चांदीच्या किमती प्रति औंस ५० पर्यंत वेगाने वाढल्या आहेत. चार दशकांहून अधिक काळातील सर्वोच्च पातळीवर भारतातील चांदी पोहोचली असून चांदीच्या गुंतवणूकदारांना ईटीएफसाठी परतावा वाढवत आहेत. एका प्रकाशनातील अहवालानुसार, भारतातील अनेक चांदीच्या ईटीएफ आता त्यांच्या सूचक निव्वळ मालमत्तेच्या मूल्यापेक्षा लक्षणीय प्रीमियमवर व्यवहार करत आहेत. म्हणजेच गुंतवणूकदार मूळ चांदीच्या वास्तविक मूल्यापेक्षा जास्त पैसे देत आहेत. हे एक लक्षण आहे की मागणी पुरवठ्यापेक्षा खूपच जास्त आहे. विशेषतः चांदीच्या ईटीएफ त्यांच्या युनिट्सना भौतिक चांदीने परत करतात, जे घट्ट जागतिक पुरवठा साखळींमध्ये मिळवणे कठीण झाले आहे. एका आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांनी दिलेल्या चांदीच्या ईटीएफमध्ये ८६०३ कोटी रुपयांचा ओघ आला होता. जो गेल्या वर्षीच्या एकूण ओघापेक्षा जास्त आहे. आणखी एका प्रसारमाध्यमाने दिलेल्या माहितीनुसार काही चांदीच्या ईटीएफने या वर्षी आतापर्यंत पन्नास ते पंचावन्न टक्के एवढा परतावा दिला आहे, जो सोने आणि इक्विटी बेंचमार्कपेक्षा खूपच जास्त आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

●● ●●

### मोदी नाम केवलम

''मोदी नाम केवलम'' ही घोषणा बिहार निवडणुकीच्या निकालांनी पुन्हा एकदा प्रतिध्वनित केली आहे. जनतेच्या मनात विश्वास, विकासाची आकांक्षा आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना यांचे प्रतीक म्हणून नरेंद्र मोदींचे नाव उभे राहिले आहे. निवडणुकीच्या निकाला रालोआला २४३ पैकी २०० पेक्षा अधिक जागा मिळाल्या. ज्यात भाजप ८९, जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला. विरोधकांचे गड कोसळले, महागठबंधनाला अपेक्षित पाठिंबा मिळाला नाही. बिहारमध्ये पुन्हा एकदा नितीश कुमार मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेणार असले तरी, विजयाचा मुख्य आधार मोदींचे नेतृत्व आणि रालोआची एकजूट ठरली आहे. ''मोदी नाम केवलम'' ही घोषणा केवळ राजकीय विजयाची नाही, तर जनतेच्या मनातील श्रद्धेची अभिव्यक्ती आहे. विकास, स्थैर्य आणि राष्ट्रीय अभिमान यांचे प्रतीक म्हणून मोदींचे नाव बिहारच्या जनादेशातून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

**श्रीकांत भास्कर तिजारे**/९४२३३८३९६६

●● ●●

### इंडिया आघाडीचा बिहारमध्ये सुपडा साफ

बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालांनी मोठे राजकीय ध्रुवीकरण आणि सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या बाजूने स्पष्ट कौल दर्शवला आहे. मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड बहुमत मिळवत पुन्हा एकदा बिहारमध्ये सत्ता स्थापन केली आहे. या निवडणुकीतील सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे काँग्रेसप्रणीत इंडिया आघाडीचा झालेला दारुण पराभव, ज्याला सुपडा साफ असे संबोधले जात आहे.

मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा मुख्यमंत्री म्हणून मोठा कार्यकाळ आहे. यावेळी बिहारचे मुख्यमंत्री म्हणून ते दहाव्यांदा शपथ घेतील, जो एक विक्रम असेल. जितनराम मांझी यांचा २७४ दिवसांचा मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ वगळता, गेल्या २० वर्षांपासून ते मुख्यमंत्री आहेत. या निवडणुकीत रालोआने एकहाती सत्ता मिळवली असून, महाआघाडीला (ज्यात काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल आणि डावे पक्ष यांचा समावेश होता) फार कमी जागांवर समाधान मानावे लागले. भाजप हा रालोआमधील सर्वांत मोठा पक्ष म्हणून उदयास आला आहे, तर जेडीयूनेही आपली ताकद कायम राखली आहे. या निकालांनी हे सिद्ध केले की बिहारच्या मतदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा करिष्मा आणि नितीश कुमार यांच्या प्रशासनावर पुन्हा एकदा विश्वास दर्शवला आहे.

**अविनाश देशपांडे**/९४२२९५०७५०

●● ●●

### लाडू प्रसादातील भेसळ, भक्तांच्या श्रद्धेचा अपमान

तिरुमला तिरुपती देवस्थानातील लाडू प्रसादात भेसळयुक्त तुपाचा मोठा घोटाळा उघडकीस आल्याची बातमी अतिशय धक्कादायक आहे. मंदिरांकडे केवळ पैसा कमावण्याचे साधन म्हणून पाहण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे, ही अत्यंत चिंतेची बाब आहे. श्रद्धाळू भक्तांच्या आरोग्याशी असा खेळ करणारे कोणतेही आस्थापन असो, त्यांनी केलेली ही कृती क्षमायोग्य नाही. गेल्या पाच वर्षांपासून लाखो किलो बनावट तूप लाडूंसाठी वापरले गेले आणि ते भक्तांच्या पोटात गेले आहे. यामुळे भक्तांच्या आरोग्यावर काही गंभीर परिणाम झाले असतील, तर त्याला जबाबदार कोण? जिथे प्रसाद हा भक्तांच्या धार्मिक भावना आणि जिव्हाळ्याचा विषय असतो, तिथेच भेसळ करून श्रद्धेचा व्यापार करणाऱ्यांना कधीच माफी नसावी. हा फक्त आर्थिक घोटाळा नसून धर्माची हानी आहे.

देवस्थान व्यवस्थापनाने अशा प्रकारच्या भेसळीविरोधात कठोर पावले उचलून भविष्यातील सर्व प्रक्रिया पारदर्शक करणे गरजेचे आहे. श्रद्धा आणि आरोग्य यांचा असा अपमान कधीही सहन केला जाऊ नये.

**अनिकेत शेटे**/पुणे

●● ●●

## आजचे संघगीत-४४

रविवार, १६ नोव्हेंबर २०२५

### नमन करें इस मातृभूमि को

नमन करें इस मातृभूमि को, नमन करें आकाश को
बलिदानों की पृष्ठभूमि पर, निर्मित इस इतिहास को ।।धृ।।

इस धरती का कण-कण पावन, यह धरती अवतारों की है ।
ऋषि-मुनियों से वन्दित धरती, धरती वेद-पुराणों की है ।
मौर्यगुप्त सम्राटों की यह, विक्रम के अभियानों की है ।
महावीर गौतम की धरती, धरती चैत्य विहारों की है ।
नमन करें झेलम के तट को, हिममंडित कैलाश को ।।१।।

याद करें सन सत्तावन की, उस तलवार पुरानी को हम ।
रोटी और कमल ने लिख दी, युग की अमिट कहानी को हम ।
माय मेरा रंग दे बसंती चोला, भगतसिंह बलिदानी को हम ।
खून मुझे दो आज़ादी लो, इस सुभाष की वाणी को हम ।
गुरु गोविन्दसिंह की कलियों के उस, अजर अमर बलिदान को ।।२।।

आओ हम सब मिल-जुल कर यह, संगठना का मंत्र जगायें ।
व्यक्ति-व्यक्ति के हृदय में, राष्ट्रभक्ति के दीप जलायें ।
हिन्दू-हिन्दू सब एक संग हो, भारत माँ का मान बढ़ायें ।
अन्नपूर्णा भारतमाता, जग के सब दुख दैन्य मिटायें ।
अर्पित कर दें मातृभूमि हित, तन मन धन और प्राण को ।।३।।

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७९६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# न.प. निवडणूक : काँग्रेसकडून नगराध्यक्ष पदासाठी सय्यद मैमुना बेगम हनीफ उर्फ बहादूर भाई

## समविचारी पक्षांना सोबत घेवुन प्रभागातील उमेदवार घोषीत करणार : बहादुर भाई

परळी (प्रतिनिधी) : परळी नगरपालिका निवडणुकीत भाजपा,राष्ट्रवादी काँग्रेस मधील बडे नेते उमेदवारी घोषीत करण्यासाठी पुढे येत नसताना काँग्रेसने शनिवार दि.१५ रोजी पत्रकार परिषद घेवुन नगराध्यक्ष पदासाठी मैमुना बेगम सय्यद हनिफ उर्फ बहादूरभाई यांच्या उमेदवारीची घोषणा करत निवडणुकीचे रणशिंग फुंकले. प्रभागातील सदस्यांच्या उमेदवारी अंतिम टप्प्यात असून लवकरच महाविकास आघाडीतील घटक पक्षांसह सर्व उमेदवारांच्या घोषणा करणार असल्याचे काँग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद हनिफ उर्फ बहादूरभाई यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

परळी शहरात शनिवारी सायंकाळी प्रदेश उपाध्यक्ष अनिल मुंडे, तालुकाध्यक्ष प्रकाश मुंडे,शहर सरचिटणीस शशिशेखर चौधरी आपचे जिल्हा उपाध्यक्ष विजय जोशी,प्रकाश देशमुख यांची पत्रकार परिषद झाली.यावेळी बोलाताना बहादुरभाई यांनी सांगितले की, आम्ही महाविकास





आघाडीतील घटकपक्ष म्हणुन लोकसभा निवडणुकीत बजरंग सोणवणे यांच्या प्रचाराची धुरा अग्रक्रमाने सांभाळत शहरातील ३० पैकी २८ बुथवर मताधिक्य दिले होते.विधासभा निवडणुकीत आमचा उमेदवार आयात करत तुतारी चिन्ह दिले तरी आम्ही प्रचाराची धुरा सांभाळली.परळी नगरपालिकेच्या अध्यक्षपदावर काँग्रेसचा हक्क असल्याने महाविकास आघाडी म्हणुन शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट,माकप अशा पक्षांच्या स्थानिक पदाधिकार्यांची दि.२६ ऑक्टोबर रोजी बैठक घेतली.यानंतर आम्ही पुढाकार घेत आमच्यापेक्षा अधिक सक्षम उमेदवार असेल तर त्यावर विचार करु असेही ठरले. परंतु राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांची वेगळी चुल मांडण्याची तयारी सुरु झाली आणि त्यांनी आपल्या पक्षातील पदाधिकार्यास अध्यक्षपदासाठी पुढे करण्याऐवजी ज्या व्यक्तीने २०११ साली नगराध्यक्षपद भुषवुन परळीचे वातावरण गढुळ करणार्या व्यक्तीच्या खांद्याला खांदा लावुन काम केले.काही महिन्यापर्यंत त्या नेत्याचा उदोउदो करत आले आणि अचानकपणे शहरात अपक्ष उमेदवारी जाहिर करुन प्रचाराच्या कामाला लागलेल्या व्यक्तीचे कपडे बदलुन महाविकास आघाडीत आणल्यानंतर त्यास आम्ही कडाडून विरोध केला. परळी शहरातील जनता भ्रष्टाचार, गुंडागर्दी याला कंटाळलेली असुन शहराच्या विकासासाठी आम्ही काँग्रेसच्या वतीने महाविकास आघाडीकडुन उमेदवार देत पुर्ण ताकदीने निवडणूक लढवणार असल्याचे सय्यद हनिफ यांनी सांगितले.

# शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांची लोकशाही परळीत नांदण्यासाठी मैदानात - संध्या दीपक देशमुख

परळी (प्रतिनिधी)-एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तसेच इतर पक्षांना उमेदवार सापडत नसताना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे दिपक देशमुख यांनी मात्र, प्रचाराचा चंग बांधला आहे. दीपक देशमुख यांच्या प्रचाराचा झंजावात पाहत इतरांना मात्र आपण या दीपक देशमुख यांच्या वाळवंटामध्ये टिकू काय ?अशी मनस्थिती गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या काही उमेदवारांची झाली आहे. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून शरद पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिकृत नाव संध्या दीपक देशमुख यांचे जाहीर होताच अनेक पक्षांच्या तसेच नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराच्या पायाखालची वाळू घसरली आहे. कारण, दीपक देशमुख हे परळीकरांच्या मनातील नगराध्यक्ष म्हणून पुढे येत असून, शिव -शाहू- फुले -आंबेडकर विचारांची नगरपालिकेत सत्ता आणण्यासाठी परळीकरांनी आशीर्वाद द्यावा अशी विणवणी मतदारांना दीपक नाना देशमुख केली. सध्या संध्या दीपक देशमुख व दीपक नाना देशमुख यांच्या झंजावात वजन संपर्क प्रचारामुळे विरोधकांमध्ये धावपळ सुरू झाल्याचे पहावयास मिळते . जनतेच्या मनातील महापुरुषांचे विचार कृतीत आणण्यासाठी मैदानात उतरलो असल्याचे दीपक देशमुख यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले. दरम्यान, हुकूमशाही किंवा झुंडशाहीला परळीकर त्रासले असून आता शिव- शाहू -फुले -आंबेडकर यांची लोकशाही परळीत नांदण्यासाठी आम्ही मैदानात आहोत असे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार संध्या देशमुख यांनी यावेळी सांगितले.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात लोकशाही स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता यावर आधारित आहे. आज बीड जिल्ह्यात तसेच परळीमध्ये जातिवाद पसरला असून सामाजिक सलोखा राखण्यासाठी समानता आणण्यासाठी खरी लोकशाही आणण्याचा प्रयत्न करणार!**

# 'पीएनजी ज्वेलर्स'तर्फे नव्या पिढीच्या वधूसाठी 'प्रथा' संग्रह सादर

बिड , १४ नोव्हेंबर : भारतीय विवाहसोहळ्यांच्या हंगामाची सुरुवात होत असताना, भारतातील सर्वात विश्वासार्ह पारंपरिक दागिन्यांच्या ब्रँडपैकी एक असलेल्या 'पीएनजी ज्वेलर्स'ने आपला खास असा विवाह संग्रह 'प्रथा' सादर केला आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि गोवा येथे या संग्रहाचा ग्राहकांना अनेक सवलतींसह लाभ घेता येणार आहे. हा संग्रह नव्या युगातील वधूसाठी परंपरेचा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम आहे.



'प्रथा' म्हणजेच 'परंपरा'. हा संग्रह भारतीय स्त्रीच्या सौंदर्य, भावना आणि कलात्मकतेचे प्रतिनिधित्व करतो. या नव्या कलेक्शनमध्ये सोने आणि हिरे जडित सुंदर ब्रायडल सेट्स, हार, कानातले, बांगड्या आणि मांगटिका यांचा समावेश आहे. प्रत्येक दागिन्याच्या डिझाईनमध्ये पारंपरिक नक्षीकाम आणि आधुनिक डिझाईन्सचा सुंदर मिलाफ दिसून येतो, जो आजच्या आत्मविश्वासू आणि समंजस वधूंसाठी खास तयार करण्यात आला आहे. विवाह हंगामाच्या निमित्ताने पीएनजी ज्वेलर्सतर्फे ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स जाहीर करण्यात आल्या आहेत. सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ३० टक्के पर्यंत सूट आणि हिरे दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ७५ टक्के पर्यंत सूट. यासोबतच जुन्या सोन्याच्या एक्सचेंजवर ० टक्के कपात, ज्यामुळे प्रेम आणि परंपरेचं प्रतीक असणारे दागिने खरेदी करण्याची ही उत्तम संधी ठरते.

या मोहिमेबद्दल बोलताना, पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, ''प्रथा वेडिंग कलेक्शन म्हणजे वारशाची आणि भावनेची शाश्वत नाळ आहे. या कलेक्शनमधील प्रत्येक डिझाईन वधूच्या नव्या प्रवासाची सखी बनावी, या उद्देशाने तयार केली आहे. या मोहिमेद्वारे आम्ही केवळ दागिने नव्हे, तर प्रत्येक विवाहामागील भावना, बांधिलकी आणि एकतेचा सुंदर उत्सव साजरा करतो.'

'प्रथा' कलेक्शनमध्ये भारतीय पारंपरिक कलाकुसरीचा वारसा जाणवतो, नव्या काळासोबत चालत असताना आपली मुळे जपायची आहेत, अशा महिलांसाठी हा संग्रह खास आहे. ठरावीक कालावधीसाठी चालणाऱ्या या मोहिमेचा उद्देश 'पीएनजी ज्वेलर्स'च्या सर्व शोरूम्समध्ये ग्राहकांची वर्दळ वाढवणे आणि ब्रँडशी असलेलं नातं अधिक दृढ करणे आहे. या उपक्रमातून पुन्हा एकदा ब्रँडचा नवकल्पना, कौशल्य आणि विश्वास या १९२ वर्षांच्या प्रवासात जपलेला वारसा अधोरेखित होतो.

# स्किल सोबत विल काळाची गरज

## गुरुकृपा कॉलेज ऑफ फार्मसी येथे नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१६ नोव्हेंबर**

महाराष्ट्र सीईटी सेलने फार्मसीची सुरू केलेली प्रवेशाची अंतिम प्रक्रिया संपत आलेली आहे या पार्श्वभूमीवर गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी, माजलगाव या महाविद्यालयात डी फार्मसी आणि बी फार्मसी प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी इंडेक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते. कॉलेजचा पहिल्या दिवशीच आयोजित अकॅडमिक इंडक्शन प्रोग्राम हा वर्षभर चालणाऱ्या सिलॅबस आणि कॉलेजचे एक्स्ट्रा ॲक्टिव्हिटीस याबद्दल माहिती देण्यासाठी असतो.

गुरुकृपा महाविद्यालय आयोजित या प्रोग्राम मध्ये बायनेट फार्मा कंपनीचे डायरेक्टर बालाजी सांगळे यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलाविण्यात आले. त्यांनी



विद्यार्थ्यांना फार्मसी मधील विविध करिअर संधीची माहिती सांगितली. कॉलेजच्या पहिल्या दिवशीच तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन मिळणे हे दुर्मीळच पहायला मिळते. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांत उत्सास वाढला.

सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन सानिया पठाण व साक्षी तोर या विद्यार्निनीने केले तर प्रास्ताविक प्राचार्य अमित बिंदू यांनी केले. या कार्यक्रमात प्रा. गणेश वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना कॉलेज स्टाफची ओळख करून दिली, अकॅडमिक कॅरिक्युलम आणि एक्झाम बद्दल प्रा. ऋषिकेश शेंडगे आणि प्रा. दिवाकर जगताप यांनी माहिती सांगितली त्याच बरोबर प्रा. राहुल वांडरे यांनी जॉब संदर्भात माहिती दिली तसेच इन्स्टिट्यूटिनल ओव्हर व्हिव आणि रिचर्स संदर्भात प्रा. डॉ. निखिल जाधव यांनी गायडन्स केले. प्रमुख पाहुण्यांच्या मार्गदर्शनानंतर संस्थेचे अध्यक्ष डॉ.यशवंत राजेभोसले यांनी विद्यार्थ्यांना तांत्रिक गोष्टी शिकण्याचे आव्हान करत अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्श दीपाली गायकवाड हिने केले. या कार्यक्रमाचा साठी प्र. पाहुणे म्हणून फिजिओथेरपीचे प्राचार्य मकेश बाबू, आयुर्वेदचे विभाग प्रमुख डॉ. साबेर शेख, नर्सिंगच्या प्रा. पूनम खानापूरकर उपस्थित होते.



# निवृत्ती वेतनधारक व कुटूबंनिवृत्ती धारकांनी ३० नोव्हेंबरपर्यत हयात प्रमाणपत्र सादर करावे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ नोव्हेंबर**

बीड जिल्हा कोषागार अंतर्गत निवृत्ती वेतन घेणारे निवृत्ती वेतन धारक व कुटुंबनिवृत्तीवेतन धारक यांनी ३० नोव्हेंबरपर्यंत हयात असल्याबाबत दाखला सादर करण्याचे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी यांनी केले आहे.

हयात असल्याबाबतचा दाखला नोंदविण्यासाठी बँकेत हयात दाखला यादी पाठविण्यात आलेली आहे. राज्य शासकीय निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्ती वेतन धारक यांनी न चुकता बँकेत जाऊन सदर यादीमध्ये आपल्या नावापुढे स्वाक्षरी करुन किंवा अंगठयाचा ठसा उमटवून हयातीचा दाखला सादर करावा.

जीवन प्रमाण या संकेत स्थळावर जावून ऑनलाईन पध्दतीने देखील हयात दाखला सादर करता येईल. हयातीच्या प्रमाणपत्रावर बँक अधिकारी किंवा राजपत्रित अधिका-याच्या समक्ष स्वाक्षरी करुन जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करता येईल. निवृत्ती वेतनधारक काही कामानिमित्त परदेशात असल्यास तेथील भारतीय राजदुतामार्फत हयातीचा दाखला संबंधित जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करता येईल.

# योग्य सवयी अंगीकारल्या तर चिरतरुणता शक्य – डॉ.प्रदीप उजगरे

## तुलसी व माता रमाई नर्सिंग कॉलेजमध्ये जागतिक मधुमेह दिन विविध उपक्रमांनी साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ नोव्हेंबर**

योग्य आहार, नियमित व्यायाम आणि संतुलित दिनचर्या अंगीकारल्यास चिरतरुण राहणे सहज शक्य आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध आरोग्य तज्ज्ञ डॉ.प्रदीप उजगरे यांनी जागतिक मधुमेह दिनानिमित्त आयोजित मार्गदर्शनपर व्याख्यानात केले. देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ नर्सिंग आणि माता रमाई नर्सिंग कॉलेज येथे शुक्रवार, दि.१४ रोजी जागतिक मधुमेह दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी डॉ.प्रदीप उजगरे यांनी मधुमेहाची कारणे, लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि जीवनशैलीतील आवश्यक बदल याबाबत विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. सवयी योग्य असल्या की शरीर निरोगी राहते आणि निरोगी शरीर हेच चिरतरुणतेचे रहस्य आहे, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमाला संस्थेचे विश्वस्त डॉ.सुनील जोंधळे, प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल, प्राचार्य प्रकाश ढोकणे, प्रा.मगन ओव्हाळ, डॉ.पल्लवी धेंडे तसेच नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य राऊत डी.डी.उपस्थित होते.

यानंतर दोन्ही कॉलेजमध्ये संयुक्त निबंध स्पर्धेचे आयोजन



करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत स्पर्धा रंगतदार झाली. यात तुलसी कॉलेज ऑफ नर्सिंगमधील कु.भारती लांडगे प्रथम, श्रीनिकेत देवकते द्वितीय,अंजली कुरकुटे तृतीय ठरल्या. तर माता रमाई नर्सिंग कॉलेजमधील अर्पिता गायकवाड प्रथम, सुप्रिया पानसंबळ द्वितीय, राहुल वाघमारे तृतीय ठरले, तसेच कार्तिकी वीर यांना उत्तेजनार्थ बहुमान मिळाला.

विजेत्या विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ, पुस्तक, प्रमाणपत्र आणि पेन देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा.प्रतिक्षा वेडे, प्रा.सुप्रिया वाघमारे, प्रा.मिलिंद वडमारे, प्रा.अब्रार पठाण, प्रा.इनामदार सोहेल, दीपाली बहिर आणि आकाश राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले.

# भारतीय जनता पार्टीचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांचा वाढदिवस हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ नोव्हेंबर**

बीड जिल्ह्यातील सर्वात प्रसिद्ध असलेले ठिकाण म्हणजे श्रीक्षेत्र पेंडगाव या ठिकाणी सर्व भाविक भक्तांच्या नवसाला पावणारे असे भगवान श्री महारुद्र देवता आहेत येथे दर शनिवारी या ठिकाणी मराठवाड्यासह महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातील भाविक भक्त दर्शनासाठी येत असतात म्हणून बीड जिल्ह्यातील सर्वात उत्कृष्ट देवस्थान व सर्वांचे नवसाला पावणारे असे श्रीक्षेत्र पेंडगाव येथील श्री हनुमान महाराज आहेत या ठिकाणी आज बीड जिल्ह्यामध्ये ज्यांचे कार्य अतिशय उत्कृष्ट आहे राजकीय क्षेत्रातील सामाजिक क्षेत्रातील धार्मिक क्षेत्रातील तसेच देव देश धर्म यासाठी सातत्याने अग्रेसर असलेले सर्वांच्या सुख दुःखामध्ये सातत्याने सहभागी होणारे सर्वांना वेळोवेळी मदत करणारे असे सर्वांचे लाडके लोकप्रिय सर्वांना अण्णा म्हणून परिचित असलेले भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे राज्याचे उपाध्यक्ष मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त आज या ठिकाणी उपस्थित असलेल्या हजारो भाविक भक्तांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मोठ्या उत्साहाच्या



आणि आनंदाच्या पवित्र मंगलमय वातावरणामध्ये साजरा करण्यात आला माननीय अण्णांच्या हस्ते श्री भगवान महारुद्राचे महापूजा व श्री रुद्राभिषेक देखील श्री ब्रह्मवृंदांच्या पवित्र श्री वेद मंत्राच्या जयघोषात संपन्न झाला यावेळी या ठिकाणचे सर्व मंदिर परिसर तसेच मंदिराच्या बाहेरील परिसर श्री वेद मंत्राच्या पवित्र जय घोषाने दुमदुमून गेला होता तसेच येथे उपस्थित असलेल्या हजारो भाविक भक्तांनी आज महाप्रसादाचे सेवन केले मा श्री नवनाथ जी अण्णांच्या वाढदिवसानिमित्त शिरोळे पाटील यांच्याकडून येथे येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाचे उत्तम प्रकारे अतिशय कॉलिटीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते या ठिकाणी पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थ तसेच मराठवाड्यासह महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील सर्व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच बीड जिल्ह्यातील व बीड शहरातील सर्वच राजकीय क्षेत्रातील सामाजिक क्षेत्रातील तसेच वकील डॉक्टर इंजिनियर्स पत्रकार सर्व मान्यवर मंडळी यांनी देखील या ठिकाणी येऊन श्री भगवान श्री महारुद्राचे दर्शन घेऊन मा अण्णांना वाढदिवसानिमित्त मनस्वी भरभरून शुभेच्छा दिल्या व सर्व या ठिकाणी उपस्थित असलेले भाविक भक्तांनी अण्णांना उदंड आयुष्य लाभावे अण्णांच्या हातून भविष्यात सातत्याने असेच श्री देव देश व धर्म या साठी सातत्याने कार्य घडत राहावे अशी प्रार्थना ही पेडगाव येथील श्री भगवान महारुद्रच्या चिरडे सर्वांच्या उपस्थितीत करण्यात आली यावेळी येथे उपस्थित असलेले भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्ह्याचे अध्यक्ष शंकर भाऊ देशमुख साहेब तसेच भारतीय जनता पार्टीमध्ये नुकतेच प्रवेश केलेले गेवराई चे माजी आमदार तथा माजी मंत्री मा श्री बदामरावजी आबा पंडित साहेब व सर्जेराव तात्या तांदळे साहेब प्रशांत डोरले अशोक जी लोढा साहेब सलीम जहागीर साहेब तसेच गणेश जी लांडे पाटील सह आदित्य भैय्या सारडा व बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने अण्णांच्या वाढदिवसानिमित्त अण्णांना शुभेच्छा देण्यासाठी व महाप्रसाद सेवन करण्यासाठी श्रीक्षेत्र पेडगाव या ठिकाणी उपस्थित होते तसेच लोकशाही पत्रकार संघाचे मा संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम जी वावळकर साहेब तसेच माजी नगरसेवक बाबुरावजी परळकर साहेब बीड जिल्हा अध्यक्ष महिला आघाडी तक्षशिला सोनवणे मॅडम तसेच महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाची बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर व मिराताई गांधले सचिन शहागडकर विलास बापू बडगे सखाराम मस्के एडवोकेट जाधव साहेब बाळासाहेब जाधव देविदास नागरगोजे व भाग्यश्री ताई ढाकणे संध्या राजपूत प्रीती कुकडे जा कल्याण व दाजी वाघमारे रामनाथ डाके कंटाळे सर सुरेश शेटे चंद्रसेन मनेरी पाटील रमेश जमदाडे ज्ञानदेव डाके चंद्रकांत मुळे शिवाजी नाईक चंद्रकांत नाईक बाळासाहेब नाईक रामकिसन जगताप किशोर काळकुटे दहिवाळ साहेब जाधव साहेब तावरे साहेब नाटकर साहेब वाघमारे साहेब अर्जुन सह जाधव बीड शहरातील भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व महायुतीचे पदाधिकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते तसेच डॉक्टर वकील प्राध्यापक पत्रकार व सर्व पेंडगाव परिसरातील पंचक्रोशीतील सर्व नागरिक सर्व भाविक भक्त मोठ्या हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

# अंबाजोगाई शहरातील बहुसंख्य नवतरुणाईचा कल राजकिशोर मोदी यांच्याच बाजूने

## दररोज विविध प्रभागातील अनेक नवतरुणांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश



तभा वृत्तसेवा

अंबाजोगाई : अंबाजोगाई नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक जसजशी जवळ येऊ लागली आहे तसा अंबाजोगाई शहरातील नवतारुणांचा ओढा राजकिशोर मोदी यांच्याकडे येऊ लागला आहे. शहरातील विविध प्रभागातील अनेक नवतारुणांचा राष्ट्रवादी काँग्रेस तथा राजकिशोर मोदी यांच्याकडे जाहीर प्रवेश होऊ लागला आहे. या नवतारुण युवा मतदारांच्या मुळे युवा नेते संकेत मोदी तसेच राजकिशोर मोदी यांचा आत्मविश्वास द्विगुणीत होतांना दिसून येत आहे. सर्व नवतरुणाईने एकवटून अंबाजोगाई नगर परिषदेचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी तसेच त्याच्या सर्व नगरसेवकाना मोठ्या मताधिक्याने विजयी करून आणण्यासाठीचा विडा त्यांनी उचलला आहे.

अंबाजोगाई शहरात युवा नेतृत्व संकेत राजकिशोर मोदी यांच्या खांद्याला खांदा लावून त्याची साथ देण्यासाठी अंबाजोगाई शहरातील प्रभाग क्रमांक १, प्रभाग क्रम २ , प्रभाग क्रमांक ३ , ४, ९,१०, ११ ,१२, १४,१५ या प्रभागातील पटाईत गल्ली, बागवान गल्ली , झारे गल्ली, चौभारा परिसर, मंगळवार पेठ, बलुत्याचा मळा, गौड गल्ली, धनगर गल्ली, साबून गल्ली, मणियार गल्ली, सदर बाजार,भोई गल्ली, गवळी पुरा, गांधी नगर, बिलाल नगर, क्रांती नगर या व अशा अनेक भागातील असंख्य नवतरुण बिनशर्त संकेत मोदी तसेच राजकिशोर मोदी यांच्याकडे वळल्या जात आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राधानगरीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मोफत वाटप

## पुणे येथील बाक्स्ट इंडियाचा पुरग्रस्तासाठी पुढाकार



**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, १६ नोव्हेंबर :** ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीत तेरणा नदीला आलेल्या महापुर आला. यामध्ये बाधित झालेल्या कुटुंवांना संसारपयोगी तर मुला, मुलींना आधार देण्यासाठी शालेय साहित्याच्या पुर्ण संचाचे ४०० विद्यार्थ्यांना पुणे येथील बाक्स्ट इंडिया प्रा. लि. कंपनीच्या वतीने विद्या ज्योती उपक्रमाअंतर्गत मोफत वाटप करण्यात आले. सरपंच युवराज गायकवाड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. माजी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष नारायण लोखंडे, औसा खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण, माजी सभापती योगीराज पाटील, राष्ट्रवादीचे सिध्देश्वर आळंगे, शालेय समितीचे अध्यक्ष शब्बीर शेख उपस्थित होते. विद्या-ज्योती प्रकल्पाच्या कार्यक्रमाची सुरुवात भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू व आद्य क्रांतिकारक लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

प्रमुख पाहुण्यांचे शाल, पुष्पहार व गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राधानगर उजनी, जिल्हा परिषद शाळा उजनी, सावित्रीबाई फुले कन्या शाळा राधानगर उजनी या तिन्ही शाळेतील ४०० पूरग्रस्त विद्यार्थ्यांना प्रत्येकी १ हजार रुपये किमतीचे आवश्यक शालेय साहित्य मोफत संच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

वर्षानुवर्षे सततचा दुष्काळ आणि पाणीटंचाईनंतर या वर्षी अतिवृष्टीमुळे महापुराचे संकट आले. यामुळे पुराचे पाणी गावात शिरल्यामुळे गावांचा संपर्क तुटला होता.पुरामुळे शेती खरडून गेली, विहिरी भरल्या, शेतांमध्ये चिखल होवून काढणीसाठी आलेली पिके उद्ध्वस्त झाली. पुराच्या पाण्यामुळे दुधाळ जनावरे वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. तसेच घर संसारासह शालेय विद्यार्थ्यांचे वह्या, पुस्तके, गणवेश, दप्तर यांसारखे शैक्षणिक साहित्य देखील वाहून गेले.

### जीवाचे रान करत यश संपादन करा : तानाजी काळे

विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार व वारसा पुढे सुरू ठेवावा. शिक्षणामुळे आपण यशाचे शिखर गाठु शकतो. आई वडील यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जीवाचे रान करत यश संपादन करा. यावेळी देण्यात आलेली छोटीशी मदत पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचं नुकसान भरून काढण्यासाठी उपयुक्त ठरेल. हाच यामागचा एकमेव उद्देश आहे.

या पुरग्रस्तांना आधार देण्यासाठी पुणे येथील बॉक्स्ट इंडिया प्रा. लि. पिरंगुट या कंपनीच्या वतीने पूरग्रस्त विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय साहित्य संच मोफत वाटप करण्यात आले. यामध्ये स्कूल बॅग, पाणी बॉटल, टिफीन बॉक्स, रजिस्टर, पेन्सील बॉक्स, कंपास पेटी, पेन, ड्रॉईंग वही आदी साहित्य यांचा समावेश आसलेले संच ४०० विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. कंपनीचे ज्योतीराम काळे, विनायक चिल्का, आलिन नायन, दादासाहेब विर, अजित पिल्लाने, आसिफ मुल्ला, सोमनाथ कदम, पल्लवी देसाई, गोधियर दी मोन्टमरीन यांच्यासह जालिंदर शिखरे श्याम मोरे, सुरेश खर्चे आदी उपस्थित होते. शशिकला गवलवाड यांनी सुत्रसंचालन केले. मुख्याध्यापक रमेश काटे यांनी प्रास्ताविक केले तर संजयसिंग बायस यांनी उपस्थितांचे आभार मानले. केले. शिक्षक महानंदा कांबळे, उषा ठाकूर, विद्या नदीवाडे, सुभाष मुळे, अब्दुल करीम शेख यांच्यासह गावातील नागरिक, महिला, पालक व विद्यार्थी हे उपस्थित होते.या प्रकल्पाचा उद्देश राज योगिराज पाटील राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते यांनी स्पष्ट केला. त्यांनी सांगितले की, पुरामुळे कोणीही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये. साहित्य नष्ट झाल्यामुळे शाळा सोडण्याची वेळ येऊ नये. त्यामुळे कंपनीच्या वतीने हा प्रकल्प राबवला जात आहे.

# साकोळ येथील देवणी जातीच्या गायीची परळीत होणाऱ्या पशु प्रदर्शनासाठी शिफारस

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, १६ नोव्हेंबर :** तालुक्यातील साकोळ येथील पशुपालक वाघमारे मनोज सुभाषराव यांच्या देवणी जातीच्या गायीची परळी वैजनाथ येथील साकोळ येथील देवणी जातीच्या गायीची शिफारस तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. ऋषिकेश पाटील यांनी केले.

तालुक्यातील साकोळ येथील मनोज सुभाष वाघमारे यांच्या देवणी गोवंश जातीच्या गायीची परळी येथे होणा-या डिसेंबर २०२५ च्या आखील भारतीय पशुपक्षी प्रदर्शनात शिफारस करित असल्याचे शिरूर अनंतपाळ तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. श्रृषीकेष पाटील यांनी तरुण भारतशी बोलताना म्हणाले. साकोळ येथील पशुपालक मनोज सुभाष वाघमारे हे गेल्या बऱ्याच वर्षांपासून विविध जातीतील गोवंश पाळण्याचा व्यवसाय



त्यांचे वडील सुभाष नरसिंग वाघमारे व आजोबा नरसिंगा वाघमारे यांना देवणी जातीच्या गाईंचे संगोपन करणे फार आवडत होते. नरसिंगा वाघमारे यांचा हा छंद पिढीजात चालत आलेला व्यवसाय आहे. त्यांचा वारसा मनोज सुभाष वाघमारे यांनी पुढं कायम चालू ठेवून पशुपालक शेतकरी वर्गात एक आदर्श ठेवला आहे.

येथील शेतकऱ्यांना नवनवीन लालकंधारी, जरसी, देवणी अशा विविध जातीची गोवंश पाळण्याचा छंद असून हे गोवंश सांभाळण्यासाठी शासन स्तरावर विविध उपक्रम राबविण्यात येऊन जास्तीत जास्त गोवंश पालन कसे करता येईल याकडे शासनांकडून भरीव स्वरूपाचे अनुदान तसेच छोटे मोठे प्रदर्शन भरविण्यात येऊन शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. पशुधनातून मिळणाऱ्या अतिरिक्त आणि स्थिर उत्पन्नामुळे शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेत पशुपालन व त्यापासून दुग्ध व्यवसाय महत्त्वाचा घटक मानला जातो आहे.

म्हणूनच तालुक्यातील साकोळ येथील मनोज सुभाष वाघमारे यांच्या देवणी जातीतील गायीची परळी येथे होणाऱ्या अखील भारतीय पशुप्रदर्शात पाठविण्याची शिफारस तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. श्रृषीकेष पाटील केली असल्याचे त्यांनी सांगितले. मनोज वाघमारे यांच्या देवणी जातीच्या गायीने आतापर्यंत महाराष्ट्रासह दिल्ली, हरियाणा, मध्यप्रदेश, आणि कर्नाटक या राज्यांच्या पशुप्रदर्शनात भाग घेवून अनेक बक्षिसे मिळविली आहेत.

२०२५ मध्ये सुध्दा मनोज वाघमारे यांच्या गायीची शिफारस डॉ. ऋषिकेश पाटील यांनी केल्यामुळे गावातील महेश तिवारी, आशिष धुमाळे, सविचार कांबळे भातांगळीकर, प्रदीप पाटील, व्यंकट रवळे, सत्यम पाटील, मंगेश महाजन, महेश तिवारी, इरफान होनमाळे, देविदास वाघमारे, शेख इरफान, अनंत शिंदे प्रशांत शिंदे, मधुकर कांबळे यांनी शुभेच्छा दिल्या.

# वलांडी येथे ७ व ८ जानेवारीला उमुमी इस्तेमाचे भव्य आयोजन

**त.भा. वृत्तसेवा/**
**रियाज मोमीन**

**वलांडी, १६ नोव्हेंबर :** देवणी तालुक्यातील वलांडी येथे अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर उमुमी इस्तेमा आयोजित होणार असल्याची जाहीर झाली आहे. येत्या ७ व ८ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या या ऐतिहासिक आणि सातही सेंटर्सच्या संयुक्त भव्य इस्तेमासाठीची प्राथमिक नियोजन बैठक रविवारी उस्मानिया फंक्शन हॉल येथे उत्साहात पार पडली.

लातूर व उदगीर येथून विशेष आलेले इस्लाम धर्माचे प्रमुख अमीर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत सर्वसमावेशक नियोजन, समित्यांची जबाबदारी, पाहुण्यांचे स्वागत, कार्यक्रमाची आखणी, निवासव्यवस्था, साफसफाई, पाणीपुरवठा, वाहतूक, सुरक्षा आणि इतर सर्व आवश्यक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस ७ केंद्रांतील एकूण ८७ मशिदींचे प्रमुख, जबाबदार आणि मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वलांडी सेंटर, देवणी सेंटर, गुरुनाळ सेंटर, मोगा सेंटर, कमालनगर सेंटर, उदगीरचे दोन प्रमुख झोन हे समाविष्ट सात सेंटर्स आहेत.

सर्व प्रतिनिधींनी इस्तेम्याच्या सर्व सोयी-सुविधा पुरविण्याची जबाबदारी आनंदाने स्वीकारली असे सांगून पूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले.

वलांडीतील इस्लामिक धर्माचे तरुण मंडळींनी संपूर्ण जिमी मशवर्याचे नियोजन अत्यंत शिस्तबद्धरीत्या पार पाडले. सकाळी ९ ते ११ या वेळेत झालेल्या मशवर्यात उपस्थितांनी भावनिक आणि उत्साही वातावरणात तयारीला सुरुवात झाली असल्याचा आनंद व्यक्त केला.

येणारा उमुमी इस्तेमा हा सात सेंटर्सचा संयुक्त आणि भव्य आयोजन म्हणून वलांडीमध्ये पार पडणार आहे. या यशस्वी प्रारंभिक बैठकीनंतर आता पुढील नियोजनाला गती मिळणार असून, इस्तेम्याच्या सर्व तयारीचे काम अधिक जोमाने हाती घेतले जाणार आहे.

# भाजपने ‘बिहार’च्या विजयोत्सव केला साजरा

**त.भा. वृत्तसेवा**

**निलंगा, १६ नोव्हेंबर :** भारतीय जनता पार्टी व संयुक्त जनता दल प्रणित एनडीए आघाडीने बिहार विधानसभा निवडणुकीत मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाबद्दल या विजयाचे शिल्पकार पंतप्रधान. नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा व या प्रचार मोहिमेत मोलाची भूमिका बजावणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व भाजपा कार्यकर्त्यांचे अभिनंदन करून भाजपा युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या



नेतृत्वाखाली निलंगा शहरात फटाक्यांची आतिषबाजी करून व मिठाई वाटप करून बिहारच्या विजयोत्सव साजरा करण्यात आला.

बिहारचा निकाल हा फक्त एक ऐतिहासिक विजय नसून देशात होत असलेल्या परिवर्तनाचे ते द्योतक आहे. विरोधकांनी पसरवलेल्या वोटचोरी सारख्या खोट्या अफवांना दिलेले हे चोख उत्तर आहे. बिहारी जनतेने विरोधकांना या निकालातून सांगितले आहे, तुम्ही किती खोटी राळ उठवली. तरी हा देश भाजप आणि विकास सोबतच राहणार आहे. यावेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष शेषेराव ममाळे, संजय दोरवे, शहराध्यक्ष रवी फुलारी, वैभव पाटील, ईश्वर पाटील, भगवान बाहेती, सुमित इन्नानी, शरद पेठकर, किशोर लंगोटे, त्यांच्या मोठ्या संख्येने भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

# ‘यशवंत’च्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय स्पर्धेत सादरीकरण

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १६ नोव्हेंबर :** राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण प्रकल्प २०२४-२५ अन्वये राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा दि.१२ नोव्हेंबर रोजी पुणे येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेत यशवंत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्तम सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली.

या मध्ये लिंग समानता, पर्यावरण संरक्षण, सायबर सुरक्षा अशा विषयावर लोकनृत्याचे सादरीकरण झाले. सदरील स्पर्धेत यशवंत विद्यालय अहमदपूर येथील स्वराली घाटोळ, मोक्षा बाफना, अंकिता फड,प्राची मिरजगावे, खुशी इरले यांनी हिंसा व व दुखापती पासून संरक्षण या विषयावर लोकनृत्य सादर केले. कार्यक्रम उद्घाटनप्रसंगी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे-चे संचालक राहुल रेखावार (भाप्रसे), सहसंचालक डॉ. कमलादेवी आवटे, उपसंचालक श्रीमती ज्योती शिंदे, श्रीमती वर्षाराणी भोपळे, सामाजिक शास्त्र विभागाचे उपसंचालक अरुण जाधव, दत्तात्रय थिटे, रामेश्वर लोटके, श्रीमती ज्योती शिंदे यांच्या उपस्थितीत यशवंत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या हस्ते



कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. सुत्र संचलन बाळासाहेब गायकवाड यांनी केले तर आभार ज्योती शिंदे यांनी मानले.

या सादरीकरणाबद्दल संचालक राहुल रेखावार, डॉ. कमलादेवी आवटे, श्रीमती ज्योती शिंदे, श्रीमती वर्षाराणी भोपळे, अरुण जाधव, दत्तात्रय थिटे, रामेश्वर लोटके, श्रीमती ज्योती शिंदे, बाळासाहेब गायकवाड, टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक सांगवीकर, संस्थेचे सचिव डी.बी.लोहारे गुरुजी, डॉ. भालचंद्र पैके, डॉ. सुनिता चवळे, प्राचार्य गजानन शिंदे, माधव वाघमारे, रामलिंग तत्तापुरे, शिवाजी सुर्यवंशी आदींनी अभिनंदन केले.

# तुगाव पीएम श्री शाळेत बालदिन, पालक मेळावा

**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, १६ नोव्हेंबर :** सीमा भागातील भालकी तालुक्यातील तुगाव हा येथील पी एम श्री सरकारी आदर्श प्राथमिक शाळेमध्ये १४ नोव्हेंबर रोजी शुक्रवारी बालदिन व महापालक मेळावा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व सरस्वती माता प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापिका सौ. मुक्ताताई एकलुरे व तुगाव हा ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. सविता पिचरुटे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मेहकर पोलीस स्टेशनचे पीएसआय सुदर्शन रड्डी, माजी सरपंच जाकिया निसार मुजावर शाळा सुधारणा समिती अध्यक्ष बालाजी आडबाळे, सौ. जगदेवी मुळे, पीडीओ मगर पाटील, खंडू मुळे, पप्पू तुळजापुरे, पत्रकार दत्तात्रय साबणे या प्रमुख मान्यवरांचा शाळेच्या वतीने शाल पुष्पहार देऊन सात्विक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सौ. जयमाला पुरकर यांनी प्रार्थना गीत गायले. प्रास्ताविक सौ. वर्षा पाटील यांनी केले.

यावेळी शिक्षक-शिक्षिका अशोक रामा, नरसिंग मेहत्रे, अर्जुन कांचे, संतोष लासूने, अनंतोष सूर्यवंशी, दत्ता सूर्यवंशी, सौ. जय माला पुरकर, सौ. वर्षा पाटील, सौ. शोभाताई मजकुरे, रेणुका जाधव, सौ. शिल्पा पाटील, सौ. श्वेता कोणे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित मंडळी, शिक्षक-शिक्षिका, माता-बहिणी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नरसिंग मेहत्रे यांनी तर आभार प्रदर्शन सौ. शिल्पा पाटील यांनी मानले.

# रेणापूर नगराध्यक्षपदासाठी शोभा आकनगिरेंचा उमेदवारी अर्ज दाखल

**त.भा. वृत्तसेवा,**

**रेणापूर , १६ नोव्हेंबर :** रेणापूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदासाठी भाजपाच्या वतीने श्रीमती शोभा शामराव आकनगिरे यांचा उमेदवारी अर्ज १५ नोव्हेंबर शनिवार रोजी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत दाखल करण्यात आला. यावेळी भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी होते.

येत्या २ डिसेंबर रोजी रेणापूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी मतदान होणार असून भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वाखाली रेणापूर शहरात कोट्यावधी रुपये खर्चाच्या केलेल्या विविध विकास कामाच्या आधारावर संपूर्ण ताकतीनीशी भारतीय जनता पार्टी निवडणूक रिंगणात उतरली आहे.

या निवडणुकीत नगराध्यक्षपद महिलेकरिता आरक्षित असून या पदासाठी भाजपाच्या वतीने श्रीमती शोभा शामराव आकनगिरे यांनी भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत १५ नोव्हेंबर शनिवार रोजी दुपारी रेणापूर तहसील कार्यालय येथे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ



भोसले, जिल्हा चिटणीस दशरथ सरवदे, माजी सभापती अनिल भिसे, उपसभापती अनंत चव्हाण, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, शरद दरेकर, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, शहराध्यक्ष अच्युत कातळे, किसान मोर्चाचे साहेबराव मुळे, महादेव साळुंखे, अँड मनोज कराड, सरपंच सुनील चेवले, रवींद्र नागरगोजे, नामदेव बोबडे, विष्णू गोरे, पद्माकर चिंचोलकर, रवींद्र पाटील, रामराव मोरे, विजय चव्हाण, श्रीकृष्ण मोटेगावकर, दत्ता सरवदे, यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# शेळगाव, परीसरातील शेतकऱ्यांना नाम फाउंडेशनकडून मोफत बियाणे वाटप

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, १६ नोव्हेंबर :** चाकूर तालुक्यातील शेळगाव व परीसरातील १५० शेतकऱ्यांना हरभरा व ज्वारी बियाण्यांचे दि.१४ नोव्हेंबर रोजी मोफत वाटप करण्यात आले.

नाम फाउंडेशन व बीएएसएफ या संस्थेच्या वतीने शेळगाव, राचन्नावाडी, चवळेवाडी, संगाचीवाडी येथील शेतकऱ्यांना मोफत रब्बी हंगामासाठी हरभरा व ज्वारी बियाणेच्या १५० बॅगांचे मनोज नानासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली निलेश भोसले व नाम फाऊंडेशनचे जिल्हा समन्वयक विलास चामे यांच्या हस्ते बियाणे वाटप करण्यात आले.

मागील काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रासह लातूर जिल्ह्यातील शेळगाव परीसरात मोठ्याप्रमाणात अतिवृष्टी व पुरस्थिती निर्माण होऊन शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला आहे, यांना सहाय्य करण्याचे सामाजीक उदात्व हेतू ठेऊन नाम फाऊंडेशनचे जिल्हा समन्वयक विलास चामे यांना वेळोवेळी संपर्कात राहून मनोज नानासाहेब पाटील यांनी शेळगाव व परीसरातील बाधीत शेतकरी आर्थिक संकटात येऊ नये, त्यांना रब्बीच्या पेरणीसाठी मदत करावे म्हणून नाम फाउंडेशन कडे शेतकऱ्यांसाठी सहाय्य करण्याची विनंती केली होती. यांचेकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला परीसरातील शेतकऱ्यांस



रब्बी हंगामासाठी मोफत हरभरा व ज्वारी बियाणेच्या १५० बॅगचे वाटप करण्यात आले.यावेळी शेतकऱ्यांना रब्बीच्या पेरणीसाठी हरभरा व ज्वारी या बियाण्यांचे मोफत बियाणे मिळाल्याने शेतकऱ्यांकडून नाम फाऊंडेशन व युवा कार्यकर्ते मनोज पाटील यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी शेळगावचे ग्रामसेवक बी.एन.शिंदे, चेअरमन शिवाजी वागलगावे, संचालक संपत मलिशे,उत्तम सोनकांबळे, ग्रामरोजगार सहाय्यक बापुराव माने, पत्रकार सतिष गाडेकर, शेतकरी मुकुंद कस्तूरे, सोमनाथ वाडकर, उमाकांत झुलपे, दिनकर कुलकर्णी, सुरेश पाटील, रामरतन पाटील, शरद पाटील, मन्मथ पाटील, प्रेमरस चवळे, विद्यासागर चवळे, सोमनाथ चवळे, नवनाथ तोंडारे, संगम हावा, रामराजे पाटील, मारोती पाटील, दयानंद बिराजदार, प्रमोद पाटील, शाम बोरुळवाड, खंडू वागलगावे, पुंडलिक सुरवसे, धनराज घुमाडे, माधव वागलगावे सह २०० शेतकरी बांधव यावेळी उपस्थीत होते.

शेतकरी व गावकरी बांधवाना जेथून मदतीचा हात मिळेल ते देण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील असणार आहोत. परीसरातील व्यापारी तसेच शेतकरी, वयोवृध्द, नागरीकांना डीसीसी बँकेची सुवीधा उपलब्ध करुन देण्यात आली व शासनाचे खरेदी विक्री केंद्र सुरू करुण आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व शेतकरी वर्गाला सतत दिलासा देण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहोत, अशी माहिती युवा कार्यकर्ते मनोज पाटील यांनी दिली.

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार **श्री. प्रमोद वसंतराव नखाते** यांनी रमाकांत नामदेव सुर्यवंशी, रा. झरी खु., ता.चाकूर जि. लातूर यांच्या स्वकष्टार्जीत मालकी व ताब्यातील **मौ. चाकूर, ता. चाकूर जि. लातूर** येथील जमीन गट नं. ४७१/१/१४ मधील प्लॉट नं. २ ज्याचा नगर पंचायत मिळकत नं. ६६६० असून ज्याचा अकृषी क्र. २००३/एन.ए./सी.आर./डब्ल्यु. एस./२२१ सब डिव्हीजनल ऑफिस उदगीर दिनांक २५/०१/२०२३ अधारे अकृषी केलेला प्लॉट ज्याची साईज **पूर्वेस-२० फुट रस्ता, पश्चिमेस-बंडाप्पा मल्लिकार्जुन कंठे यांची जमीन, दक्षिणेस - प्लॉट नंबर १, उत्तरेस - प्लॉट नंबर ३.**

येणेप्रमाणे वरील चतुसिर्मेच्या आतील मौ. चाकूर येथील खुला प्लॉट माझे पक्षकार यांनी कायम खरेदी करण्याचा ठराब केला असून ठरावापोटी ठरलेल्या रक्कमे पैकी त्यांना इसारा रक्कम पंचा समक्ष दिलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वीवाद व निरजोखमी असल्याचे लिहून देणार यांनी सांगीतले आहे. तरी परंतु माझे पक्षकार यांनी सर्व जनतेच्या माहितीसाठी सदर जाहीर प्रगटनाद्वारे कळवण्यात येते की, सदर मिळकती संबंधी कोणाचे हितसंबंध, दावा, हक्क, करार, मदार तसेच कर्ज बोजा, गहाणखत, अथवा इतर कुठल्याही प्रकारचे हितसंबंध असतील त्यांनी सदर जाहीर प्रगटन झाल्यापासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर लेखी उजर, हरकती कळवाव्यात अन्यथा सदरची मिळकत ही निर्विवाद व निरजोखमी असल्याचे समजून माझे पक्षकार पुढील व्यवहार पुर्ण करतील व त्या नंतर आलेल्या उजर किंवा आक्षेप माझे पक्षकार यांच्यावर बंधनकारक रहाणार नाहीत.

याची सर्व जनतेने नोंद घ्यावी. सबब हे जाहीर प्रगटन.

**दिनांक : १६/११/२०२५.**

**अॅड. बी. बी. नंदागवळे**
कार्यालय : लिगल पॉइंट, शॉप नंबर १२, उद्योग भवन,
एमआयडीसी, चाकूर
जाहीर प्रगटन देणार : **श्री.प्रमोद वसंतराव नखाते**
रा.चाकूर ता. चाकूर जि. लातूर

## संक्षिप्त वृत्त...

### विद्यार्थ्यांसाठी कृषी पदवीत करिअरच्या संधी- प्रा.कौसडीकर

**परभणी,/प्रतिनिधी :** कृषी पदवी आणि कृषी क्षेत्रातील तज्ज्ञता ही भविष्यकाळातील सर्वात मोठी करिअर संधी ठरणार आहे, असे प्रतिपादन कृषी विद्यापीठातील मृदा विज्ञान विभागाचे प्रमुख व संशोधन विभागाचे उपसंचालक प्रा. डॉ. हरिहर कौसडीकर यांनी केले.

नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा हायस्कूल, शिवाजीनगर येथे आठवी 'ब' वर्गासाठी आयोजित 'ऋणानुबंध' मार्गदर्शन उपक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाला नूतन विद्या समितीचे सहसचिव तथा प्राचार्य अनंत पांडे, पर्यवेक्षक पाटील, रामपूरकर, ज्येष्ठ शिक्षिका सौ. विद्या सोनूने, तसेच ब्लड बँकेचे पंकज खेडकर उपस्थित होते.

कौसडीकर यांनी कृषी विद्यापीठांतर्गत उपलब्ध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम, संशोधनाच्या दिशा, तसेच कृषी उद्योग, ॲग्री-बिझनेस, मृदा विज्ञान, पिकशास्त्र, कृषी अभियांत्रिकी, उद्यानविद्या अशा विविध शाखांमधील करिअर संधींचे सविस्तर मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. भारत हा कृषीप्रधान देश असून भविष्यात शेती व्यवसायाला अत्यंत महत्त्व प्राप्त होणार आहे. त्यामुळे कृषी शिक्षणाचा जास्तीत जास्त लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे त्यांनी सांगितले.
कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांशी संवादात्मक प्रश्नोत्तर सत्रही घेण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी समीक्षा कावळे यांनी केले. प्रास्ताविक सौ. विद्या सोनूने यांनी सादर केले तर आभार प्रदर्शन बेदरकर यांनी केले.

### पाथरगव्हाण बुद्रक शिवारातील अचानक लागलेल्या आगीत ऊस जळून खाक

**परभणी,/प्रतिनिधी :** पाथरी तालुक्यातील पाथरगव्हाण बुद्रुक शिवारात शनिवारी (दि. १५) सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास विद्युत वाहिनी तारांमध्ये अचानक झालेल्या शॉर्टसर्किटमुळे १५ एकर क्षेत्रावरील ऊस जळून खाक झाला.

या आगीत भारत गणेश घांडगे यांचा दोन एकर, रामेश्वर भानुदास वरकड यांचा दोन एकर दहा गुंठे, ज्ञानेश्वर वरकड यांचा अडीच एकर, सखाराम संतराम घांडगे यांचा एक एकर, सुभाष आबासाहेब घांडगे यांचा तीन एकर वीस गुंठे, बालासाहेब श्रीमंत घाडगे यांचा दोन एकर ऊस जळून खाक झाला. आगीच्या या घटनेत शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

परिसरातील हदगाव येथील ३३ केव्ही विद्युत केंद्र परिसरातील विद्युत प्रवाहित तार अचानक तुटल्याने शॉर्टसर्किट होऊन आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. आगीत ऊस जळून भस्म झाल्याने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याची मागणी होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल माने यांनी तर आभार प्रदर्शन दीपक बन यांनी केले.

### 'रायरेश्वर'च्या दोन विद्यार्थीनींची राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** क्रीडा व सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या विभागीय मैदानी स्पर्धेत धर्मापुरी येथील रायरेश्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील श्रीशा सुनीलराव देशमुख हीने ४ किमी डिव्हिजन क्रॉस कंट्रीमध्ये तिसरा तर पुनम भगवानराव तिथे हीने चौथा क्रमांक पटकावला असून त्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी पात्र ठरल्या आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्था अध्यक्ष तथा प्राचार्य किरण सोनटक्के व संस्था सचिव तथा प्राचार्य सौ. शितल सोनटक्के यांच्यासह सर्व समन्वयक, विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी खेळाडूंचे व प्रशिक्षक मार्गदर्शकाचे अभिनंदन केले असून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### भगवान बिरसा मुंडा तरुणासाठी आदर्श : प्रा. डॉ. सुरेश शेळके

#### शारदा महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम

**परभणी,/प्रतिनिधी :** भगवान बिरसा मुंडा यांनी अवघ्या पंचवीस वर्षात भारतीय स्वातंत्र्य संग्रामात झोकून देऊन इंग्रजांना सळो की पळो करून सोडले, तसेच जल, जंगल, जमीन हक्क अबाधित राहून आदिवासी संस्कृतीसाठीचे संरक्षण व्हावे यासाठी बहुमोल कार्य केले. त्यांचा आदर्श घेऊन तरुणांनी आपल्या देशाला समृद्ध करण्याचे काम करावे, असे आवाहन प्रा. डॉ सुरेश शेळके यांनी केले. येथील शारदा महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने भगवान बिरसा मुंडा यांची शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती जनजाती गौरव दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी घेण्यात आलेल्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. बबन पवार तर प्रमुख अतिथी म्हणून नागनाथ महाविद्यालय औंढा नागनाथ येथील हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ सुरेश शेळके उपस्थित होते. तर यावेळी व्यासपीठावर उप प्राचार्य डॉ. श्यामसुंदर वाघमारे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. संतोष नाकाडे व भगवान रिठाड उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. सुरेश शेळके म्हणाले की, आपल्या देशाची भूमी ही वीरांची असून संत ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व भगवान बिरसा मुंडा यांनी अत्यंत कमी वयात बहुमोल कार्य केले. संत ज्ञानेश्वरानी सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली, छत्रपती शिवाजी महाराजांनी पंधराव्या वर्षी स्वराज्याचे तोरण बांधले, छत्रपती संभाजी महाराजांनी चौदाव्या वर्षी तीन ग्रंथ लिहिले, सावित्रीबाई फुले यांनी महात्मा फुले यांच्या साथीने देशातली पहिली मुलींची शाळा उभी केली.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

**तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.**

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# क्रीडा ही केवळ स्पर्धा नसुन शिस्त, चिकाटी आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित करणारी जीवनशैली- कुलगूरु

## वनामकृविद्वारा आयोजित अंतरमहाविद्यालयीन खो-खो स्पर्धेला उत्साहपूर्ण प्रतिसाद

**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी-** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांच्या विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालय आणि जीवन ज्योती चॅरिटेबल ट्रस्ट संचालित राजीव गांधी कृषी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित अंतरमहाविद्यालयीन खो-खो (मुली) स्पर्धेला उत्साहपूर्ण प्रतिसाद मिळाला.

महाविद्यालयाच्या प्रांगणात सकाळी १०.०० वाजता या स्पर्धेचे भव्य उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी उपस्थित राहून खेळाडूंना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आपल्या उद्बोधनात त्यांनी क्रीडा ही केवळ स्पर्धा नसून शिस्त, चिकाटी, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित करणारी जीवनशैली असल्याचे अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत क्रीडाक्षेत्रातही समान प्राविण्य मिळवून 'आरोग्यदायी शरीरातच आरोग्यदायी मन' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवावी, असे आवाहन करत त्यांनी सर्व सहभागी खेळाडूंना उत्तुंग यशाच्या शुभेच्छा दिल्या.



तसेच विद्यापीठ प्रशासन क्रीडा पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षणाच्या संधी अधिक सक्षम करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जीवन ज्योती चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा मा. श्रीमती लक्ष्मीताई अशोकराव देशमुख या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राजेश कदम, तसेच विद्यापीठाचे क्रीडा शिक्षक प्रा. संघर्ष शृंगारे, कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. प्रशांत भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार यांनी आपल्या मनोगतातून खो-खो खेळाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी खो-खो हा केवळ खेळ नसून चपळता, तत्परता, संघभावना आणि शारीरिक-मानसिक सहनशक्ती विकसित करणारा भारतीय पारंपरिक वारसा असल्याचे सांगितले. खो-खो सारख्या स्थानिक खेळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती विकसित होते, तसेच टीमवर्क आणि निर्णयक्षमता वाढीस लागते, असे ते म्हणाले.

विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राजेश कदम यांनीही विद्यापीठातील क्रीडा क्षेत्रात विद्यार्थिनींचा वाढता सहभाग ही अत्यंत अभिमानास्पद आणि सकारात्मक घडामोड असल्याचे सांगितले. महिला विद्यार्थिनी पारंपरिक मर्यादांपलीकडे जाऊन क्रीडा क्षेत्रात दमदार कामगिरी करीत आहेत. त्यांना मिळणारे प्रोत्साहन आणि सुविधा यामुळे भविष्यात अनेक उत्कृष्ट खेळाडू घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या स्पर्धेचे यशस्वी आयोजन राजीव गांधी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.बी. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ. अभिजित कंडेरे यांनी संपूर्ण समन्वयाचे उत्कृष्ट नियोजन करून स्पर्धेला गतिमान स्वरूप दिले.

स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या विविध महाविद्यालयांतील महिला खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कौशल्यपूर्ण चढाओढ, झपाट्याचे धावणे, चपळता आणि संघभावना यांचे सुंदर प्रदर्शन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कार, संघभावना, शिस्तबद्धता आणि शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व अधिक दृढ झाले. तसेच विद्यापीठीय पातळीवर मुलींच्या खेळांना दिले जाणारे प्रोत्साहन आणि सुविधा यांचेही सर्वत्र कौतुक झाले.

क्रीडा विभागाच्या या उपक्रमाने वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात महिला विद्यार्थिनींना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देण्याचा नवा आदर्श निर्माण केला असून भविष्यातही अशा स्पर्धांमुळे प्रतिभावान खेळाडू घडण्यासाठी मार्ग मोकळा होणार आहे.

## भाजपाकडून प्रताप देशमुख यांचा उमेदवारी अर्ज नगराध्यपदासाठी दाखल




**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत जवळ येत असताना स्थानिक राजकारणात एक नवा वळण दिसून आला आहे. भारतीय जनता पार्टी कडून उमेदवारी निश्चित करण्यात आलीआहे नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी दाखल केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार प्रताप भैया देशमुख यानी काही वर्ष पुर्वी जिंतूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणून अडीच वर्षे काम केले आहे त्यांच्या काळात त्यांनी अनेक विकास काम केले आहे व स्वच्छतेचे शहरांमध्ये पाणीपुरवठा आरोग्य सुविधा शिक्षण यासारख्या अनेक योजना त्यांचा भर होता त्यांच्या काळामध्ये जिंतूर शहरांमध्ये विविध विकासकामे केले आहेत .

त्यामुळे त्यांनी परत नगराध्यक्ष पदासाठी भारतीय जनता पार्टी कडून उमेदवारी दाखल केली आहे देशाचे पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी व महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस तसेच परभणी जिल्ह्याच्या कार्यसम्राट पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर व परभणी जिल्ह्याचे भाजपचे माजी आ.रामप्रसादजी बोर्डीकर यांनी माझ्यावर जो विश्वास टाकला त्या विश्वासाला मी कुठल्याही प्रकारचा तडा जाऊ देणार नाही अशी ते म्हणाली आज दिनांक १६ रोजी निवडणूक निर्वाचन अधिकारी यांच्याकडे त्यांनी आपली उमेदवारी अर्ज दाखल केला.

### माधवराव पाटील महाविद्यालयात पंडित नेहरू जयंती साजरी

**पालम-** पालम येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे माधवराव पाटील महाविद्यालयात पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ए.डी.आरसुळे,माजी प्राचार्य डॉ. एच.टी. सातपुते,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. कालिदास गुडदे व्यासपीठावर उपस्थित होते. सर्वप्रथम पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार करून कार्यक्रमाचे सुरुवात झाली. प्राचार्य डॉ. ए. डी. आरसुळे यांनी आपल्या मनोगतात पंडित जवाहरलाल नेहरू यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान, पंतप्रधान म्हणून केलेले कार्य आणि विज्ञान युगाची सुरुवात इत्यादी बाबीवर विचार व्यक्त केले. डॉ. एच.टी. सातपुते यांनी भारत सर्वात मोठी लोकशाही असून याचे सर्व श्रेय पंडित जवाहरलाल नेहरू यांना जात असल्याचे म्हटले. याप्रसंगी महा विद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मुरकुटे यांची शेतकऱ्यांसाठी मदतीची मागणी

**शांतीलाल शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी:** तालुक्यातील अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांची



दयनीय स्थिती लक्षात घेऊन शेतकऱ्यांना हेक्टरी किमान ५० हजार रुपये मदत द्यावी, अशी मागणी भाजपा शहराध्यक्ष पांडुरंग रोकडे यांच्या नेतृत्वाखाली पालम तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली.या संदर्भात भाजपा माजी जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ मुरकुटे यांनी पालम-पूर्णा तालुक्यातील विविध भागांचा दौरा करून प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन पाहणी केली. रावराजुर सर्कल,चाटोरी सर्कल,बनवस सर्कल, पेठशिवणी सर्कल सह पालम शहर येथे शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.अतिवृष्टी मुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.
शेतकऱ्यांना जगण्यासाठी तातडीने आर्थिक मदतीची गरज आहे.या पार्श्वभूमीवर पालम तहसील कार्यालयात जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात आले.
पालम शहरातील खंडोबा मंदिर ते मारुती मंदिर मार्ग,चॉंद शहावली दर्गा परिसर,चर्मकार गल्ली, टेक गल्ली या भागांमध्ये नदीच्या पुराच्या पाण्याने अक्षरशः थैमान घातले होते. या भागातील घरांमध्ये दोन दिवस पाणी साचून राहिल्यामुळे घरगुती वस्तूंचे व घरांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. बाधित कुटुंबांना पालम जिल्हा परिषद शाळेत स्थलांतरित करण्यात आले होते. या कुटुंबांचे पंचनामे करून त्यांना आर्थिक मदत द्यावी,अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.या पाहणी दौऱ्यामध्ये भाजपा उप जिल्हाध्यक्ष गोपीनाथराव तुडमे, तालुका अध्यक व युवा मोर्चा तालुकाध्यक्ष तसेच प्रदेश कार्यकारी सदस्य लक्ष्मणराव रोकडे, शहराध्यक्ष पांडुरंग रोकडे तात्या,नंदकिशोर बल्लारे अप्पा, मुंजाभाऊ रोकडे, यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांचा सहभाग होता.
निवेदनावर पालम शहराध्यक्ष रोकडे, मुंजाभाऊ रोकडे,रामदास नाईकवाडे, आताऊला पठाण,बसवेश्वर लिंगायत आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मानवत नगरपरिषद निवडणूक : सेनाभाजप युती जाहीर

## नगराध्यक्ष पदाची उमेदवारी शिवसेनेला ; भाजप 'बॅकफूट'वर

**महेश दिशागत**

**मानवत ,/प्रतिनिधी-** मानवत नगरपरिषद निवडणुकीत शिवसेना भाजप युतीची अधिकृत घोषणा १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता झाली. जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष बालकिशन चांडक यांच्या घरी पार पडलेल्या महायुतीच्या बैठकीनंतर घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत हा निर्णय जाहीर करण्यात आला.

यावेळी मानवत नगराध्यक्ष पदासाठी शिवसेनेच्या अंजली महेश कोक्कर यांची उमेदवार म्हणून घोषणा करण्यात आली. ही घोषणा होताच भाजपने मागील आठवड्यात केलेला नगराध्यक्ष पदावरील दावा फोल ठरला असून, भाजप 'बॅकफुट' वर गेल्याचे चित्र दिसून आले. बैठक झाली वरिष्ठांच्या उपस्थितीत बैठकीस माजी आमदार सुरेश वरपूडकर, शिवसेना अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष



सईद खान, भाजप जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष शिवाजीराव मव्हाळे आदी पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत अंजली कोक्कर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. पत्रकारांनी भाजपच्या दाव्यावर प्रश्न उपस्थित केला असता, भाजप जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे कोणतेही स्पष्ट उत्तर देऊ शकले नाहीत. काही दिवसांपूर्वीच महेश्वरी मंगल कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन नगराध्यक्ष पदावर भाजपचा दावा असल्याचे त्यांनी आवेशात जाहीर केले होते. मात्र, महायुतीच्या तडजोडीत हे पद शिवसेनेला बहाल होताच त्यांचा दावा फोल ठरल्याचे दिसले. शिवाय, शिवसेनेतील काही कार्यकर्त्यांना भाजपमध्ये प्रवेश देऊन उमेदवारी देण्याची प्रक्रिया दिसून आल्याने निष्ठावंत भाजप कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचे वातावरण असल्याचेही जाणवले. यावेळी बालाजी कुऱ्हाडे, शिवनारायण सारडा, अनंत गोलाईत, अनंत भदर्गे, बालाजी गोलाईत, अ. रफिक अ. करीम, अनिस राज, महेश कोक्कर, दिगंबर दहे आदी उपस्थित होते.

### भाजप जिल्हाध्यक्षांचा दावा फोल ठरला

**भाजप जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे यांनी पत्रकार परिषदेत नगराध्यक्ष पदावर भाजपचा दाव्यासह जोरदार भूमिका मांडली होती. परंतु महायुतीमध्ये हे पद शिवसेनेला मिळाल्याने त्यांचा दावा कोलमडला आणि भाजप 'बॅकफूट' वर गेल्याची स्थिती निर्माण झाली आहे.**

### ''गावासाठी काम करणाऱ्यांसोबतच'' -बालकिशन चांडक

पत्रकार परिषद काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष बालकिशन चांडक यांच्या घरी घेतल्याने ते काँग्रेस सोडणार का, असा प्रश्न पत्रकारांनी उपस्थित केला. यावर उत्तर देताना चांडक म्हणाले, ''गाव, जिल्हा, राज्य, देशासाठी काम करणाऱ्यांच्या सोबत आम्ही सदैव असतो.'' मात्र, काँग्रेस सोडण्याबाबत त्यांनी स्पष्ट उत्तर देण्यास टाळाटाळ केली.

### निष्ठावंतांचे काय ?

युतीच्या चर्चेत शिवसेनेतील काही इच्छुकांना भाजपमध्ये प्रवेश देऊन उमेदवारी देण्यात येत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे भाजपच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलल्याची नाराजी उफाळून आली आहे. भाजप ओबीसी सेलचे जिल्हा उपाध्यक्ष राजू उर्फ ज्ञानोबा कच्छवे यांनी प्रभाग क्रमांक २ मधून उमेदवारी मागितली होती. मात्र, घोषणा न झाल्यामुळे त्यांनी मैत्रीपूर्ण लढत लढण्याचा निर्धार केल्याचे समोर आले आहे. अशीच परिस्थिती प्रभाग क्रमांक पाच मधील इच्छुक उमेदवार भाजपाचे शहर अध्यक्ष संदीप हंचाटे यांचे देखील आहे. ते देखील प्रभागातून नगरसेवक पदासाठी इच्छुक आहेत परंतु त्यांना युतीच्या तडजोडीमुळे उमेदवारी नाकारली जात आहे. भाजपाचा आपल्या पदाधिकाऱ्यांना उमेदवारी देऊ शकत नसेल तर असल्या तर जोडी काय कामाच्या अशी चर्चा आता शहरात होऊ लागली आहे

### जिल्हयात पालिका निवडणूकीसाठी आजचा दिवस उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी शेवटचा

**परभणी,/प्रतिनिधी-** जिल्हयातील पाथरी,सोनपेठ, मानवत, सेलू, जिंतूर, पूर्णा, गंगाखेड नगरपालिकेच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आजचा दिवस शेवटचा असून या दिवशी उमेदवारांची अर्ज दाखल करण्यासाठी मोठी तारांबळ उडणार आहे.
जिल्हयातील सातही नगरपालिकेच्या निवडणूकीच्या निवडणुक कार्यक्रम जाहिर करण्यात आला होता.
त्याअनुंषगाने दि.१० नोव्हेंबर पासून अर्ज दाखल करण्यास प्रारंभ झाला. आज दि.१७ नोव्हेंबर म्हणजेच उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटचा दिवस आहे. त्यामुळे या दिवशी एच्छुक, नगराध्यक्षपदाचे दावेदार उमेदवार, तसेच पालिकेच्या निवडणू लढवू ईच्छाणाऱ्या सर्वांनाच आज दिवशी अर्ज दाखल करण्याची शेवटची वेळ आहे. त्यामुळे सोमवार दि.१७ नोव्हेंबर रोजी उमेदवारांची मोठी तारांबळ उडणार असे चित्र आता दिसणार आहे.

# वॉन्टेड गुंडावर गोळीबार करुन अटक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ नोव्हेंबर-**

गंभीर गुन्ह्यामध्ये पाहिजे असलेल्या रबज्योतसिंघ उर्फ गब्या नावाच्या गुंडास वजिराबाद पोलिसांनी गोळीबार करुन ताब्यात घेतले. हि घटना दि.१६ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री बाराच्या सुमारास शहरातील भगतसिंघ रस्त्यावर घडली.



वजिराबाद पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाला दि.१६ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री शहिद भगतसिंघ रस्त्यावर खंडणी, जिवघेणे हल्ले अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये पाहिजे असलेला आरोपी रबज्योतसिंघ उर्फ गब्या हा दिसला. पोलिसांनी त्याला अटक करण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांवर झडप घालून त्याने पळ काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलीस अंमलदार गणेश धुमाळ यांनी बचावात्मक कारवाई करत त्याच्या कंबरेवर गोळी झाडली. यात तो जखमी झाल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्यावर सध्या उपचार सुरु आहेत. या प्रकरणी गणेश धुमाळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रबज्योतसिंघ उर्फ गब्या याच्यावर स्थानिकांना धमकावणे, खंडणी उकळणे, गुन्हेगारी टोळ्यामार्फत वसुली करणे, जिवघेणे हल्ले करणे आदी गंभीर गुन्हे दाखल असून, मागील अनेक वर्षापासून तो फरार होता. दिर्घकाळ पसार असलेल्या गब्याला वजिराबाद गुन्हे शोध पथकाने अटक केली असून, त्यांच्या या कारवाईचे सर्वत्र कौतूक होत आहे.

# योग केल्यामुळे मनाचे प्रदूषण आजारापासून लांब राहते : नरेंद्र चव्हाण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ नोव्हेंबर-**

योग केल्यामुळे मनाचे प्रदूषण आजारापासून लांब राहते तसेच ज्यांचे कडे लक्ष्मी आहे ती येते किंवा जाते परंतु ज्यांच्याकडे सरस्वती आहे त्यांच्याकडे लक्ष्मी ही असते असे प्रमुख प्रतिपादन भाऊराव सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष नरेंद्र चव्हाण यांनी केले.

भारतीय जनता पक्ष आणि नित्य योग सेवा बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथील प्रभाग क्रमांक चार मध्ये , नाईक नगर येथील हरित क्रांतीचे जनक स्व. वसंतराव नाईक उद्यानात आठ दिवसीय रोगमुक्ती साठी मोफत योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ह्या शिबिराच्या समारोपीय प्रसंगी नरेंद्र चव्हाण बोलत होते.

योगाचार्य नांदेड भूषण तथा योगऋषी स्वामी रामदेव बाबा यांनी आदर्श योग शिक्षक पुरस्कार म्हणून गौरवलेले सीताराम सोनटक्के गुरुजी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली हे शिबिर संपन्न झाले असून या शिबिराला प्रचंड प्रतिसाद लाभला. नांदेड जिल्ह्यातून हजारो योग साधकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

या शिबिरासाठी माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली नांदेडच्या माजी महापौर सौ शैलजाताई किशोर स्वामी, स्थई समितीचे माजी सभापती किशोर स्वामी तसेच नगरसेवक दयानंद वाघमारे यांनी संयोजनाची मोठी जबाबदारी पेलली.

योग शिबिराच्या समारोपीय प्रसंगी भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष नरेंद्र चव्हाण यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी संयोजक नांदेड मनपा माजी सभापती किशोर स्वामी व माजी नांदेड मनपा महापौर शैलाजा स्वामी यावेळी माजी नगरसेवक दयानंद वाघमारे, तसेच योग गुरु सीताराम सोनटक्के, गजानन कदम, नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका गायत्री कदम, माजी नगरसेविका सुनंदा पाटील, दीपक पाटील, माजी नगरसेवक विश्वास कदम, अनुसया चौधरी मीनाक्षी चिल्लरगे संतोष मुघटकर आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमात प्रा. विलास गारोळे यांच्या संगीत संचाने संपूर्ण आठ दिवस आपली उत्कृष्ट संगीत सेवा दिली. समारोपिय कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पोवाड्याने योग शिबिरात रोमांच आणले. तर योग साधक पत्रकार मकरंद पांगरकर, सौ. रेखा धूत, योगाने ब्रेन ट्युमर बरा झालेला शशिकांत गंगाधर कदम यांनी प्रतिक्रिया दिल्या. तर कु. सिद्धी कोकरे हिने बहारदार भरत नाट्यम नृत्य केले.

कार्यक्रमाचे संचालन वृक्ष मित्र फाउंडेशनचे संतोष मुगुटकर यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रभाग क्रमांक चार चे सर्व भाजपाचे कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## शिवाजीराव जाधव यांना नानक साई फाऊंडेशनचा जीवन गौरव पुरस्कार

**नांदेड** -येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी तालुका मुखेड चे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे मुखेड तालुका अध्यक्ष शिवाजीराव जाधव यांना नानक साई फाऊंडेशन चा संत नामदेव जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आल्याने सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. लंगर साहिब गुरुद्वारा चे जत्थेदार महान तपस्वी श्रीमान संत बाबा बलविंदरसिंघजी यांच्या हस्ते तर खा. प्रा. रवींद्र चव्हाण,आ. बालाजीराव कल्याणकर,नानक साई फाऊंडेशन चे अध्यक्ष पंढरीनाथ बोकारे, चैतन्यनगर शिवमंदिर ट्रस्ट चे अध्यक्ष माधवराव पटणे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवाजीराव जाधव यांना हा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. नानक साई फाऊंडेशन दर दोन वर्षांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीचां संत नामदेव महाराज यांच्या नावाने 'जीवन गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करत असते, शिवाजीराव जाधव यांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्याची नानक साई फाउंडेशनने नोंद घेऊन संतांच्या नावे असलेल्या संत नामदेव जीवन गौरव पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे माध्यमातून शिवाजीराव जाधव यांनी सामाजिक बांधिलकी जोपासात गोर, गरीबांचे मुलांना मोफत शिक्षण देऊन, भावी चांगली पिढी निर्माण व्हावी यासाठी शिक्षण महर्षी स्व. नागोराव जाधव यांचे कार्य ते नेटाने पुढे चालवत आहेत. शिवाजीराव जाधव यांना हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातील अभिनंदन होत आहे.



## राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभागाच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी डॉ. मुजाहिद खान

**नांदेड** -राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीच्या अल्पसंख्यांक विभाग प्रदेश कार्याध्यक्षपदी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री कमलकिशोर कदम यांचे निष्ठावंत कार्यकर्ते डॉ. मुजाहिद खान यांची निवड करण्यात आली. मुंबई येथील पक्ष कार्यालयात पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. नांदेड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीत विविध पदावर डॉ. मुजाहिद खान यांनी काम करून विविध सामाजिक उपक्रम राबवत पक्षाचे विचार, ध्येय-धोरण जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे काम केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष शरदचंद्र पवार, माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री कमलकिशोर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. मुजाहिद खान यांनी नांदेड शहर आणि जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रम घेतले आहेत. विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, पूरग्रस्त नागरिकांना मोफत उपचार, कोवीड काळात, गरजूंना मोफत आरोग्य सेवा असे विविध उपक्रम राबवत असतात. त्यांच्या या कार्याची दखल घेत अल्पसंख्यांक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष सिराज मेहदी साहेब यांच्या सुचनेवरून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांनी डॉ. मुजाहिद खान यांची अल्पसंख्यांक विभागाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षपदी निवड केली. मुंबई येथील पक्ष कार्यालयात नुकतेच त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी प्रदेश अल्पसंख्यांक विभागाचे प्रभारी नसीम सिद्दिकी, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर, प्रदेश सरचिटणीस रवींद्र पवार, मुंबई शहराध्यक्ष रेखाताई अहिर, जिल्हा उपाध्यक्ष मोहम्मद तनवीरोद्दीन, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष शेख रहेमद आदींची उपस्थिती होती. डॉ. मुजाहिद खान यांच्या निवडीबद्दल अनेकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## जिल्हा रुग्णालयात जागतिक मधुमेह दिन साजरा

**नांदेड** -नांदेड जिल्हा रुग्णालयात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ संजय पेरके व अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ पांडुरंग पावडे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक मधुमेह दिन साजरा करण्यात आला. यावेळी रुग्ण व त्यांचे नातेवाईकांना वैद्यकीय अधिकारी डॉ. चांदू पाटील यांनी मधुमेहाची लक्षणे, मधुमेहामुळे मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम तसेच मधुमेह आजारासंबंधी घ्यावयाची काळजी याबाबत विद्यार्थी, उपस्थित रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांना सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपाच्या अनुषंगाने बोलतांना एनसीडी नोडल अधिकारी डॉ. हनुमंत पाटील म्हणाले की, दिवसेंदिवस व्यक्तीचे शारीरिक (कष्टाची कामे) कमी होत आहेत, त्यामुळे त्यांना मधुमेहासारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. म्हणून प्रत्येक व्यक्तीने दररोज किमान अर्धा तास तरी शारीरिक व्यायाम तसेच कष्टाची कामे केले पाहिजे. तसेच आहारात मिठ आणि साखरेचे प्रमाण कमी ठेवावे, संतुलित आहार घ्यावा जेणेकरून व्यक्तींना मधुमेह सारखा आजार नियंत्रणात ठेवण्यास मदत होईल. यावेळी तंबाखूमुक्त युवा अभियान ३.० जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमास निवासी वैद्यकीय अधिकरी डॉ. एच.के. साखरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी माने, डॉ.सुमित लोमटे, डॉ. शाहू शिराढोणकर, डॉ.सुजाता राठोड, डेंटल सर्जन डॉ. दीप्ती सूर्यवंशी, एनसीडी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. उमेश मुंडे, मेट्रन सुनिता राठोड, प्राचार्या सुनिता बोथीकर, इंचार्ज श्रीमती नारवाड, श्रीमती बंडेवार तसेच जिल्हा रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी, नर्सिंग महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी तसेच रुग्ण व त्यांचे नातेवाईक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैद्यकीय अधिकारी डॉ. विखारुनिसा खान यांनी तर सूत्रसंचालन बालाजी गायकवाड यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रकाश आहेर, सदाशिव सुवर्णकार, सुनिल तोटेवाड व चंद्रभान कंधारे यांनी परिश्रम घेतले.

## शाश्वत भुयारे यांची राज्य चाचणीसाठी निवड

**नांदेड** -येथील किड्स किंग्डम स्कूल श्री चैतन्य टेक्नो स्कूलचा विद्यार्थी व मराठवाडा क्रिकेट अकॅडमीचा खेळाडू शाश्वत भुयारे यांची नाशिक येथे दि. २७ ते ३० नोव्हेंबर दरम्यान राज्यस्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धा व निवड चाचणीसाठी नुकतीच निवड झाली आहे. शाश्वत भुयारे यांनी किड्स किंग्डम श्री चैतन्य टेक्नो स्कूलकडून तालुका, जिल्हा व धाराशिव येथे विभागीय स्तरावर मॅच विनिंग कामगिरी केल्यामुळे नाशिक येथे होणाऱ्या राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांनी पशुसंवर्धन विभागाच्या विविध कामांची केली पाहणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ नोव्हेंबर-**

नांदेड तालुक्यातील नाळेश्वर पशुवैद्यकीय दवाखानाच्या कार्यक्षेत्रातील राहाटी (बु.) या गावाला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नुकतीच भेट दिली. पशुसंवर्धन विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची त्यांनी पाहणी करुन शेतकरी व पशुपालकांशी संवाद साधला.

जिल्हाधिकारी यांनी राष्ट्रीय दुध विकास मंडळ, दिल्ली (एनडीडीबी) मार्फत पुरविल्या जाणाऱ्या कृत्रिम रेतन सुविधांची तपासणी केली. कृत्रिम रेतनाद्वारे जन्मलेल्या कालवडीची पाहणी करून पशुपालकांनी या अत्याधुनिक सेवांचा अधिकाधिक लाभ घेवून आपल्या घरीच उच्च वंशावळीच्या कालवडी तयार करण्याचे आवाहन त्यांनी केले.

पंतप्रधान सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगाअंतर्गत सुरू असलेल्या दिगंबर के. बोकारे यांच्या पनीर निर्मिती उद्योगाची पाहणी करत त्यांनी उत्पादन प्रक्रिया, गुणवत्ता आणि बाजारपेठेची माहिती घेतली. सदर शेतकरी दररोज गावातच उत्पादन झालेल्या ४०० लिटर दुधापासून दररोज १८० किलो स्वच्छ, ताजे व भेसळमुक्त पनीर तयार करून नांदेड शहरास पुरवठा करतात याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

नांदेड जिल्ह्यात सुरू होणाऱ्या विदर्भ व मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प टप्पा दोन प्रकल्पातील योजनांचा व महिलांच्या मराठवरहाड दूध उत्पादक कंपनीचा व राष्ट्रीय दुध विकास मंडळ दिल्ली यांचेमार्फत बायोगॅस प्रकल्प उभारणीच्या उपक्रमाचा पशुपालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

एक गाव एक फार्म गृहीत धरुन हा प्रकल्प राबविण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

भेटीदरम्यान जिल्हाधिकारी कर्डीले यांनी मराठवऱ्हाड दूध उत्पादक कंपनीचे सहायक ज्ञानोबा बोकारे, माधव मारोती बोकारे आणि दिगंबर केशवराव बोकारे यांच्याशी संवाद साधला व त्यांच्या कामाचा आढावा घेतला. या कार्यक्रमास जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. राजकुमार पाडिले, पशुधन विकास अधिकारी नाळेश्वर डॉ. दीप्ती एम. चव्हाण तसेच कृत्रिम रेतन तंत्रज्ञ परसराम जमदाडे उपस्थित होते.

# देगलूरात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस प्रचार यंत्रणेत आघाडीवर

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १६ नोव्हेंबर-**

येथील नगरपरिषद निवडणुकीची वातावरणनिर्मिती जोर धरत असून सध्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या दोन प्रमुख पक्षांनी प्रचार यंत्रणेत स्पष्ट आघाडी घेतली आहे. तर भारतीय जनता पक्षाकडूनही 'डोअर टू डोअर' प्रचार मोहीम राबवली जात आहे. पण अद्याप भाजपाकडून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराची अधिकृत घोषणा करण्यात आली नसल्याने भाजपा आघाडी कधी घेणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.



नगरपरिषद निवडणूकीची प्रचार यंत्रणा सकाळपासून रात्रीपर्यंत घराघरांमध्ये संपर्क, गाठीभेटी, प्रभागनिहाय समीकरणे आणि संघटनात्मक तयारीचा वेग वाढला आहे. सध्या देगलूरात माजी नगराध्यक्ष तथा काँग्रेसचे शहराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाचे प्रचार विविध प्रभागात चालू आहे तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे लक्ष्मीकांत पदमवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ते सक्रीय झाले आहेत. भाजपाकडून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराची अद्याप अधिकृत घोषणा न झाल्याने स्पष्ट भूमिका दिसून येत नाही. पण नुकतेच भाजपात गंगाधर भांगे आणि प्रशांत दासरवाड यांच्या कुटूंबियांपैकी एकास नगराध्यक्ष पदाची उमेदवारी मिळेल अशी चर्चा आहे.

यंदा पक्षप्रवेश, प्रचाराची गती, नियोजन आणि कार्यकर्त्यांची हालचाल पाहता काँग्रेसने चांगलेच मैदान तयार केले आहे पण राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडूनही व्यूव्हरचना आखली जात असल्याची भावना व्यक्त होत आहेत. दुसरीकडे भारतीय जनता पक्षाकडून नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आपापल्या प्रभागात भेटिगाठी घेत हालचाल गतीमान करीत असल्याचे दिसून येत आहे. मोठा जनसमुदाय न जमवता अंतर्गत प्रचार यंत्रणा भाजपाची चालू आहे. यासाठी आमदार जितेश अंतापुरकर आणि माजी नगराध्यक्ष शंकरराव कंतेवार यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

इतर पक्षांकडूनही काही प्रमाणात हालचाली सुरू आहेत. काही पक्ष काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि भाजपात सामील होण्याची चिन्हे दिसत आहेत. सद्यः स्थितीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचा प्रचार अधिक परिणामकारक ठरत असून खरी लढत या दोनच पक्षांमध्ये होण्याची शक्यता आहे.

# क्रीडा स्पर्धांसाठी वसतिगृह रिकामे करण्याचे आदेश; एनएसयुआयचा आंदोलनाचा इशारा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ नोव्हेंबर-**

स्वा. रा. ती. म. विद्यापीठात क्रीडा स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन होणार असून राज्यभरातून सुमारे ४५०० स्पर्धक यांत सहभागी होणार आहेत. या स्पर्धकांच्या निवासासाठी विद्यापीठ प्रशासनाने सध्याच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना तात्पुरते वसतिगृह रिकामे करण्याचे निर्देश दिले आहेत. पूर्वी विद्यार्थ्यांना महिनाभरासाठी तर आता तो आदेश बदलून आठ दिवसांसाठी सर्व साहित्यासहित वसतिगृह सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या आदेशाचा विरोध करत एनएसयुआयचे जिल्हाध्यक्ष सुरज पाटील शिंदे यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशासनाला निवेदन दिले.



विद्यार्थ्यांनी यांस विरोध केला असता, विद्यापीठ प्रशासन त्यांस जुमानत नाही. विद्यार्थ्यांच्या या विरोधात एनएसयुआयने उडी घेतली असून, एनएसयुआयचे जिल्हाध्यक्ष सूरज पाटील शिंदे हे गेल्या चार ते पाच दिवसांपासून वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संपर्कात असून, त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व विद्यार्थ्यांच्या या समस्येबाबत प्र-कुलगुरू महाजन यांनी निवेदन दिले व या विद्यार्थ्यांच्या अडचणींवर त्यांच्याशी संवाद साधला. विशेष म्हणजे सदर निवेदनावर वसतिगृहात राहणाऱ्या दोनशे विद्यार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

यांबाबत माध्यमांशी बोलताना सूरज पाटील-शिंदे यांनी सांगितले की, क्रीडा स्पर्धांचे आयोजन स्वागतार्ह आहे; परंतु त्यासाठी आधीपासून वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना स्थलांतर करण्यास भाग पाडणे योग्य नाही. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासात अडथळे निर्माण होतील, तसेच यामुळे विनाकारण आर्थिक भार आणि विशेषतः विद्यार्थिनींच्या सुरक्षेच्या बाबतीत प्रश्न निर्माण होऊ शकतात. विद्यापीठ प्रशासनाला सदर स्पर्धेच्या आयोजनाची तब्बल वर्षभरापूर्वी सूचना मिळाली होती, तर त्या वर्षभरात विद्यापीठाने येणाऱ्या ४५०० च्या खेळाडूंच्या राहण्याची वेगळी व्यवस्था करण्याचे नियोजन का केले नाही ? पुढे बोलताना त्यांनी विद्यापीठ प्रशासनाला निर्णय तात्काळ मागे घेण्याची मागणी केली. निर्णय रद्द न केल्यास एनएसयुआयतर्फे सोमवार, १७ नोव्हेंबर २०२६ रोजी नांदेड एनएसयुआयची संपूर्ण टीम वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना सोबत घेऊन विद्यापीठात लाक्षणिक उपोषण करेल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. मात्र विद्यापीठ प्रशासनाकडून या प्रकरणी अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

# पीएनजी ज्वेलर्स'तर्फे नव्या पिढीच्या वधूसाठी 'प्रथा' संग्रह सादर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ नोव्हेंबर-**

भारतीय विवाहसोहळ्यांच्या हंगामाची सुरुवात होत असताना, भारतातील सर्वात विश्वासार्ह पारंपरिक दागिन्यांच्या ब्रँडपैकी एक असलेल्या 'पीएनजी ज्वेलर्स'ने आपला खास असा विवाह संग्रह 'प्रथा' सादर केला आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि गोवा येथे या संग्रहाचा ग्राहकांना अनेक सवलतींसह लाभ घेता येणार आहे. हा संग्रह नव्या युगातील वधूसाठी परंपरेचा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम आहे.

'प्रथा' म्हणजेच 'परंपरा'. हा संग्रह भारतीय स्त्रीच्या सौंदर्य, भावना आणि कलात्मकतेचे प्रतिनिधित्व करतो. या नव्या कलेक्शनमध्ये सोने आणि हिरे जडित सुंदर ब्रायडल सेट्स, हार, कानातले, बांगड्या आणि मांगटिका यांचा समावेश आहे. प्रत्येक दागिन्याच्या डिझाईनमध्ये पारंपरिक नक्षीकाम आणि आधुनिक डिझाईन्सचा सुंदर मिलाफ दिसून येतो, जो आजच्या आत्मविश्वासू आणि समंजस वधूंसाठी खास तयार करण्यात आला आहे.

विवाह हंगामाच्या निमित्ताने पीएनजी ज्वेलर्सतर्फे ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स जाहीर करण्यात आल्या आहेत. सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ३० टक्के पर्यंत सूट आणि हिरे दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ७५ टक्के पर्यंत सूट. यासोबतच जुन्या सोन्याच्या एक्सचेंजवर ० टक्के कपात, ज्यामुळे प्रेम आणि परंपरेचं प्रतीक असणारे दागिने खरेदी करण्याची ही उत्तम संधी ठरते.

या मोहिमेबद्दल बोलताना, पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, ''प्रथा वेडिंग कलेक्शन म्हणजे वारशाची आणि भावनेची शाश्वत नाळ आहे. या कलेक्शनमधील प्रत्येक डिझाईन वधूच्या नव्या प्रवासाची सखी बनावी, या उद्देशाने तयार केली आहे.



**हदगाव: माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्या उपस्थितीत नगराध्यक्ष पदासाठी कुमुद सुनील सोनुले यांनी दि.१६ नोव्हेंबर रोजी काँग्रेस पक्षाच्या वतीने नामनिर्देशन पत्र निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत जगताप यांच्या कडे दाखल केले.**

# कुंटूर जि.प. गटात तिरंगी लढतीची चाहूल ; ओबीसी मतांची एकजूट समीकरणे बदलणार?

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १६ नोव्हेंबर-**

नायगांव तालुक्यातील बहुचर्चित कुंटूर जिल्हा परिषद गट यंदा इतर मागासवर्गीय महिला या प्रवर्गासाठी राखीव असल्याने, या गटात अभूतपूर्व तिरंगी लढत रंगण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. स्थानिकराजकारणात बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या या गटात पहिल्यांदाच तीन प्रभावी उमेदवारांममध्ये चुरस निर्माण झाली आहे.

कुंटूर साखर कारखान्याचे चेअरमन राजेश कुंटूरकरांच्या सौभाग्यवती सौ. मधुमती कुंटूरकर या पारंपरिक बालेकिल्ल्याच्या बळावर दमदार दावेदार मानल्या जात आहेत. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाचे नांदेड दक्षिणचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकरांच्या सौ.दिपाली पाटील होटाळकरांची उमेदवारी ही चर्चेत असून, त्यामुळे लढत अधिक रंगतदार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तर दुसरीकडे काँग्रेसकडून मूळ ओबीसी समाजातील श्रीमती अहिल्याबाई बालाजी चोंडे यांच्या नावाच्या चर्चेने जोर धरला असून,कुंटूर सर्कलच्या स्थानिक पातळीवर धनगर समाजाचा त्यांच्या नावाला सध्या प्रथम पसंती मिळत आहे.



काँग्रेस पक्षातील निष्ठावंत कार्यकर्ते व छत्री शेळगांव ग्रामपंचायतचे सरपंच संजय चोंडे यांचा त्यांना भक्कम पाठिंबा असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

**मराठा नेतृत्वातील मतविभाजन ओबीसींसाठी फायद्याचे?**

कुंटूरकर व पाटील या दोन्ही बाजूंच्या मराठा नेतृत्वा मध्ये मतांचे विभाजन झाले, तर ओबीसी मतांची एकजूट चोंडे यांच्या बाजूने निर्णायक ठरू शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात वेगाने पसरत आहे. विशेष म्हणजे, भाजप व राष्ट्रवादी (अजितदादा गट) हे सत्तेचे भागीदार असल्याने त्यांच्या मतांमध्ये तडा गेल्यास काँग्रेसला अनपेक्षित बळ मिळण्याची शक्यताही राजकारणात रंगत आणत आहे. शिवराज पाटील होटाळकर हे पक्षातील प्रमुखपदी असल्याने जिल्ह्यातील सर्वच पाच नगरपंचायत व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीच्या जबाबदा ऱ्यांचा खुप ताण असुन यापूर्वी शिवराज पाटील होटाळकरांनी तळेगाव जि.प. सर्कल (ता. उमरी) व मांजरम जि. प. सर्कल निवडणुकीत पराभवाला सामोरे जावे लागले होते. परंतु कुंटूर सर्कल मध्ये त्यांचा जन संपर्क खुप मोठ्या प्रमाणात असुन. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या बळावर यंदाच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संस्थेच्या निवडणुकीत नक्कीच यश प्राप्त करतील असा काही जानकार मंडळीचे मते व्यक्त केली जात आहेत.तर दुसरीकडे सध्या ते जिल्हाध्यक्ष असल्याने जिल्ह्यातील निवडणुकीच्या जबाबदाऱ्यांमुळे त्यांच्या उमेदवारीवर अजितदादा गटात पुनर्विचार होईल का, याकडे जिल्ह्यातील दिग्गजांचे लक्ष लागले आहे.तर कुंटुर सर्कल मधील स्थानिक नाराजीने समीकरणे बदलण्याची चिन्हे गेल्या काही वर्षांत कुंटूरकर परिवार हा साखर कारखान्याच्या कामकाजात गुंतल्याने स्थानिकसह पंचक्रोशीती ल गावे ही विकासाच्या योजनेपासून वंचित राहिल्याने,त्यामुळे स्थानिक नागरिकांत सध्या प्रचंड नाराजी वाढलेली आहे. यासोबतच मूळ ओबीसी समाजाला संधी न मिळाल्याची भावना अधिक तीव्र होत असून, याचा प्रत्यक्ष परिणाम हा देशमुख व पाटील गटाच्या मतांवर होऊ शकतो, असा अंदाज वर्तविला जात आहे.एकंदरीत, कुंटूर जि.प. गटातील ही तिरंगी लढत स्थानिक राजकारणात चुरस निर्माण करण्याबरोबरच अनिश्चिततेचे सावट आणणारी ठरणार, हे निश्चित मानले जात आहे.